साप्ताहिक

# साधना

१५ ऑक्टोबर ८३ / दोन रुपये



# परछाईयाँ - साहिर लुधियानवी

## यापुढील अंक दिवाळी अंक

साप्ताहिक

माणूस

वर्ष : तेविसावे

अंक : विसावा

१५ ऑक्टोबर १९८३

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

संजय पवार

# सप्रेम नमस्कार

## निलगिरी ....

□ आपण १ ऑक्टोबर १९८३ च्या अंकात 'उसाकडून निलगिरी' ही कव्हर-स्टोरी प्रकाशित करून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांपुढे एक नवा विचार मांडला याबद्दल मी प्रथम आपले आभार मानतो.

मात्र या लेखातील 'कारखाना कसा व कोणता ?' या शीर्षकातील परिच्छेदात तपशिलाचे संदर्भ चुकीचे पडले आहेत. या विषयातील तज्ज्ञ आणि अन्य वाचकांची त्यामुळे तीव्र प्रतिक्रिया संभवते. कृपया पुढील खुलासा प्रसिद्ध करावा ही विनंती.

'या एवढ्या निलगिरीच्या झाडांचे पाच वर्षांनतर काय करायचे ? या निलगिरीच्या वल्ल्या तयार होतात. कागदाच्या लगद्यासाठी ( पेपरपल्प ) त्याची अत्यंत आवश्यकता असते. पारखे पेपर पल्प कन्वर्शनसारखे अन्य तत्सम कारखाने या लगद्याचे ग्राहक आहेत. हे उद्योग, निलगिरी-उत्पादक शेतकऱ्याला एक टन पल्पनिर्मितीसाठी जेवढा निलगिरी लागतो, त्यासाठी अवघे सातशे रुपये देतात हे खरे; तथापी सध्याची कागदनिर्मिती उसाच्या भुशापासून (बॅगस) होते. मळीपासून (मोलॅसिस) नाही. भुसा ७५ टक्के व २५ टक्के इतर फाइन मटेरियल असे कच्च्या मालाचे प्रमाण असते. या २५ टक्क्यात रस्त्यावरचा कागद व चिंध्यांचा समावेश असतो. एक टन लगदा ( पल्प ) तयार करण्यासाठी जेवढा असा माल लागतो त्याला कागद-उत्पादक २४०० रुपये असा भाव देतात.

याशिवाय एक ५० टनी कागदकारखाना काढण्यासाठी दहा कोटी रुपये लागतात हे चूक आहे. ३० टनी कारखान्यासाठी एवढा खर्च येतो व त्याला ६५० एकरांचा निलगिरी लागतो, ६०० नव्हे. १० टनी रेयॉनपल्प कारखाना याऐवजी ५० टनी रेयॉनपल्पचा कारखाना काढण्यासाठी ४० कोटी रुपये पाहिजेत असा माझ्या सांगण्याचा आशय होता.'

२ ऑक्टोबर ८३ विनायक पाटील

चेअरमन

नाशिक जिल्हा निलगिरी उत्पादक

सहकारी संस्था लि., नाशिक

## 'सागरतळावरील खनिज गोळे' काही गैरसमजांचे निराकरण

□ 'माणूस'च्या १, ऑक्टोबरच्या अंकात डॉ. सुभाषचंद्र सारंग यांनी सागरतळावर सापडणाऱ्या मौल्यवान खनिजांच्या गोळ्यांविषयी एक माहितीपूर्ण लेख लिहिला आहे. त्या माहितीत सर्वसामान्यपणे या गोट्यांचे आकार, त्यातील घटकद्रव्ये, ते आढळण्याची स्थिती आणि त्यांचे भौगोलिक स्थान, तसेच हे गोटे वर काढण्याची यंत्रणा, भारताच्या 'गवेषणी' या जहाजाची माहिती इ. सर्व बरोबर दिले आहे..मात्र 'धातूच्या गोट्यांची निर्मिती' यासंबंधी त्यांनी काही चुकीचे तर्क केलेले आहेत. त्यामुळे वाचकांचे गैरसमज होऊ नयेत म्हणून त्याविषयीची वस्तुस्थिती सविस्तरपणे येथे देत आहे.

डॉ. सारंग यांनी लिहिले आहे की, 'सागरतळावर गोट्यांची पखरण फक्त एकेरी असते. सागरामध्ये प्रचंड वेगाने गाळाचे संचय होत असले तरीही हे गोटे गाळाखाली झाकले जात नाहीत. अगदी नुकतेच ठेवल्यासारखे दिसतात...सागरतळावर प्रवाह आणि सागरी जीव यामुळे ते सतत घरंगळत राहातात. त्यांची जागच्याजागी उलथापालथ होत राहाते. म्हणूनच

ते गाळाखाली गाडले जात नाहीत.'

वस्तुस्थिती अशी आहे की, ज्या खोल जागी असलेल्या सागरतळावर हे गोटे तयार होत असतात तेथे 'प्रचंड वेगाने गाळाचा संचय' कधीच होत नसतो. सागरात साचणाऱ्या गाळाचे किनारपट्टीपासून ते अत्यंत खोल तळ असलेल्या सागरभागापर्यंत वेगवेगळे विभाग (झोन्स) पाडता येतात. हे विभाग 'सागरतटीय' म्हणजे भरती–ओहोटीच्या मर्यादेत असणारा सागरकिनारा, उत्तरीय म्हणजे १०० फॅदम (६०० फूट) खोलीपर्यंत तळ असणारा उथळ सागरभाग; खोल सागरी म्हणजे मध्यम खोलीचा सागरतळ असणारा विभाग आणि 'अगाध सागरी' म्हणजे अत्यंत खोल (३ ते ५ पेक्षा अधिक किमी) सागरतळाचा भाग. (इंग्रजीत यांना अनुक्रमे लिटोरल, नेरिटिक, पेलॅजिक आणि ॲबिसल अशी नावे आहेत.) सामान्यतः सागरात प्रचंड वेगाने गाळ साचतो तो नद्यांच्या मुखाशी, सागरतटीय आणि उत्तरीय विभागातच साचतो. क्वचित या गाळाचा काही भाग सावकाशीने खोल सागरभागात येतो; परंतु अगाध सागरीभागात भूमिज (टेरिजिनस) गाळ कधीच येत नाही. या भागात जो काही गाळ साचतो तो प्रामुख्याने 'जवज' असून सागरपृष्ठावर तरंगणाऱ्या कोट्यवधी सूक्ष्म प्लॅंक्टनच्या कवचांचा हा गाळ असतो. अति खोल भागात सूर्यप्रकाश कधीच पोचत नसल्याने तेथे गर्द अंधार असून तेथील पाणी अतिशीत आणि प्रचंड दाबाखाली असते. त्याच्यात कार्बनडायऑक्साइड वायू भरपूर प्रमाणात विरघळलेला असल्याने त्याची आम्लता इतकी असते की, या पाण्यात कॅलशियम–कार्बोनेटची बनलेली कवचे विरघळून जातात. फक्त सिलिकायुक्त कवचे तेवढी तगून तळापर्यंत पोचतात.

इतक्या खोल भागात क्वचितच असणारे सागरी प्रवाह सोडले तर सागरपृष्ठावर केवढेही प्रचंड झंझावाती वादळ असले तरी त्या खळबळीचा मागमूसही या भागात नसतो. पृष्ठावरच्या लाटांची शक्ती एवढ्या खोलवर पोचण्याच्या आत वरच्या ५०० ते १००० मीटर भागातच विरून जाते. त्यामुळे इथे कसलीही खळबळ माजण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे गोटे घरंगळण्याचा प्रश्न नसतो. गोटे गाडले जात नाहीत याचे एकच कारण म्हणजे येथील गाळ साचण्याचे प्रमाण गोटे तयार होण्याच्या प्रमाणापेक्षाही सावकाशीचे असते. एवढ्या खोल तळावर उघडे पडलेले काही शार्क माशांचे दात चॅलेंजरने वर काढले त्या वेळी ते दात सध्या अस्तित्वात नसलेल्या म्हणजे सुमारे ५ ते १० लक्ष वर्षांपूर्वीच्या शार्क जातीच्या प्राण्याचे होते असे आढळले म्हणजे गेल्या ५ ते १० लक्ष वर्षांत हा दात गाडला जाईल एवढ्या जाडीचाही गाळ या खोल तळावर साचू शकत नाही असे त्यातून दिसून आले.

१ सप्टेंबर ८३

प्रा. प्रभाकर सोवनी
भूशास्त्रविभागप्रमुख
फर्ग्युसन कॉलेज, पुणे ४

## स्वप्नांचा माझा अनुभव

□ प्रा. अकोलकरांचा 'मति गुंग करणारी स्वप्नं...' (१७ सप्टेंबर अंकातील) हा अभ्यासपूर्ण लेख आवडला. लेखात अतींद्रिय मनोविज्ञान, टेलिपथी, क्लेअरव्हायन्स आदि बाबींवर अधिक सोदाहरण (स्वानुभवाधिष्ठित) चर्चा आढळते. त्यामुळे शीर्षक थोडेसे 'मिसलीडिंग' वाटते. मराठीत या विषयावर फारच कमी लेखन झाले आहे. जयपूर विद्यापीठातील अतींद्रिय मनोविज्ञान विभाग प्रयोग पडताळे अयशस्वी झाल्यामुळे अविश्वासार्ह म्हणून बंद करण्यात आला. बंगलोर विद्यापीठातर्फे त्याचे प्रयोग होत असतात व निष्कर्ष प्रकाशित केले जातात.

फ्रॉइड, युंग आदि पाश्चात्य मनोविज्ञानवेत्ते स्वप्नांचा जो अर्थ लावतात तो मला पटत नाही. मला स्वप्नांचे स्मरण होते. स्वानुभवावरून काही स्वप्ने चमत्कारिक, गमतीदार व निरर्थक वाटतात. कारण अबोध मनात दडलेल्या इच्छा स्वप्नात प्रकट होत असतील तर तेही तेवढेसे खरे वाटत नाही. मी हळवा व संवेदनशील वृत्तीचा असल्यामुळे मला जी स्वप्ने पडतात, त्यांचा अर्थ वाचून किंवा इतरांशी चर्चा करूनही योग्य वाटत नाही. स्वप्न आणि वास्तव यांचा अबोध मनातील सुप्त आकांक्षांशी अर्थाअर्थी संबंध वाटत नाही. मला झोप कमी असल्यामुळे नेहमी निरनिराळ्या प्रकारची स्वप्ने पडतात. महत्त्वाची जुनी स्वप्ने माझ्या लक्षात आहेत. उदाहरणार्थ एकदा मला लहानपणी रात्री जागृतावस्थेत माझ्यासमोर नथधारी, नऊवारी, जरतारी साडी नेसलेली, हातात आरतीचे ताट असलेली स्त्री उभी होती. कोण आहे? असे विचारताच ती अदृश्य झाली माझ्या आजीने ती लक्ष्मी असली पाहिजे असे सांगितले; पण प्रत्यक्षात माझे व लक्ष्मीचे जणू हाडवैर असावे. म्हणून आजपावेतो मी दरिद्रावस्थेतच आहे. (हे स्वप्न १९५२–५३ सालचे असावे.)

१९७६ ते १९७९ च्या सुरुवातीपर्यंत अधूनमधून मला सतत सर्पाची स्वप्ने पडत असत. सर्प कधी रानावनात हिरव्यागार गवतातून माझा पाठलाग करत असे, तर कधी माझ्या शरीराभोवती काही अंतराने वेटोळे घातलेला असे. आता फ्रॉइडने सर्प आणि तीव्र लैंगिक इच्छेचा संबंध जोडला आहे. मला प्रत्यक्षात अतिशय विवंचनेत असल्यामुळे कामवासना अधिक असणे शक्यच नाही. याची संगती कशी लावायची? इतरही काही 'टिपिकल' स्वप्ने पडत असतात. उदा. दुधाची नदी, स्फटिकशुभ्र वाहते पाणी, सोनेरी देऊळ किंवा पर्वत, झाडावरील पोपटांचा थवा, धार्मिक वृत्तीचा नसूनही कुलदेवतेचे स्वप्न, महादेवाची पिंड व चांदीचे रुपये इत्यादी स्वप्नांची संगती व अर्थ लागत नाही. अबोध मनातील इच्छांचा काही संबंध असेल असेही विचारांती वाटत नाही. याला केवळ स्वप्नरंजन समजायचे का?

पण संकटाची पूर्वसूचना मिळते, हे मी पडताळून पाहिले आहे. उदाहरणार्थ दि. २२ ऑगस्टला मी सोलापुरी होतो. त्या तारखेला रात्री सुमारे दीड वाजता औरंगाबाद मुक्कामी राहते घर चोरट्यांनी फोडले व सामान पळवले. त्या दिवशी मी अस्वस्थ होतो. काही तरी वाईट होणार हे मन सांगत होते, म्हणून मी पत्नीला औरंगाबादला दुपारी ३–३० च्या बसने चलण्याविषयी आग्रह करत होतो. त्या दिवशी रात्री ९–३० च्या बसने निघून सकाळी औरंगाबादला पोहोचलो, तर घरफोडी झाली होती. २३ ऑगस्ट १९७८ ला पोलिसात घरफोडी व सामानाची यादी नोंदवली आहे.

अतींद्रिय मानसशास्त्राचा शास्त्रीय अभ्यास व्हावा व अनेक ज्ञानाची अज्ञात दालने लोकांना उपलब्ध व्हावी असे मला वाटते.

प्रा. अकोलकरांचे या लेखाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन !

२० सप्टेंबर ८३ — विश्वनाथ थोंटे, सोलापूर

□ दि. २४ सप्टेंबरचा 'माणूस' वाचला. 'क्षेपणास्त्रे', आजचे कवी वगैरे लेख वाचनीय आहेत. आसामसंबंधीचा विनय सहस्रबुद्धे यांचा लेख अत्यंत माहितीपूर्ण आहे; पण त्याहूनही कळस म्हणजे आसामच्या कविता ! तीनही कविता विशेषतः ब्रह्मपुत्रा फारच खोली असलेली आहे. श्री. शरदमणी मराठे हे इंजिनियर असून अशा कविता करतात हे उल्लेखनीय.

२५ सप्टेंबर ८३ — विजय कुलकर्णी, वडाळा

□ दि. १० सप्टेंबरच्या माणूसच्या अंकातला एक तेजीत चालणारा धंदा रामराव आदिक इंजिनिअरिंग कॉलेज, नव मुंबई, हा लेख व याच विषयावर इतर अनेक ठिकाणी वाचलेल्या माहितीतील सारखेपणामुळे या कॉलेजेस्मधून बाहेर पडणारा तंत्रज्ञ कसा असेल याची कल्पनाच करवत नाही; पण एका गोष्टीकडे मात्र कोणाचेच लक्ष गेलेले दिसत नाही. विना-अनुदान तत्त्वावर अभियांत्रिकी महाविद्यालयांना या वर्षी मान्यता दिली असली तरी पुढील वर्षी अगर नंतर कधीही अनुदान देण्यास सरकार मोकळे आहे. निम्म्यांहून अधिक कॉलेजेस कॉंग्रेस (आय) च्या राजकारण्यांना दिली गेलेली आहेत, याचाच अर्थ स्पष्ट होतो की, भविष्यात विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये. ह्या गोंडस कल्पनेखाली सरकारी अनुदाने वाटली जातील वर परत प्रादेशिकतेची डूब दिल्यास कुठचाही पक्ष राज्यकर्ता झाला तरी सदरहू संस्थांना अनुदान द्यावेच लागणार. अनुदान नाही म्हणून देणग्या उकळावयाच्या व संस्था पैशाअभावी चालत नाही म्हणून सरकारी अनुदान मिळवावयाचे ही कॉंग्रेस (आय)च्या सरकारांची नीती केंद्रसरकारने मारुती मोटारचे सरकारीकरण केले ह्यावरून ध्यानी येण्यास हरकत नाही.

१० सप्टेंबर ८३ — मो. वि. गाडगीळ, ठाणे



# मुंबापुरी

## फर्नांडिसकाका...

विदूषक सर्कशीतनं बाद झाला की कुत्र्या–मांजरांचे आवाज काढीत पेन्शनीचा काळ व्यतीत करतो म्हणतात. जॉर्ज फर्नांडिस हे इतर टिनपाट लीडरांसारखे केवळ खुषमस्करे नव्हेत. तर मनस्वी विदूषक आहेत. पण आज तेही पोकळ डरकाळ्या मारण्यात व्यतीत होताहेतसं दिसतं.

आता मंगळवारचा मुंबई बंदचा बघा ना कसा आपटीबार फुसकला. खरं तर मुंबई म्हणजे फर्नांडिसकाकांची पुण्यभूमी. याच भूमीवरून त्यांनी भल्याभल्यांचा भुगा केला, पाटीलदादांचा फडशा पडला ! बोलता बोलता फर्नांडिस मुंबईचे अनभिषिक्त कप्तान झाले. पेपरवाल्यांना काय–चघळायला हवं असतंच. त्यांनीही लगेच फर्नांडिसच्या टोपीत तुरे खोवायला सुरुवात केली.

पुढे काय बिनसलं कोणास ठाऊक. पण फर्नांडिस मुंबईला कंटाळले. त्यांनी बिहारच्या दऱ्याखोऱ्यात लोहियावादाचा प्रतिध्वनी धुंडाळायला सुरुवात केली अन भ्रमनिरास होत्साते पुन्हा आपल्या मायभूमीला परतले.

फर्नांडिस अधूनमधून मुंबईला हादरे देण्याचे मनसुबे आखतात ते केवळ आपलं अस्तित्व टिकवण्यासाठी. गेल्या वर्षी त्यांनी महापालिकेचा संप घडवून आणला. नंतर दसऱ्याच्या मुहूर्तावर शिवसेना, लोकदल (फर्नांडिस तेव्हा चरणसिंगदास होते ) आणि कॉंग्रेस (समाजवादी) यांचं मेतकूट शिजवायला घेतलं. ते अजून काही झालं नाहीये.

—आणि आता परवाचा बंद ! फर्नांडिसचा हाही प्रवेश काही ठीक जमला नाही. 'बेस्ट'मध्ये डॉ. दत्ता सामंत आणि फर्नांडिस दोघांची युनियन आहे. पैकी सामंतांनी 'बंद' वर बहिष्कार टाकला. नारायण फेणाणींच्या युनियनने खरं तर फर्नांडिसला उघडउघड पाठिंबा द्यायला काहीच हरकत नव्हती. कारण फेणाणी हे फर्नांडिसचे उजवे हात मानले जातात. परंतु फर्नांडिसच्या बाजूने असलेल्या लोकांनी बेस्ट ॲक्शन कमिटी स्थापन केली आणि फर्नांडिससकट सगळ्यांनाच बुचकळ्यात टाकलं.

'बंद'च्या वेळी कोण कोणाबरोबर आहे ह्याचा पडताळा येतो. फर्नांडिसकाकांनी तशी एकेरीच लढाई खेळली. यात जनता पक्षवाले पुढे नव्हते . त्याची कारणं काय ?

विडी-तंबाकू व्यापाऱ्यांचा दहा दिवसांचा विक्री–बहिष्कार साधून फर्नांडिसनी काय मिळवलं ? 'बंद' या शस्त्राचा खुबीदार उपयोग करायचा असतो हे फर्नांडिसना आम्ही सांगायला नको.

पुढच्या वेळी म्यानातनं तलवार उपसण्याअगोदर फर्नांडिस थोडा विचार करतील या आशेने . . . . .

## ग्यानीजी . . . .

राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांच्या परवाच्या मुंबई भेटीमुळे शहरात सध्या एकदम धार्मिक अन मंगलमय वातावरण आहे. ग्यानीजींनी जागोजागी धार्मिक विषयावर भाषणं ठोकून आपल्या ज्ञानाचे सखोल प्रदर्शन केलं.

मुख्यमंत्री वसंतराव पाटीलही राष्ट्रपतींच्या ह्या धर्मप्रेमामुळे इतके गहिंवरून गेले की त्यांनी तावडतोब ग्यानीजींच्या इच्छेला मान देऊन संत नामदेव अध्यासन काढण्याचा निर्णय घेतला.

आमची तर अशी नम्र सूचना आहे की, पुढल्या खेपेस जेव्हा राष्ट्रपतीजी मुंबईस येतील तेव्हा त्यांनी इथे ठिकठिकाणी रामा-

यणावर प्रवचनं द्यावीत. साथीला वसंतदादा असतीलच. ढोलकीवर तिरपुड्यांना ठेवावं. बाज्यावर अंतुले असल्यास उत्तम. भजनं गायला नजमा हेमतुल्ला, सरोज खापर्डे, सुशीला आडारकर उत्साहानं येतील. तीर्थ-प्रसाद वाटायला आदिक हवेत. कशी काय आहे कल्पना ?

पंढरपूर, नांदेड कमी होतं की काय म्हणून राष्ट्रपतींनी मुंबईतही धार्मिक क्षेत्रांना भेट दिली. रौदात–ताहेरा या दाऊदी बोहरा मुस्लिमांच्या दर्ग्याला भेट दिल्यानंतर तिकडे केलेल्या भाषणात झैलसिंग यांनी धर्म माणुसकी घडवतो असं सांगितले. धर्माच्या नावाखाली आपल्या भाईबंदांमध्ये दहशत उत्पन्न करणारे सैयदनासाहेब खुशीत टाळ्या पिटत होते. या सय्यदनासाहेबांचा हुकूम न पाळणे म्हणजे जीवनातून उठणे. दाऊदी बोहरा समाजापैकी अनेक सुधारणावाद्यांना या सय्यदनांमुळे मनस्ताप सोसावा लागला; पण राष्ट्रपतींनी त्याची काळजी करण्याचं काहीच कारण नाही. त्यांनी फक्त शेरोशायऱ्या कराव्यात आणि धार्मिक स्थळांना भेट द्यावी. ह्याचसाठी तर त्यांची नियुक्ति आहे.

राष्ट्रपतींनी गुरुवारी भल्या पहाटे साडेनऊला राजभवनवर पत्रकारांची अनौपचारिक भेट घेतली. यापूर्वी कोणत्याच राष्ट्रपतींनी असं केलं नव्हतं म्हणतात; पण तसं पाहायला गेलं तर ग्यानी झैलसिंग यांनी केलेले अनेक पराक्रम पूर्वीच्या (संजीव रेड्डीसकट) कोणत्याही राष्ट्रपतींनी केले नसतील.

पत्रकारांच्या या भेटीत ग्यानीजींनी ऊर्दू शेरोशायरी ऐकवली. ती ऐकून मुख्यमंत्री एकदम बागबाग झाले आणि त्यांनी जी खोलून दाद दिली म्हणतात. शिमगा गेला आणि कवित्व उरले हे खरंच. त्यामुळे आता दाद देण्यापलीकडे दुसरं दादा करणार तरी काय ?

वेस्ट एण्ड हॉटेलच्या गच्चीवर झालेल्या सिंधी समाजाच्या स्वागतसमारंभात सिंधी लोकांची महती गायली. त्यामुळे सगळ्यांनाच गहिवरून आलं. सिंधी फेडरेशनचे नारी गुरसहानी तर माईक सोडीचनात. पुढे पुढे समारंभाचं एकूण वातावरण आणि लोकांचा उत्साह याला असा जोर आला की, गवर्नर-साहेब, त्यांच्या बेगम आणि बाकी सगळा 'लवाजमा' सगळे जाम वैतागले. राष्ट्रपतींना जमावातनं बाहेर सोडवता सोडवता सिक्युरिटीवाल्यांना घाम फुटला !

ग्यानीजी जेमतेम खाली पोचले असतील– नसतील तोच वर गच्चीवर सिंधी फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी सामोसा–केकवर ताव मारण्यास सुरुवात केली. वीर हुतात्मा हेमू कलाणीची वयोवृद्ध माता जेठीबाई व्यासपीठावर कोपऱ्यात एकटीच बसली

राष्ट्रपतीजी दिल्लीत गेले आहेत. आपल्या मुंबई भेटीच्या वृत्तांताची कात्रणं वाचत असतील. ग्यानीजी हेही वाचा–

'दोपहर की धूप है।
और कुछ नही सबका पिघलता रूप है।
और कुछ नहीं'।

भर दुपारीच अंधार साचत असताना देवाचा जप करणं ग्यानींचं काम नोहे !

## खैबरमध्ये ....

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका आता जवळ आल्या. त्यामुळे सारे नगरसेवक आता जनहिताची कामे करण्यासाठी दबा धरून बसले आहेत. केव्हा आपण सत्कृत्य करतो आणि वृत्तपत्रात आपले नाव छापून येते अशी त्यांची मन:स्थिती आहे. अशा प्रसिद्धीचा सोपा मार्ग म्हणजे सभातहकुबीचा प्रस्ताव मांडणे. मागे तर एकदा अरब-इजराएलयुद्धावरून या महापालिकेत दोन तास खडाजंगी चर्चा होऊन सभा तहकूबही झाली.

काळा घोडा येथील खैबर ह्या उपहारगृहाने केलेल्या अनधिकृत बांधकामावरून असाच एक तहकुबीचा ठराव गेल्या बुधवारी स्थायी समितीत आला. हे वातानुकूलित उपहारगृह आहे कॉंग्रेस आयच्या एका आमदाराचे; परंतु येथे सर्व पक्षांचे आमदार सहभोजनास जमतात. स्थायी समितीच्या सदस्यांनाही हे हॉटेल सुपरिचित आहे.

या आमदाराने गेल्या सहा महिन्यात तीन ते चार हजार चौरस फुटांचे अनधिकृत बांधकाम केले. ह्या वॉर्डाचे प्रमुख डॉ. पिंटो आहेत. डॉ. पिंटोंचे नाव ठाऊक नाही असा पत्रकार मुंबापुरीत शोधून सापडणार नाही! ते जे जे करतात त्याची माहिती श्री. सुखटणकरांमार्फत ते वृत्तपत्रांना देतात; परंतु ह्या खैबरने मात्र त्यांना खिंडीत पकडले. महापालिकेने हॉटेलला बांधकाम पाडून टाकण्यासंबंधी नोटिस दिली तरी बांधकाम चालूच राहिले.

याच विषयावर तहकुबीचा ठराव आल्यानंतर स्थायी समितीतील कॉंग्रेस आयच्या सदस्यांपुढेही धर्मसंकट उभे राहिले. एकीकडे पार्टी तर दुसरीकडे निवडणूक. शाम शेट्टी ह्यांनी केवळ ह्याच हॉटेलवर रोख का, मुंबईत इतक्या हॉटेलांनी अनधिकृत बांधकाम केले आहे ती का पाडत नाही ? असा प्रश्न उपस्थित केला, तर पुष्पकांत म्हात्रे ह्यांनी सत्य परिस्थितीची माहिती करून घेण्यासाठी स्थायी समितीच्या सदस्यांनी खैबरला भेट द्यावी अशी सूचना केली. सर्वांनाच हे एकदम पटले. शिवसेनेचे एक सदस्य म्हणाले– भेट शक्यतो रात्री ठेवा !

¤

गेल्या शनिवारपासून प्रथमच अंधेरी ते व्ही. टी. अशी ट्रेनसर्व्हिस सुरू झाली. त्यामुळे मुंबापुरीतील हजारो प्रवाशांना अंधेरी ते व्ही. टी. असा थेट प्रवास लटकत करता येईल.

–विष्णू जयदेव

## खुलासा

▫ 'माणूस'च्या दि. १ ऑक्टोबरच्या अंकात आणि १० सप्टेंबरच्या अंकात प्रसिद्ध झालेल्या 'रामराव आदिक इंजिनियरिंग कॉलेज' या लेखावरच्या दोन प्रतिक्रिया वाचल्या. दोन्ही पत्रातले काही समान मुद्दे लक्षात घेऊन हे उत्तर देत आहोत.

खरं पाहिल्यास प्राचार्य ज. ना. कळके यांच्या पत्राची नोंदही घेण्याचं कारण नाही. ते रामराव आदिक संस्थेशीच संलग्न आहेत. म्हणजे डी. वाय. पाटलांच्या गोतावळ्यापैकी. आता त्यांनी मालकाशी इमान स्मरून पत्र लिहिलंय की व्यक्तिश: त्यांनाही लेख खरोखरच एकांगी वाटलाय, ते स्पष्ट झालं नाहीये.

त्यांना जर लेख एक विचारशील डोळस व्यक्ती म्हणून नावडला तर आपल्या पदाचा उल्लेख कशासाठी ? अन् जर गारगोटी विद्यापीठचालकांनी कळक्यांना पत्र लिहि-

ण्यास सुचवलं असेल (किंवा कळके स्वतःच उत्साहाच्या भरात येऊन आपली स्वामिभक्ती पटवण्यासाठी लिहिण्यास तयार झाले असतील) तर एक गौप्यस्फोट करायला हरकत नाही. डी. वाय. पाटलांनी आम्हाला एका ज्येष्ठ पत्रकारामार्फत भोजनाचं आमंत्रण पाठवलंय. कळके, आता बोला !

रामराव आदिक कॉलेजवर आमचा व्यक्तिगत राग नाही. डी. वाय पाटलांवर रोष नाही. आमच्या मते हे कॉलेज मराठा लॉबीच्या राजकीय आखाड्याचा एक भाग बनू पाहतंय. महाराष्ट्रात जवळजवळ तेहतीस अशी महाविद्यालये सुरू होताहेत. यात सामाजिक-शैक्षणिक पुनरुत्थानाची किरणं कदाचित कोणाला आढळतीलही; परंतु निदान आज तरी ही कॉलेजं मराठा समाजाच्या राजकीय महत्त्वाकांक्षेचं टोक बनली आहेत.

वेगवेगळ्या समयी जमेल तेव्हा हव्या तितक्या कायद्यांची पायमल्ली करून जर मुंबईजवळच हे अशा स्वरूपाचे कॉलेज् येत आहे तर खेडोपाडी सुरू करण्यात येणाऱ्या कॉलेजांची गत काय असेल, ते प्राचार्य कळक्यांनी शोधून 'माणूस'ला लिहून कळवावं.

वसंतदादा पाटील, तात्यासाहेब कोरे इत्यादींच्या कॉलेजातले घोळ आम्हाला खरंच ठाऊक नाहीत. श्री. गाडगिळांनी जर आम्हाला सविस्तर लिहून कळवलं तर त्यावरही आम्ही जरूर लिहू.

प्रश्न आजच्या काळाचा आहे. आपण सगळेच एका भयाण राजकीय संस्कृतीच्या पंजात आहोत. ही राजकीय संस्कृती वेगवेगळ्या संस्थांना गिळंकृत करू पाहतेय. तांत्रिक विद्याप्रसाराचा डिंडिम हा वरवरचा आहे, हे सांगायला नको. आत आहे राजकीय सत्तेची रस्सीखेच ! कर्मवीर पाटलांना अन् महर्षी कर्व्यांना विरोध करणारा वर्गच आज कॉलेजे काढतोय अन् प्राचार्य कळके त्यांची तुलना महर्षी कर्व्यांशी अन् कर्मवीरांशी करतात ! कळक्यांसारखे गुरु लाभल्यावर डी. वाय. पाटील महर्षी कर्वे ठरतीलच !

वसंतदादांपासनं ते थेट आमदारापर्यंत अनेकांच्या नावे कॉलेजे आहेत असे कळके म्हणतात. म्हणून आदिकांचं नाव द्यायचं का? व्यक्तिनामाच्या प्रवृत्तीवर टीका व्हावी असं कळके कळकळीनं सांगतात; पण केवळ एक टोकन सुरुवात म्हणून आदिकांचं नाव गाळायला कळके तयार होतील का ?

ताकवले अन् कणबरकरांनी पुण्या-कोल्हापुरात मान्यता दिली म्हणून गोऱ्यांनी द्यावीच का? गोऱ्यांनी आपला खास अधिकार वापरला हे काय दर्शवते? सिडकोने इतर संस्थांना इमारती दिल्या त्या निविदा मागवूनच; परंतु रामराव आदिक कॉलेजच्या बाबतीत मात्र निविदा मागवण्यात आल्या नव्हत्या. ही कृपा कशासाठी ?

रामराव आदिक कॉलेजची एकूण विद्यार्थी-क्षमता १२० आहे याची नोंद खुद्द 'डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशन'च्याच दप्तरात सापडते. ही क्षमता १९८ कशी काय झाली याचा जावईशोध कळक्यांनीच घ्यावा.

शेवटी शिक्षणक्षेत्रातल्या महत्त्वाच्या बाबी आमजनतेवर ठेवायच्या नसतात. त्या अधिकारीवर्गाने नक्की करायच्या असतात. गाईडस् आणि ट्यूशन–क्लासेस आज धूमधडाक्याने चालू आहेत. म्हणजे जनतेत प्रिय आहेत. म्हणून ते योग्य मानायचं का? तांत्रिक शिक्षणातल्या तज्ज्ञांनी याबाबतीत मौन पाळले आहे हे दुर्दैव आहे. ते जर खरंच आपलं मत मांडतील तर अशा संस्थांना आपला गाशा गुंडाळावा लागेल यात शंका नाही !

—विष्णू जयदेव

पुण्याच्या स्टेट बँकेच्या प्रादेशिक कार्यालयाचे प्रमुख कै. प्रभाकर विष्णु जठार यांचे गेल्या वर्षी भीषण अपघातात निधन झाले.
त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त पुण्याच्या मॉडर्न महाविद्यालयामध्ये 'कै. जठार स्मृति व्याख्यानमाला' यंदापासून सुरू होत आहे....
जठारांची ही ओळख—

# बँक अधिकारी.... असाही

डॉ. भीमराव कुलकर्णी

महाभारताच्या वनपर्वाशी अशुभतेचे किंवा अनिष्ठतेचे नाते जडले आहे.

वर्षापूर्वीची गोष्ट. फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये मी एम्. ए. ला मुक्तेश्वर शिकवीत होतो. 'आदि', 'सभा' ही पर्वे शिकविल्यानंतर 'वनपर्व' शिकविण्यासाठी मी तौलनिकदृष्टया अभ्यास करावा म्हणून चिपळूणकर मंडळीने प्रसिद्ध केलेल्या महाभारताच्या वनपर्वाचे भाषांतर वाचीत होतो; परंतु काही केल्या वनपर्वाबद्दलच्या अशुभ संकेताचे विचार मनातून जात नव्हते.

संस्कृत भारताचे तेलगु भाषांतर करणाऱ्या अनेक संपादकांची वनपर्वाजवळ आल्यानंतर मृत्यूशी गाठ पडली होती. चिपळूणकर मंडळींची वनपर्व जवळ आल्यावर दशादशा होऊन वाताहत झाली होती. महाभारताच्या संशोधित आवृत्तीचे संपादक डॉ. वि. स. सुखटणकर यांचे वनपर्व प्रसिद्ध झाल्यानंतर अल्पावधीतच निधन झाले होते ! या दुर्दैवी प्रकाराचा वनपर्वाशी काही संबंध नाही. काही तरी खुळचटपणा आहे झाले, अशी मनाची समजूत घालीत मी वनपर्व अस्वस्थ चित्ताने वाचण्याचा प्रयत्न करीत होतो.

फर्ग्युसनमध्ये वनपर्वाचे प्रास्ताविक करून मी घरी येऊन अंगावरचे कपडे उतरीत होतो तेवढ्यात दूरध्वनीवर माझ्या नावाचा हाकारा झाला धावत जाऊन मी फोन घेतला.

चंदीगडजवळ झालेल्या भीषण अपघातात माझे दोन्ही साडू आणि एक मेहुणी यांचे निधन झाले होते आणि दुसरी मेहुणी अत्यवस्थ अवस्थेत इस्पितळात होती !

माझे ज्येष्ठ साडू कै. प्रभाकर विष्णु जठार हे पुण्याच्या स्टेट बँकेच्या प्रादेशिक कार्यालयाचे प्रमुख होते. दुसरे कै. देऊस्कर हे पोरबंदरच्या सिमेंट फॅक्टरीचे अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झाले होते आणि नुकतेच सेवानिवृत्तीनंतर सुखाने आयुष्य कंठण्यासाठी सपत्नीक पुण्यास आले होते. पुण्यास त्यांनी बांधलेले घर भाड्याने दिले होते, भाडेकऱ्यांनी स्वतःचे घर बांधावयास काढले होते. ते पुरेही झाले होते; परंतु पितृपंधरवड्यात नव्या घरात राहावयास जाऊ नये, असा संकेत असल्याने ते पंधरवड्याने जागा खाली करणार होते.

पृष्ठ २७ वर

# मुक्ताफळे

## दिवाळी शुभेच्छा

शुभेच्छा देण्याची पद्धत आपण थोर इंग्रजांपासून शिकलो. पत्रातून लहानांस आशीर्वाद आणि एखादा सरकारी अंमलदार बदलून गेला वा बदलीवर गेला तर त्याला 'पानसुपारी' करण्याचा रिवाज काय तो आपल्याकडे होता. आशीर्वाद द्यायला वयाने मोठे असून शिवाय लायकी असावी लागते म्हणूनच थोरामोठ्यांचे आशीर्वाद असा शब्दप्रयोग रूढ झाला. पानसुपारी कार्यक्रमात शुभेच्छा गृहीत असल्या तरी तो मुख्यत: निरोपसमारंभ असे. एखाद्या द्वाड आणि अन्यायी सरकारी अंमलदारालाही हाताखालच्या लोकांना पानसुपारी करावीच लागे. गुजरायेत–उत्तर भारतात अशा पानसुपारीसमारंभाला 'मुबारकबादी' म्हणत.

एखाद्या जाहीर सामाजिक वा राजकीय घटनेबाबत चांगल्या इच्छा व्यक्त करण्याचा अधिकार पत्रकर्त्या संपादकाला असतो. इंग्रजी राज्य भारतावर झाले तेव्हा थोर थोर पत्रकारांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. बाळशास्त्री जांभेकरांनी लिहिले–

'सांप्रत जेणेकरून इंग्लिश लोकांचा अंमल दृढ बनेल अशी कोणतीही गोष्ट जरी झाली, तरी तिचा खेद मानू नये. कारण इंग्लंडातील सरकार इंग्लिश लोकांकरवी या देशचे लोकांना शिकवण्याचे श्रम करीत आहेत. यात उभयतांचे कल्याण आहे. नेटिव्ह लोकांनीं सांप्रत इंग्लिश लोकांप्रमाणे विद्वान मात्र झाले पाहिजे.'

या शुभेच्छेचे सांप्रत नेटिव्ह विद्वान नेमके काय बरे करीत आहेत, हा प्रश्न आपण तूर्त बाजूस ठेवू. लोकहितवादींनी बाळशास्त्र्यांवर मात केली. त्यांनी लिहिले–

'ईश्वराने या देशात इंग्रजांना पाठवले तेव्हा साक्षात शहाणे लोकांची गाठ पडून हिंदू लोकांच्या वाईट चाली बहुत सुटल्या व आणखीही सुटतील. इकडील लोक राज्याचे कारभार वगैरे चांगले करू लागले, लाच खाण्याचे सोडून दिले, म्हणजे बहुतकरून मोठाली गव्हर्नरीची कामेदेखील त्यांचे हाती येतील–आणि मग अर्थातच इंग्रज फक्त व्यापार करत रहातील. देश सुधारण्यास विलंब लागतो. लहान मुलगा हुषार होण्यास दहा–वीस वर्षे लागतात; मग देश चांगला होण्यास अर्थातच दोनशे–चारशे वर्षे लागतील !'

१८६० ची ही शुभेच्छा. आता कोठे सव्वाशे वर्षे होत आली आहेत. आपला देश चांगला होण्यास लगतचा काळ सन २०६०. उशीरात उशीर म्हणजे सन २२६० होणार. आपण त्या वेळी हयात नसणार, आपली मुले-बाळे नसणार, नातवंडेदेखील नसणार ! तशाच ह्या शुभेच्छाही प्रत्यक्षात येण्याचे पहाणे आपल्या नशिबात दिसत नाही !

विष्णुशास्त्री चिपळूणकरांची शुभेच्छा मात्र काही अंशी खरी ठरली आहे. त्यांची शुभेच्छा होती–

'जो जो आपल्या देशात इंग्रजी विद्येचा प्रसार होत जाईल, तो तो सुधारणा–स्वातंत्र्य–सुख यांची वाढ अवश्य होत जाणार !'

सुधारणा खूपच झाल्या. धोतरे इतिहासजमा होत चालली आहेत. पगड्या–बाराबंद्या केव्हाच वस्तुसंग्रहालयात गेल्या. घाटींना बटणे आली. अगदी अशिक्षित खेडुत स्त्रिया सोडल्या तर सर्व स्त्रिया गोल गुंडाळू लागल्या आहेत. स्त्रियांनी केस कापणे लोकप्रिय झाले आहे. साधुसंत, शिवाजीभक्त व काही कलात्मक चित्रपटांचे हिंदी–बंगाली दिग्दर्शक वगळता, माणसे एक दिवसाआड तरी दाढ्या करू लागली आहेत. राजकीय स्वातंत्र्य केव्हाच आले, स्त्री–स्वातंत्र्य धडाक्याने येऊ घातले आहे. सर्व वृत्तपत्रांच्या रविवार आवृत्त्यांतून पन्नासावर विचारवंत बायका–'स्त्री–स्वातंत्र्य' या एकाच विषयावर लिहीत आहेत. दूरदर्शन–संच आला आणि दहा वर्षांपूर्वीच सुखाचीही कमाल झाली. क्रिकेटची मॅच, थोर थोर हिंदी चित्रपट, त्यातील नायक–नायिकांची धक्काबुक्की, उघड्या मैदानावरची, बागेतली वा समुद्रकाठची प्रयासपूर्ण लोळणक्रीडा, घरात बसल्या–बसल्या आबालवृद्धांना आज एकत्रितपणे पहाता येते. एखादे मराठी नाटक चालणार नाही, असा संशय येताच ते दूरदर्शनवर आग्रहपूर्वक दाखविण्याची प्रथा पडली आहे. त्या नाटकावर चर्चादेखील करतात. तेव्हा सुधारणा–स्वातंत्र्य–सुख या गोष्टी दिवसेंदिवस वाढत आहेत.

परंतु आम्ही म्हणतो त्या या शुभेच्छा नव्हेत. कुणाचा वाढदिवस असला तर 'हॅपी बर्थ डे टू यू' असे फोनवरून सांगावे किंवा त्याला पोस्टाने अशा मजकुराचे ग्रीटिंग पाठवावे. नव्या वर्षाच्या सुरुवातीला, सणाला 'नवे वर्ष सुखाचे जावो' किंवा 'ही दिवाळी आनंदाची जावो' असे मुद्दाम कळवण्याची जी शुभेच्छा देण्याची पद्धत आता रूढ होत आहे–हे आंग्ल संस्कृतीने आपल्याला दिलेले मोठे वरदान आहे.

आम्हीही येत्या दिवाळीच्या निमित्ताने शुभेच्छा देऊ इच्छितो. देशाला आणि देशबांधवांना पत्रकार असल्याने आम्ही आमच्या लेखनातून आठवड्याच्या आठवड्याला आतापर्यंत शुभेच्छा देत आलो आहोत, यापुढेही देत राहूच. २०६० ते २२६० या काळातच त्याचा परिणाम दिसू शकणार आहे हे आमचे दुर्दैव ! आम्हाला शुभेच्छा द्यायच्या आहेत त्या आमच्या वाचकांना. आम्हाला वाचकांचा विचार करता स्मरण होते ते टी व्ही. पुढे सुखाच्या अत्युच्च शिखरावर, रोज सायंकाळी सहापासून ते टी. व्ही. बंद होईपर्यंत आरूढ होणाऱ्या असंख्य ओनरशिप फ्लॅटकऱ्यांचे आणि बंगलेवाल्यांचे. कारण आम्ही लिहिलेले चुकूनमाकून वाचणारी माणसेदेखील हीच आहेत. या सर्वांना आमच्या या दिवाळी शुभेच्छा–

स्वच्छ मोत्यासारखे दात ही आरोग्याची गुरुकिल्ली आहे. तुमचे व तुमच्या मुलांचे दात जर किडलेले असतील किंवा त्यात

पोकळी असल्याने, त्यात अन्नाचे कण अडकून खराब होत असतील किंवा तुमच्या श्वासोश्वासामुळे ऐन समारंभात रंगाचा बेरंग होणार असेल तर रोज सकाळी व रात्री दूरदर्शन-कार्यक्रम पाहून झोपण्यापूर्वी कोलगेट टूथ पावडरने दात स्वच्छ करण्याचा उत्साह व आठवण तुम्हाला राहो.

जर कोणी विको वज्रदंती वापरत असतील तर त्यांना वर्षभर काश्मिरी सफरचंदे खाण्यास मिळोत.

सर्व पुरुषांचे चेहरे सारखे नसतात. कपिलदेवसारखा चेहरा असण्याची सर्व पुरुषांना गरज नाही; परंतु कपिलदेवप्रमाणेच सर्वांच्या दाढ्या इरॅस्मिक साबणानेच मऊ होतात. इरॅस्मिक साबण व ब्लेड वापरून, चेहरा मऊ-मुलायम व गुळगुळीत केल्यानंतर तुमच्या गालावरून सुंदर सुंदर तरुणींचे हात फिरोत.

तुमच्या वयात येणाऱ्या मुलीने हळदीपासून बनवलेले विको आयुर्वेदिक टर्मरिक क्रीम' वापरलेच असणार. तिच्या त्या सुंदर रूपावर भाळून तुम्हा सर्वांना 'फॉरिन-अन्‌रिपिण्डेबल' जावई मिळो !

लाइफबॉय साबणाचा-आंघोळीला एक सबंध वडी असा वापर आणि व्हिक्स व्हेपोरबच्या गोळ्या यांचा मुक्त उपयोग केल्यावर, आपणास डॉक्टराकडे जाण्याचा प्रसंग कधीही न येवो !

तुमचे पांढरेशुभ्र शर्ट, रिन डिटर्जंट साबणाने धुतल्यावर कॉलेजजवळच्या भागातही पांढरेशुभ्र राहोत. या साबणाने धुतलेले शर्ट-चड्ड्या व फ्रॉक घातलेल्या तुमच्या मुलामुलींना सारखे नाचावेसे वाटो.

'पोस्टमन' वनस्पती तुपात तळलेल्या पुऱ्या पाहून, नवरा लाडात आल्याने 'इश्श' म्हणण्याची संधी सर्व बायकांना वारंवार मिळो.

आठवड्याला जे किमान पंधरा भाग्यवान महाराष्ट्र राज्य लॉटरीमुळे लखोपती होतात, त्यात तुमचा प्रत्येकाचा आळीपाळीने नंबर लागो.

पोस्टाची सहा वर्षांत पैसे दुप्पट करणारी मालिका खरेदी केल्यानंतर, ही सर्टिफिकिटे किरकोळ खर्चासाठी पूर्ण काळ संपण्यापूर्वीच मोडण्याचा प्रसंग तुमच्यावर न येवो.

सर्वांत शेवटी शुभेच्छा एकच द्यायची की, दिवाळीत दूरदर्शनकेंद्र विशेष कार्यक्रम सादर करील, त्या वेळी आपल्या टी. व्ही चा आवाज मध्येच न जावो, आवाज ठीक असेल तेव्हा वीजप्रवाह खंडित न होवो आणि आवाज ठीक असेल व वीजप्रवाहदेखील खंडित नसेल तेव्हा कमीत कमी अनामिक व्यत्ययात त्याचा आनंद आपणास लाभो.

—ग्यानबा



## ह्या ना त्या निमित्ताने

# ९४ वा कौरव

फिरोझ रानडे

श्याम त्या सगळ्या गोंधळात कसा काय गोवला गेला होता हे लोकांनाही कळत नव्हते व श्यामलाही कळत नव्हते; पण तो होता मध्यवर्ती सरकारचा नोकर. मध्यवर्ती सरकारच्या नोकरांना वेळोवेळी भारताच्या कुठल्याही प्रांतात जाण्याची वेळ येते. कोणत्याही प्रसंगी ते हजर राहू शकतात. तसेच आपण येथे पाठवले गेले आहोत अशी त्याने आपली समजून करून घेतली.

तसा तो होता दिल्लीतच पण ती दिल्ली सध्याच्या दिल्लीपेक्षा अगदी वेगळी वेगळी वाटत होती. एशियाड झाले नसल्यामुळे दिल्लीत उडते पूल नव्हते की टोलेजंग हॉटेल्स नव्हती. एवढंच कशाला ह्या राष्ट्रपतिभवन व सचिवालय वा पार्लमेंटच्या इमारती पण नव्हत्या.

जशा आधुनिक इमारती नव्हत्या तसेच आधुनिक रस्ते नव्हते, आधुनिक दुकाने नव्हती, मोटारी किंवा बशीसारखी आधुनिक वाहने पण नव्हती. एवढेच काय लोकांचे म्हणजे बायका-पुरुष-मुलाबाळांचे कपडेलत्ते सुद्धा आधुनिक काळातले नव्हते.

श्यामला आपण हे सगळे कुठे तरी पूर्वी पाहिलय वा ह्याबद्दल वाचलय असे सारखे वाटत होते; पण हे कोणत्या काळातले असावे ह्याबद्दल त्याचे डोक्यात काही केल्या प्रकाश पडेना; पण डोक्यात प्रकाश पडला नाही म्हणून सरकारी अधिकाऱ्यांचे अडलंय कधी तरी? श्यामने पण आपले अडू न देण्याचे ठरवले व जे जे काय होत राहिलं, ते ते खिशात हात घालून मजेने बघत रहावे असे मनाशी योजले.

खिशात हात घालून बघत रहाणे हे मध्यवर्ती सरकारच्या अगदा गृहमंत्र्यांपासून सगळ्यांना अगदी सहज व छान जमते. कुठेही दंगा-धोपा होवो, कुठल्याही सीमेवर परकीय सैन्याची जमवाजमव होवो, मध्यवर्ती सरकार खिशात हात घालून परिस्थिती शांतपणे पहात असते.

श्यामचेही तसेच होत होते. दिल्लीतल्या पुराणा-किल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात श्याम होता. लोकांची भरमसाठ घाई-गर्दी चालली होती. एक घोडेवाले रथ, दोन घोडेवाले रथ, चार, सहा, आठ, बारा, जसे ज्याला जमेल व जशी ज्याची आर्थिक परिस्थिती असेल त्याप्रमाणे घोडेवाले रथ रस्त्यातून जात-येत होते. काही लोक त्या रथांच्या बाजूने धावत होते, काही नुसतेच घाईघाईने चालले होते.

जसाजसा वेळ जाऊ लागला तसतशी श्यामच्या एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे पुराणा-किल्ल्याच्या दिशेने जाणाऱ्या रथातल्या लोकांचे चेहरे मोठे उमदे, उत्साही दिसत होते, तर तेथून परत येणाऱ्या लोकांचे

चेहरे निर्जीव, हताश असे दिसत होते. ह्याचे काय कारण असावे बुवा ? असा मनाशी प्रश्न विचारत व त्याचे उत्तर शोधे–शोधेपर्यंत श्याम स्वत: पुराणा किल्ल्यापर्यंत पोहोचला. त्याला कुठे आडकाठी नव्हतीच. त्यामुळे तो मुख्य प्रवेशद्वारातून आत गेला.

प्रवेशद्वाराच्या उजव्या हाताला मोठया स्वागतकक्षाची इमारत होती. इमारतीच्या बाहेर मघाशी म्हटलेले वेगळे वेगळे घोडेरथ उभे होते. घोडेरथ–मालक, कोणी अगदी बाहेर कंपाउंडच्या बाहेर होते, कोणी इमारतीच्या प्रवेशद्वाराशी होते. कुणी आत चालले होते. काहींना प्रवेशद्वाराशीच अडवले जात होते, काहींना इमारतीत जाऊ दिले जात होते; पण मुख्य दालनात जाऊ दिले जात नव्हते.

श्याम आत गेला. मुख्य दालनाच्या पुढेच एक दालन होते. तेथे चार–सहा माणसे मोठया हमरी–तुमरीने वाद घालत होती. श्यामचे सुदैव एवढेच की तो वाद आपल्या राष्ट्रभाषेतच चालला होता. इमारती, कपडे-लत्ते, वाहने वेगळया पद्धतीची असली तरी ह्या लोकांची भाषा मात्र हिंदीच आहे ह्याचा श्यामला आनंद झाला व त्याचा हिंदी भाषेबद्दल आदर वाढला.

त्यांच्या वाद–विवादावरून ते लोक काही तरी यादी करताहेत हे श्यामच्या लक्षात आले. त्याचबरोबर त्याच्या हेही लक्षात आले की ही यादी सामाना–सुमानाची नाही. ही यादी फळा-फुलांची पण नाही, तर ही चक्क माणसांच्या नावांची आहे. तेव्हा त्यांचे बोलणे श्याम टवकारून ऐकू लागला.

'हं, पहिलं नाव दुर्योधनाचे, हे पक्के झाले ?' पहिल्याने सगळयांकडे पाहून विचारले. सगळयांनी संमतिदर्शक मुंडया हालवल्या.

'आता दुसरे दु:शासनाचे ?' परत पहिल्याने विचारले व परत सगळयांनी संमतिदर्शक मुंडया हालवल्या.

श्यामला ही भानगड कळेना. त्या यादी करणाऱ्या चार–पाच लोकात एकजण बाजूला मख्ख चेहऱ्याने बसला होता. श्यामने त्याला कसल्या याद्या चालल्या आहेत म्हणून विचारले. ह्या गृहस्थाला गेले चार–सहा महिने तयार होत असलेल्या यादीबद्दल काही माहिती नसावी ह्याचे त्या मख्खाला आश्चर्य वाटले. ते त्याच्या मख्ख चेहऱ्यावर दिसले.

त्या मख्ख चेहऱ्यावरचे आश्चर्य पहाताच श्यामला आपले काही तरी चुकले आहे हे लक्षात आले. बोलून-चालून तो सनदी नोकर होता. त्याने पवित्रा बदलला.

'पण काय हो, ही नावे मुळात सूर्योधन व सु:शासन अशी आहेत ना ? मग हे दुर्योधन व दु:शासन कसे ?' श्यामने वेगळयाच विषयात हात घातला. त्याचे त्या मख्खाला पण बरे वाटले. तो समजून सांगण्याचे आवाजात म्हणाला,

'अहो कोणत्याही वाईट गोष्टीला, वाईट माणसाला 'सु' हा शब्द काढून 'दु:' लावण्याची प्रथा आहे !'

म्हणजे पूर्वी 'सूर–दर्शन' व 'सूर–ध्वनी' होते व त्यांचा वाईटपणा कळल्यावर लोकांनी त्याला दू:र–दर्शन व दू:रध्वनी म्हणायला सुरुवात केली की काय ? श्यामच्या मनात प्रश्न आला. पण तसे विचारणे म्हणजे आपल्याच सरकारी भावंडखात्यावर टीका झाली असती म्हणून तो चूप राहिला.

त्या यादी करणाऱ्यात आता फारच रागा रागाची चर्चा चालली होती. एकजण नाव सुचवी, त्याचे गाव सांगे, जात–पात सांगे व त्याचे यादीत नाव येणे कसे आवश्यक आहे ते सांगे. त्याचे ते सांगणे झाले की बाकीचे त्याच्यावर तुटून पडत. तो आणीबाणीच्या प्रसंगी कसा वागला, तो धोकेबाज कसा आहे वगैरे सांगत.

हेच कुणीही कुणाचेही नाव सांगितले की होत असे. कोणाचेही नाव काढा बाकीचे त्यात काही तरी खोड काढत.

'हे आता असे किती वेळ चालणार ?' श्यामने घायकुतीला येऊन विचारले.

'उगाच टाइम-पास करताहेत. विचारतो कोण ह्यांच्या याद्यांना ? शेवटी माताजी म्हणतील तीच खरी नावे व तीच खरी यादी !'

'माताजी म्हणजे आपल्या ह्या ना...?' श्यामने नाव सांगण्याचे टाळले. आपल्या वेळच्या माताजी ह्यांच्या वेळी कशा असतील ? एवढाच त्याने सारासार विचार केला होता.

'हो. त्याच म्हणजे आपल्या गांधारीमाता !'

'अरे, पण त्यांनी आपले डोळे बांधून घेतले आहेत ना ? त्यांच्या...म्हणजे आपल्या महाराजांना दृष्टी नाही म्हणून ? मग त्या यादी बघतील कशा ? माणसे ओळखतील कशा ?' आजकाल दृष्टी नसलेले लोक सुतारकाम, लोहारकाम, टंकलेखन वगैरे करतात हे त्याला माहीत होते; पण पाचपन्नास लोकांच्या याद्यासुद्धा ही दृष्टी नसलेली माता करते, हे ऐकून श्याम थक्क झाला !

'अहो, त्यांनी डोळयावर पट्टी बांधून घेतली आहे म्हणून काय झाले ? त्यांना जी दृष्टी आहे ती ह्या उघडया डोळयांच्या व चष्मे लावणाऱ्यांनापण नाही, समजलात ?'

श्याम काय समजावयाचे ते झटक्यात समजला. त्याच्या वेळची गांधारीमाता पण दृष्टिहीन होती. जुन्या गांधारीने कापडी पट्टा बांधला होता. श्यामच्या गांधारीमातेने निरंकुश सत्तेचा पट्टा बांधला होता. परिणामी एकच ! तरीसुद्धा श्यामची माता बाकी लोकांपेक्षा डोळस होती.

'शेवटी माताजी म्हणतील तीच खरी यादी !' असे तो मख्ख चेहऱ्याचा माणूस म्हणाला होता ते खरेच होते.

होता होता यादी करण्याची प्रक्रिया संपली. ते सगळे लोक आतल्या दालनात गेले. माताजी तेथे भव्य आसनावर बसल्या होत्या. त्यांच्या डोळयाला पांढरी पट्टी बांधली होती. बाकी लोक उभेच होते.

'हं, कसली यादी आणली आहेत आज ?' त्यांनी अर्थातच राष्ट्रभाषेत विचारले.

'आपल्या त्या दक्षिण राज्याची.' दक्षिण राज्याला शोभेल अशा दक्षिणी रंगाच्या माणसाने उत्तर दिले.

'किती नावे आहेत ?' परत उच्च आसनावरून प्रश्न.

'काही तरी ९३ कौरव आमच्या यादीत आहेत.' परत दक्षिणी उत्तर.

'कौरव ? म्हणजे ? अहो, कौरव म्हणजे आपल्या गांधारीमातेचे सख्खे पुत्र ना ?' श्याम माताजीसमोर कोणीही बोलायचे नाही हा संकेत मोडून त्या मख्ख माणसाला विचारता झाला.

'कमाल आहे तुमची. सगळे कौरव काही माताजींची मुले नाहीत. ती सगळी मुलां-

सारखी आहेत. मुलांसारखी वागतात. मातेचा शब्द मोडत नाहीत, मातेचे मन दुखावत नाहीत. ही गुणी मुलांची यादी चालली आहे व त्या यादीत आपले व आपल्या भाऊबंदांचे नाव यावे ह्याच्या खटपटीत सगळेजण आहेत.'

'ती यादी वाढता वाढता आता ९३ झाली आहे. म्हणून ते ९३ कौरवांची यादी म्हणत होते.' श्याम आपल्याला सगळे कसे झटकन कळले ते सिद्ध करण्याकरता म्हणाला.

'बरोबर!' तो मरुख माणूस म्हणाला.

श्यामला व त्या मरुख माणसाला आपण फार हळू आवाजात बोलतो आहोत असे वाटत होते व ते तसे हळू बोलत पण होते.

पण गांधारी–मातेचे कान बाकी अवयवां-प्रमाणे तीक्ष्ण होते.

'कोण बोलला रे तो तिकडे?' त्यांनी रागारागाने विचारले.

सगळयांची भीतीने गाळण उडाली. जो तो श्यामकडे पाहू लागला. हा कोणाचा कोण हे कोणालाच माहीत नव्हते.

'ह्याचे नाव आहे यादीत? हा साधा-भोळा व माझी आज्ञा मानणारा वाटतोय!'

आता प्रत्यक्ष मातेने श्यामला भोळा–साधा म्हटल्यावर बाकी त्याला काय विरोध करणार? कपाळ!

'हो, हो! हा फारच साधा-भोळा आहे व तुमची आज्ञा ऐकेल!' 'सगळे जण ग्रीक नाटकातून एकदम मंत्रासारखे म्हणतात तसे म्हणते झाले.

'मग घ्या त्याला कौरवमंडळात!' मातेने हुकूम सोडला.

'नही, नही मुझे नही होना है कौरव!' श्याम झोपेतून दचकून उठून ओरडत म्हणाला.

त्याचे ओरडणे ऐकून राधा पण दचकून उठली. पाण्याचे भांडे श्यामचे हाती देत म्हणाली–

'आता तुम्हाला हिंदीत स्वप्ने पडायला लागली वाटतं?'

'म्हणजे ते सगळे स्वप्न होते की काय?' श्याम घटाघटा पाणी पिऊन झाल्यावर म्हणाला.

'तर काय!' परत राधा. 'आणि कौरव होने का नही' असे काय ओरडलात?'

श्यामने आपले स्वप्न खुलवून खुलवून सांगितले पण ते ऐकल्यावर राधा भडकली. 'अहो कधी नव्हे ते कॉंग्रेस कार्यकारणीचे सभासद होण्याची संधी आली होती तीही घालवलीत ना?

'अग पण...' श्याम तोतरत काही बोल-णार होता.

'मला माहीत आहे तुमचा नेभळा स्वभाव!' असे राधा रागारागाने म्हणाली व तोंड फिरवून झोपी गेली.

आता तोंड फिरवलेल्या बायकोला काय सांगणार? श्यामने परत एक पाण्याचा घोट घेतला. □

---

श्रीनगर–विरोधी पक्ष परिषद

# एन. टी. रामाराव, फरुक अब्दुल्ला हेगडे यांचे भवितव्य काय?

अभय गोखले

आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री एन. टी रामाराव व जम्मू–काश्मिरचे मुख्यमंत्री फरुख अब्दुल्ला हे विरोधी पक्षांच्या ऐक्यविषयक परिषदा घेऊन राष्ट्रीय पातळीवर स्वतःचे स्थान निर्माण करण्याच्या प्रयत्नात असताना त्यांच्या राज्यात मात्र परिस्थिती फारशी उत्साहवर्धक दिसत नाही. या दोघांचेही स्थान त्यांच्या राज्यात पूर्वीइतके बळकट राहिलेले नाही. आंध्र प्रदेशात इंदिरा कॉंग्रेस सत्तेवर असताना मनमानीपणे तेथील मुख्यमंत्री बद-लण्यात आले. बहुतेक सर्व आमदारांना निर-निराळया मंत्रीमंडळात मंत्रीपद देण्यात आले. भ्रष्टाचार शिगेला पोचला. तेलगु जनतेच्या आशा-आकांक्षा पायदळी तुडवण्यात आल्या. त्यातूनच नंदामुरी ताराका रामाराव नावाची प्रचंड शक्ती उदयास आली व तिने इंदिरा कॉंग्रेसची सत्ता उलथवून लावली. एन. टी. रामाराव या आंध्रमधील लोकप्रिय नटाने तेलगु जनतेच्या प्रादेशिक भावनांना खतपाणी घालत अवघ्या सहा महिन्यात तेलगु देशमची उभारणी करुन आंध्रमध्ये सत्ता काबीज केली ती २९४ जागांपैकी २०३ जागा जिंकूनच. तेलगुदेशमने इं. कॉंग्रेसचा धुव्वा उडवलाच; पण इतर तथाकथित राष्ट्रीय पक्षांचा पाला-पाचोळा केला. मात्र त्यानंतर आंध्रात ज्या घटना घडत आहेत त्यावरुन आंध्रमधील जनतेने इंदिरा कॉंग्रेसला धडा शिकवण्यासाठी नकारात्मक मतदान केले असा अर्थ लावावा लागत आहे.

मुळात एन. टी. रामाराव हा नट असल्याने तो राजकारणात नवीन आहे, शिवाय कोण-त्याही राजकीय घोषणा करताना त्याची व्यव-हार्यता तपासून पाहण्याची तो तसदी घेत नाही. त्या घोषणांची आर्थिक बाजू समजून घेण्याची त्याला गरज भासत नाही. निवड-णुकीच्या जाहीरनाम्यात एन. टी. रामारावने २ रु. किलोने तांदूळ गरीबवर्गाला पुरवण्याचे अश्वासन दिले होते. सुरुवातीला त्यात उत्साह दिसून आला; पण नंतर कार्यक्रमाला आर्थिक झळ पोचून तो पूर्णपणे अमलात आणणे अशक्य झाले. गरीबवर्गाकरीता २० लाख पक्की घरे बांधण्याची एन. टी. आर.ची घोषणा म्हणजे त्याच्या आर्थिक अज्ञानाबद्दलचे एक द्योतकच होते. आताच्या एकंदर हालचाली-वरून पाच वर्षात चार लाख घरे बांधून झाली तरी रामारावला शाबासकी द्यायला हवी. अराजपत्रित सहकारी कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ५८ वरून ५५ वर आणण्याची त्याची घोषणा चांगली होती; परंतु त्यामुळे १४ लाख बेकारांना काम मिळेल ही आकडेवारी फसवी ठरली. कारण त्याच्या या घोषणेलाच आव्हान देण्यात आले. सरकारी कर्मचाऱ्यांचा संप वाटाघाटीने समाधानकारकरीत्या सोडवण्यात रामारावला अपयश आले. मुळात राजकार-

माणसाला राजकारणाची जी खाज असावी लागते ती रामारावला नाही. त्याचा पिंडच राजकारणीनसल्याने कित्येक बाबतीत तो घोषणा करून गोत्यात येतो. विधानसभेत पक्षांच्या विरोधी प्रश्नांना नीट उत्तरे देऊ शकत नाही. सरकारी कर्मचारी साफ त्याच्या विरोधात गेले असून त्यांची संख्या दुर्लक्षण्यासारखी नाही. हैदराबाद येथील हिंदू-मुसलमान दंगे हाताळतानाही त्याची कामगिरी निराशाजनक होती. त्यामुळे इंदिरा कॉंग्रेसला आरडा ओरड करायला व मुसलमानांतील आपले गमावलेले स्थान व प्रतिष्ठा मिळविण्यास मदत झाली. विधानसभांच्या निवडणुकांपासून हैद्राबादेत किमान तीन वेळा दंगा झाला. आता ऑल्विन कंपनीतील दर्ग्यावरून जो दंगा झाला त्यात किमान ४६ लोक ठार झाले. मात्र ही संख्या बरीच जास्त असण्याची शक्यता आहे. या दंग्याच्या बाबतीतही रामारावाने खूपच गलथानपणा केला. कर्फ्यू नीट जारी करण्यात आला नाही. राज्य पोलिसांच्या मदतीला केन्द्रीय राखीव दलाची कुमक घेण्यात आली नाही तेलगू गंगा प्रोजेक्टच्या बाबतीतही तोच गलथानपणा दिसून येतोय. या प्रोजेक्टला ७०कोटी रुपये खर्च येणार आहे पण; हे काम कॉंट्रॅक्टर मार्फत न करता श्रमदानाने करण्याची त्याची कल्पना आहे. या प्रोजेक्टची व्याप्ती लक्षात घेतली तर श्रमदानाच्या कल्पनेतील मूर्खपणा लक्षात येईल.

## आंध्र-काश्मीर

आणि राजकीय सामसूम नाहीये, तेथे सुंदोपसुंदी चालूच आहे. पक्षविरोधी कारवायांबद्दल दोन आमदारांना अगोदरच काढून टाकण्यात आलंय. त्यातील एकाला तर बराच त्रास देण्यात आला मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराची तथाकथित प्रकरणं बाहेर येताहेत; परंतु त्या विरुद्ध अजून तरी कोणतीही अॅक्शन घेण्यात आली नाही. रामारावाचा आपल्या सहकाऱ्यांवरचा विश्वास उडाला असून आता घरातील नातेवाइकांशिवाय तो कोणावरच विश्वास टाकत नाही. या बाबतीत त्याची अवस्था इंदिरा गांधींसारखीच झाली असून त्यांच्याप्रमाणे त्याला संशयाने पछाडले आहे. रामारावाचा मोठा जावई व माजी इंदिरा कॉंग्रेसचा मंत्री चंद्रा बाबु नायडू हा आता राजीव गांधीप्रमाणे तेलगु देशमचा सर्वेसर्वा होऊ पहात आहे व त्यात रामारावाची त्याला चांगली साथ आहे. हा नायडू अजून तेलगु देशमचा साधा सभासदही नाही असे म्हणतात. रामारावाचा दुसरा जावई वेन्कटेश्वराव हा तेलगु देशमच्या युद्धविंगचा प्रमुख आहे अर्थात तेलगु देशमची ही युवक आघाडीही महिला आघाडीप्रमाणे नामधारी आहे. मात्र आंध्र राजकारणातील खरी झुंज व रामारावची डोकेदुखी आहे ती अर्थमंत्री एन. भास्कर व पक्षसरचिटणीस के उपेंद्र यांच्यातील लठ्ठालठ्ठी. हे दोघेही नेते महत्त्वाकांक्षी आहेत आणि मुख्यमंत्रीपदावर डोळा ठेवून आहेत. मात्र एन. भास्कररावला खेळवण्याकरिता रामाराव के. उपेंद्रचा चांगला उपयोग करत आहे. भास्करराव हा स्वतःला रामारावाचा प्रतिस्पर्धा समजतो. तेलगु देशमच्या यशात त्याचाही मोठा वाटा आहे. रामारावला सत्तेची विशेष हाव नसल्याने तो आपल्याला मुख्यमंत्रीपद देईल अशी आशा भास्कररावलासुरुवातीला वाटत होती पण त्यामुळे तो निराश झालेला नाही. मात्र अंदाजे ६० ते ७० आमदार त्याच्या पाठीशी असल्यानेरामाराव एन. भास्कररावला हात लावू शकत नाही. रामाराव व भास्करराव यांनी कॉंग्रेसचे तेलंगणातील बडे नेते चेन्ना रेड्डी यांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. चेन्ना रेड्डी हे त्यांना कॉंग्रेसमध्ये महत्त्वाचे स्थान न दिल्याने नाराज आहेत. मात्र आंध्र राजकारणातील त्याचे सामर्थ्य लक्षात घेता एन भास्कररावच्या मदतीने ते रामारावला सुरुंग लावू शकतात. तेव्हा रामारावचा आपल्य सहकाऱ्यांवरील विश्वास उडण्यास वरील गोष्टी कारणीभूत आहेत. रामाराव आता त्यांचे दोन जावई व के. उपेंद्र यांच्यावर भिस्त ठेवून आहेत. मध्यावर्ती निवडणुका झाल्या तर रामारावच्या तथाकथित लोकप्रियतेचा फुगा फुटू शकेल मात्र तशी संधी साधून घेण्याच्या परिस्थितीत अंतर्गत यादवीने पोखरलेला इंदिरा कॉंग्रेस पक्ष नाही आणि इतर विरोधी पक्ष तर आंध्रप्रदेशात नगण्यच आहेत.

जम्मू—काश्मिरची निवडणूक जिंकल्यानंतर डॉ. फरुक अब्दुल्ला यांच्या साडेसातीला सुरुवात झाली आहे. इंदिरा गांधींनी फरुक अब्दुल्लांच्या नॅशनल कॉन्फरन्सला हरवण्यासाठी जंगजंग पछाडले; पण जम्मूतील हिंदूंचा भरभक्कम पाठिंबा सोडला तर काश्मिरमधील मुसलमानांनी त्यांना हात दाखवला. जम्मूमध्ये त्यांना बऱ्याच जागा मिळाल्या; परंतु फक्त हिंदूंनीच पाठिंबा दिल्याने त्यांच्या पक्षाची हिंदूंचा पक्ष अशी त्यांना नको असलेली प्रतिमा तयार झाली. काश्मिरमध्ये त्यांना एकच जागा मिळाली आणि त्यांचे मुफ्ती मोहोमद सईदसारखे नेते पराभूत झाले. निवडणुकीच्या काळात इंदिरा कॉंग्रेस व नॅशनल कॉन्फरन्सच्या कार्यकर्त्यांत बरीच हाणामारी झाली. निवडणुकीत मतदानाच्या बाबतीत बरेच फसवाफसवीचे प्रकार झाले, निवडणूककेंद्रे ताब्यात घेण्याच्या तक्रारी नॅशनल कॉन्फरन्सच्या विरुद्ध करण्यात आल्या. आता नॅशनल कॉन्फरन्समधून बाहेर पडलेले डी. डी. ठाकूर यांच्यासारखे नेतेही तोच आरोप फरुक अब्दुल्लांवर करीत आहेत.

## इंदिरा कॉंग्रेसला पाठिंबा

सर्वात मोठी खळबळ उडवली आहे ती शेख अब्दुल्लांचे जावई व फरुख अब्दुल्लांचे मेव्हणे जी. एम. शहा यांनी. शेख अब्दुल्ला मुख्यमंत्री असतानाही जी. एम. शहा हे त्यांची डोकेदुखी होऊन बसले होते. त्या वेळेस मुख्यमंत्रीपदावर फरुकच्या बरोबरीने शहा हेही डोळा ठेवून होते. मात्र शेख अब्दुल्लांनी डॉ. फरुकला जास्त संधी (पक्षाचे अध्यक्षपद) देताना शहा यांना चुचकारून ठेवले होते. नंतर शेख अब्दुल्लांच्या निधनानंतर जी. एम. शहा यांनी फरुकसमोर आपली डाळ शिजत नाही हे पाहून राजकारणसंन्यास घेतला. तेव्हा डॉ फरुकला जरा हायसे वाटले; परंतु फरुकचा हा आनंद क्षणिक ठरला. कारण जी. एम. शहा यांनी निवडणुका संपल्यावर पुन्हा सक्रिय राजकारणात उतरण्याचा निर्णय घेतला. त्यातच शेख अब्दुल्लांचे एके काळचे उजवे हात डी. डी. ठाकूर यांना फरुक यांनी तडकातडकी नॅशनल कॉन्फरन्समधून काढून टाकल्याने ठाकूर व शहा हे एके काळचे विरोधक आता फरुक विरुद्ध एकत्र आले आहेत. डी. डी. ठाकूर हे शेख यांच्या मंत्रिमंडळात क्रमांक दोनचे मंत्री होते. फरुक व शहा यांच्या शेख हयात असताना झालेल्या भांडणात ठाकूर हे नेहमी फरुक यांच्या बाजूला असत. ठाकूर हे जम्मू भागातील नॅशनल कॉन्फरन्सचे हिंदू नेते

असल्याने त्यांना शेख अब्दुल्लांनी बरेच महत्त्व दिले होते. मात्र अर्थतज्ज्ञ असलेले ठाकूर हे जनसामान्यांचा भरभक्कम पाठिंबा कधीच मिळवू शकले नाहीत, ही गोष्ट फरुकला माहीत असल्याने त्याने ठाकूर यांच्याबाबतीत कोणतीच दयामाया दाखवली नाही. आता शहा यांच्या बरोबरीने ठाकूरही फरुक अब्दुल्लांवर निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर फसवाफसवी केल्याचा आरोप करत आहेत. शहा यांची जमेची बाजू म्हणजे इतके दिवस त्यांच्या विरुद्ध असलेली त्यांची पत्नीही आता शहा यांच्या खांद्याला खांदा लावून आपला भाऊ ( फरुक ) व आई यांच्या विरुद्ध मैदानात उतरली आहे. बेगम अब्दुल्ला व फरुक उघडपणे शहा यांच्या विरुद्ध भाषणे ठोकू लागले आहेत शहा व ठाकूर आता बंडखोर आमदारांच्या (नॅशनल कॉन्फरन्सच्या) बैठका घेऊ लागले आहेत. ७६ सदस्यांच्या जम्मू–काश्मिर विधानसभेत ४६ सदस्य नॅशनल कॉन्फरन्सचे आहेत जर शहा व ठाकूर त्यातील दहा सदस्य आपल्या बाजूला खेचू शकले तर ते फरुक अब्दुल्लाचे मंत्रिमंडळ पाडू शकतील आणि इंदिरा गांधी त्या दोघांना हरतऱ्हेने मदत करतील. कारण कोणत्याही परिस्थितीत नॅशनल कॉन्फरन्सचा झेंडा खाली उतरण्यासाठी त्या उत्सुक आहेत. जम्मू–काश्मिरातील पराभवाने त्यांची स्वतःची बरीच मानहानी झाली आहे. मुस्लिमांच्या लाडक्या नेत्या म्हणून भारतात त्यांचा बोलबाला असताना काश्मिरमधील मुस्लिमांनी त्यांना हात दाखवावा ही गोष्ट त्यांच्या जिव्हारी लागली आहे. शिवाय एन. टी. रामारावप्रमाणे फरुक अब्दुल्लांनी विरोधी पक्षाचे ऐक्य घडवून आणण्यासाठी जो आटापिटा चालवलाय त्याबद्दल या दोघांचा त्यांना राग आलेला आहेच. फरुक अब्दुल्ला तर देशातील मुस्लिमांचे नेते होऊ पहात आहेत ही गोष्ट तर इंदिरा गांधींना कदापी सहन होणार नाही एन. टी. रामाराव व डॉ. फरुक यांना विरोधी पक्षांची एकजूट घडवून आणण्यास उसंत मिळू नये म्हणून त्यांची स्वतःचीच खुर्ची डळमळित करण्याचा धूर्त डाव इंदिरा गांधी खेळत आहेत, त्यात त्यांना कितपत व केव्हा यश येईल हे काळच ठरवील; परंतु त्या दृष्टीने या दोघा बिगरकाँग्रेसी मुख्यमंत्र्यांनी सावधगिरी बाळगावयास हवी मात्र दुर्दैवाने तशी सावधगिरी ते बाळगत नाहीत हे परिस्थिती त्यांच्या नियंत्रणाबाहेर जात आहे यावरून स्पष्टच होतंय.

एन. टी. आर. व डॉ. फरुक यांना विरोधी पक्षाच्या ऐक्याचे प्रयत्न इंदिरा गांधी सुखासुखी करू देणार नाहीत. शिवाय विरोधी पक्षांची सरकारे टिकू न देण्याची त्यांची जुनी पॉलिसी अजून कायम आहेच. त्या दृष्टीने आंध्र व कर्नाटकात त्यांचे प्रयत्न चालू आहेत. आंध्र व कर्नाटक हे त्यांचे जुने बालेकिल्ले होते ते परत ताब्यात घेण्यासाठी त्या कोणतेही प्रयत्न बाकी ठेवणार नाहीत. कर्नाटकात तर जनता पक्षाचे भाजपच्या पाठिंब्याने चाललेले सरकार चार दिवसांत जमीनदोस्त करण्याचे आव्हान स्थानिक इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांनी दिले आहे. काठावर मताधिक्य असलेले हेगडे यांचे सरकार पाडणे इंदिरा काँग्रेसला मुळीच अशक्य नाही. कारण कर्नाटकातील जनता आमदारांची पक्षबदलू परंपरा फार जुनी आहे. देवराज अर्स यांना बाजूला सारून सत्तेवर आलेल्या गुंडुरावांनी त्या वेळच्या जनता आमदारांची मोठी फौज आपल्या बाजूला वळवली होती आणि ज्या पक्षाजवळ पैसा असेल तो पक्ष चालू युगात कोणताही चमत्कार करू शकतो. मागे जसा चमत्कार भजनलाल, गुंडुराव, रामलाल यांनी करून दाखवला होता तसा चमत्कार कर्नाटकात व आंध्रमध्येही इंदिरा काँग्रेस पक्ष करून दाखवू शकेल. शिवाय कर्नाटकात इंदिरा काँग्रेसला या कामी असंतुष्ट नेते बंगारप्पा यांचा पाठिंबा मिळू शकेल. चंद्रशेखर यांच्यासारखे जनतानेते भाजप विरोधी वक्तव्ये करून हेगडे यांची कामगिरी आणखी अवघड करून ठेवत आहेत.

तेव्हा आंध्र, कर्नाटक, जम्मू–काश्मिर या राज्यातील बिगरकाँग्रेसी मंत्रिमंडळाचे भवितव्य फारसे उत्साहवर्धक नाही. आपले आसन स्थिरस्थावर व भक्कम करण्याच्या ऐवजी ते विरोधी पक्षांच्या ऐक्याच्या पाठीमागे लागले आहेत आणि हे ऐक्य तरी त्यांना साध्य होणार आहे का? श्रीनगरच्या विरोधी पक्षांच्या ऐक्यपरिषदेवर भाजप व लोकदल यांच्या युतीने बहिष्कार टाकला आहे आणि ज्या बैठकीत फरुक, चंद्रशेखर, मीर कासीम, पवार, बहुगुणा, चंद्रजित यादव यांच्यासारखे वेगवेगळ्या विचारसरणीचे लोक आहेत त्या बैठकीचे भवितव्य मी सांगायलाच हवे का? □

---

**( समग्र सावरकर वाङ्मय–खंड चार–पृष्ठे ३४५ ते ३४८ )**

हिंदुमहासभा ही राष्ट्रीय आहे की जातीय आहे याविषयी पुष्कळ लोकांचे मनात संदेह वसत असे. हिंदुमहासभेच्या कर्णावती (अहमदाबाद) येथील अधिवेशनात हिंदुमहासभेचे ध्येय 'संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य' आहे असे स्पष्टपणे घोषित केलेले आहे.

हिंदुस्थानात जितके लोक राहत आहेत त्या सर्वांना समसमान अधिकार मिळावेत असे महासभेचे म्हणणे आहे. हिंदूंना जास्तीत जास्त अधिकार असावेत असे हिंदुमहासभा कधीही म्हणत नाही आमची तर अशी इच्छा आहे की, स्वराज्यप्राप्तीनंतर जे हिंदुस्थानी पार्लमेंट किंवा हिंदी लोकसभा बनेल त्यात हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, यहुदी, पारशी किंवा हिंदुस्थानवर प्रेम करणारा कोणीही मनुष्य असो, त्या सर्वांना यथायोग्य अधिकार मिळावेत. हिंदी भाषेप्रमाणेच इतर भाषांचेही संरक्षण केले जाईल आणि आमचे भारतीय पार्लमेंट अशा स्वरूपाचे तयार होईल की, त्या पार्लमेंटात पाय ठेवताच हिंदु, मुसलमान, पारशी या भेदांचा मागमूसही राहणार नाही. सारेच्या सारे 'भारतीय' या नावाने संबोधिले जातील. काँग्रेसने जर अशी प्रणाली रचली असती तर मी प्रथम काँग्रेसचा सभासद झालो असतो व नंतर हिंदुमहासभेचा ! पण काँग्रेस राष्ट्रीयत्वाचा देखावा मात्र करीत आहे हिंदु व मुसलमान हा भेदच नष्ट झाला पाहिजे अशी माझी इच्छा आहे योग्यतेप्रमाणे सहभाग मिळाला पाहिजे, याच तत्त्वाचा पुरस्कार हिंदुमहासभा हिरीरीने करीत आहे. काँग्रेसच्या तत्त्वज्ञानात हे बसत नाही. अल्पमतवाल्यांना संरक्षण दिले पाहिजे असे आम्हीही म्हणतो; परंतु काँग्रेस बहुमतवाल्यांच्या संरक्षणाकडे लक्षच द्यावयास तयार नाही.

हिंदु लोक बहुसंख्य आहेत, होय आहेत ! पण ते दुसऱ्या कोणाच्या बळावर किंवा मेहेरबानीवर आजवर टिकून राहिलेले नाहीत. हिंदुजाति ही हिंदूंची वीरता आणि आत्मत्याग यावरच आजवर टिकून राहिली आहे. काँग्रेसही आमचीच आहे. तिचे व आमचे एकच ध्येय आहे. स्वातंत्र्यप्राप्ती हे ! परंतु काँग्रेस जेव्हा जेव्हा हिंदूंचे अधिकार पायांखाली तुडविण्याचे उद्योग करील तेव्हा तेव्हा हिंदुमहासभा काँग्रेसला तीव्र व अप्रतिहत असा विरोध करीत राहील. ज्या देशात जे लोक बहुसंख्य असतात त्यांचेच त्या देशात राज्य असते.

# भरतशास्त्र मासिकाचा अर्धदशकोत्सव

**दिनांक १७, १८ सप्टेंबर हे दोन दिवस रंगभूमीविषयक महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा मुंबईत झाली. नाटचक्षेत्रातल्या जाणकारांनी त्यात भाग घेतला.**

**दिनांक १७ सप्टेंबरला झालेल्या चर्चेचा वृत्तांत–पूर्वार्ध मागील अंकात दिला आहे.**

**या अंकात वृत्तांताचा पुढील भाग–**

**कमलाकर सोनटक्के :**

**' मराठी रंगभूमीची नेपथ्यरचना आणि अंधार-प्रकाशातील रंगमंच '**

नेपथ्याचा मूळ उद्देश रंगमंच-अवकाशाला एक निश्चित अर्थ देणं. शक्य झाल्यास गुणात्मक चरित्र बहाल करणं. नेपथ्यकार हा सामान्यपणे रंगमंचावरील अवकाशाला आखून देतो. निळ्या, काळ्या विगा, झालरी या सामान्य घटकांपासून ते चौथरे, पडदे, फ्लॅट आदि घटकांच्या मांडण्यातून तो प्रेक्षकांच्या दृष्टिरेषांना मर्यादा घालतो आणि त्यांचं लक्ष घटनेच्या वापराच्या जागी केंद्रित करतो. प्रत्येक दृश्यातील दृश्य-घटकांचा स्वतंत्रपणे आणि नाटकाच्या समग्रतेचाही विचार इथं आवश्यक आहे. उघडयावाघडया नेपथ्याला बैठकीचं साहित्य, कपाटं–अलमाऱ्या, पडदे, भिंतीवरील, घरातील आणि अर्थपूर्ण सजावटीच्या वस्तू आदींनी सुयोग्य रीतीनं सुशोभित करणं नितांत आवश्यक आहे. यातील कुठलीही गोष्ट उपरी, विसंगत वाटली तर ती रसनिष्पत्तीऐवजी रसहानी करू शकते. अतिमहत्त्वाकांक्षी किंवा दुर्लक्षित नेपथ्य-रचनाही नाटचप्रयोगाला हानिकारक ठरू शकते.

नेपथ्याची रचना आणि मांडणी अनेक प्रकारे नाटक समजण्यास मदत करू शकते. पात्रांचं येणं आणि जाणं, पात्रं ज्या स्थळा-कडून येतात आणि ज्या स्थळाकडे जातात त्यांचा निर्देश करतात. रंगमंचावरील वस्तूंचं आजूबाजूच्या परिसराशी असलेलं नातं स्थापत्यशास्त्राच्या सिद्धांतानुसार असणं आवश्यक आहे. मराठी नाटकानं जवळपास दोन तपांपेक्षा अधिक काळ गाजवणारा तथाकथित दिवाणखाना किंवा बसण्या-उठण्याची खोलीही एवढी प्रचलित झाली आहे की, तिच्यात नेपथ्य लावणारे गडीही थोडाफार बदल करून नवनेपथ्य उभारू शकतात. या दिवाणखान्याचे घरातील इतर भाग–स्वयंपाकघर, झोपण्याची खोली, माडीवर जाणारा रस्ता, पाठच्या किंवा उजव्या बाजूला असलेली खिडकी हे अगदी ठरून गेलंय. गेल्या काही वर्षांत नाटकाला परस्पेक्टिव्ह किंवा खोली देण्यासाठी आका-शाचा वापर केला जातो. उजव्या किंवा डाव्या बाजूची खिडकी महत्त्वाच्या पात्रांवर कटलाइट टाकून 'स्पेशल इफेक्ट'साठी वापरली जाते.

नाही म्हणायला राम मुंगींचं ' आग्ऱ्याहून सुटका 'चं नेपथ्य, ' गिधाडे ', ' अशी पाखरे येती ', ' महानिर्वाण 'चं नेपथ्य खूप काही सांगून, देऊन जातात. ' देवनवरी 'मधील घंटा, ' चिऊताई 'मधील खुर्च्या, ' मिठू मिठू पोपट 'मधील गजांची चौकट, ' लोककथा ७८ 'मधील आकाशपडदा आणि ' जुलूस '-मधील मुक्त अवकाश आणि त्याचा प्रयो-गाच्या बांधणीतील सहभाग हे उत्तम नाटच-नेपथ्याचे नमुने वाटतात.

गेल्या ५० वर्षांचा नेपथ्यप्रकाशाचा विचार करता मराठी रंगभूमीवरील नेपथ्य आणि वातावरणबदल हे कासवाच्या मंद गतीने झाल्याचे जाणवतात. नाटचतंत्र हा नाटचनिर्मितीतील पूरक घटक मानला तर त्याची प्रगती आणि अधोगती ही नाटच-संहितेबरहुकूम झालेली दिसते. नाटच-लेखनातील तोचतोपणा हा अपरिहार्यपणे इतर निर्मितिघटकांतही तंतोतंत उतरला आहे.

आजच्या नेपथ्यरचनेत, प्रकाशयोजनेत, वातावरणनिर्मितीत शैली आणि शैली-बद्धतेचा वापर जाणवत नाही. दिग्दर्शक ५० वर्षांपूर्वी जन्माला येऊन २५ वर्षांपूर्वी मान्यता पावला. नेपथ्यकार गेल्या दहाबारा वर्षांत आवश्यक वाटू लागला तर वेषभूषा-कार हा स्वतंत्र प्रतिभेचा असावा लागतो हे तत्त्वतःच मराठी रंगभूमीला मान्य नाहीसं दिसतंय.

नेपथ्यकाराच्या काही कलाकृतींचं साग्र रसग्रहण, विवेचन होणं ही पुढच्या अभ्या-साच्या आणि रंगभूमीच्या प्रगतीच्या दृष्टीने आवश्यक गोष्ट आहे. भारतात आज राष्ट्रीय नाटच विद्यालय आणि वेगवेगळया विद्या-पीठात पदव्युत्तर नाटयाचे अभ्यासक्रम चालतात; पण कुठल्याही विद्यापीठाजवळ भारतीय किंवा भाषिक रंगभूमीच्या तंत्र-मंत्राच्या अंगांचा अभ्यास करण्याची सामुग्री नाही.

**दि. १८ सप्टेंबर**

**श्री. रत्नाकर मतकरी :**

**' अभिनेत्याचं नाटक '**

प्रेक्षकांचा संदर्भ आणि त्याच्या रंगभूमी-कडून असलेल्या अपेक्षा यातूनच आपल्या नाटकांचं स्वरूप ठरतं आणि तसं ते ठरवलं तरच काही उपयुक्त विचार होऊ शकेल. नाही तर ' नाटक ' या गोष्टीविषयीच्या तार्किक, सार्वकालीन, जागतिक तत्त्वांविषयी संदिग्धपणे खूप वेळ बोलता येईल. नाही असं नाही; पण तो एक नुसता ' इंटलेक्च्यु-अल एक्सरसाईज ' होईल. तसल्या बुद्धि-निष्ठ खेळात मला सध्या तरी स्वारस्य नाही.

नाटकाचे काही प्रकार–म्हणजे ' जुलूस '-सारखी समूहनाटकं सोडली, तर बहुतेक सर्वच नाटकात व्यक्ती अधिक महत्त्वाच्या असतात. अगदी प्रयनाटयातसुद्धा. तेव्हा अभिनेत्याला तसा पर्याय नाही.

पण अभिनेत्याचे नाटक या शब्दयोजनेला

एक निराळाच वास येतो. असं वाटतं की, इथं नाटक हेच अभिनेत्यानं घडवलेलं आहे. म्हणजे इथं संहिता, दिग्दर्शन, नेपथ्य, संगीत या सर्व बाबी दुय्यम महत्त्वाच्या आणि नाटक उभं आहे ते केवळ अभिनेत्याच्या खांद्यावर! म्हणजे नाटकासाठी अभिनेता नाही, तर अभिनेत्यासाठी नाटक आहे.

मला अशा प्रकारचं अभिनेत्याचं नाटक अभिप्रेत नाही. प्रयोगात लिखित संहिता मागे रहाते आणि अभिनेत्याचे शब्दच प्रेक्षकांपर्यंत पोहोचतात. त्याच्या मुद्रेतून, हावभावांतून शब्दात न सांगितलेला किती तरी आशय प्रेक्षकांना जाऊन भिडत असतो, तरीही नाटक त्याचं का नसतं? अभिनेता आणि नाटक यांच्यात भेद तयार करणारी एक गोष्ट तिथं असते. कुठली? भूमिका.

ही भूमिका आधी नाटककारानं स्वतःच्या मनात निर्माण केलेली असते. नंतर ती शब्दांच्या माध्यमातून संहितेत मांडलेली असते. नट अभिनय करतो, तो त्या लिखित भूमिकेच्या आधाराने. व्यक्तीव्यक्तींच्या शैलीप्रमाणे त्या भूमिकेचं रंगमंचावरचं दर्शन थोडंफार बदलतं; पण ती भूमिका बदलत नाही. कारण मुळात नाटक अभिनेत्याचं नसतंच. रिचर्ड बर्टनपासून नानासाहेब फाटकांपर्यंत सर्वांचे 'हॅम्लेट' वेगळे. तरीही ते सर्व मुळात हॅम्लेटच! हॅम्लेटचं विचारांनी पछाडणं ते वेगवेगळ्या प्रकारे दाखवतील; पण त्याचं विचारविलसित दाखवायचं आहे हे सर्वांनाच बंधनप्राय. क्वचित लेखनात सूचित केलेली पण एका नटाच्या आविष्कारात न आलेली एखादी बाजू दुसरा नट अधिक जाणीवपूर्वक मांडतो—मग आपण म्हणतो की त्याचं भूमिकेचं 'इंटरप्रिटेशन' वेगळं आहे.

'इंटरप्रिटेशन'—आजकाल असे तांत्रिक जड शब्द वापरण्याची प्रवृत्ती नवशिक्या नटांमध्ये वाढते आहे. अमक्या भूमिकेचं तुमचं इंटरप्रिटेशन काय, असं मला लेखक म्हणून, दिग्दर्शक म्हणून माझ्या नाटकातल्या भूमिकेविषयी विचारलं जातं. अशा वेळी मनात एक विचार येतो. खरोखरच सर्व भूमिका इतक्या व्यामिश्र असतात का, की त्यांच्यातल्या शब्दाशब्दातून वेगवेगळे अर्थ ध्वनित व्हावेत? अशी भूमिका क्वचित एखाद–दुसरी असते. इतर बहुतेक सर्वच भूमिकांमध्ये नटाकडून काय अपेक्षा आहेत ते स्वच्छ असतं; पण आपल्या डोक्यातला गोंधळ नवशिका नट त्या भूमिकेत पहातो आणि ती उगाचच गुंतागुंतीची करतो. तत्त्वचर्चेनं आणि बुद्धिनिष्ठ आव आणण्यानं नाटकाचं नुकसान होतं.

'बालगंधर्वांचं नाटक' अशासारख्या शब्दप्रयोगांना काय अर्थ आहे? तर एवढाच की काही गुण, त्यांची 'इमेज'ही इतकी लोकप्रिय होते की, प्रेक्षक केवळ त्या व्यक्तीसाठी नाटकाला जातात. असं म्हणतात की, बालगंधर्वांचा आग्रह होता की, आपण रंगभूमीवर शालू–शेले वापरावेत, दागदागिने घालावेत. प्रेक्षकांना तेच रूप आवडतं; परंतु बालगंधर्व फाटकी लुगडी नेसायला तयार असतील, दागिने घालणार नसतील, तरच नाटक मिळेल, अशी अट घालूनच गडकऱ्यांनी 'एकच प्याला' नाटक गंधर्व मंडळींना दिलं. बालगंधर्वांनीही भूमिकाच नटापेक्षा अधिक महत्त्वाची मानली. बालगंधर्व, मा. दीनानाथ, केशवराव दाते, नानासाहेब फाटक यांच्या अभिनयाचं, गाण्याचं कौतुक प्रेक्षकांनी केलं; परंतु खाडिलकर, गडकरी, देवल यांची नाटकं त्या त्या लेखकांची म्हणूनच टिकली.

उत्तम नट उपलब्ध नसेल तर नाटकाची रंगत कमी होते. किंबहुना नाटक उभंच कसं करायचं हा प्रश्न पडतो. वजनदार भूमिका पेलण्यासारखे नट नसले तर या भूमिका लेखकांनी प्रेक्षकांसमोर ठेवायच्या तरी कुणाच्या माध्यमातून? दुर्दैवानं गेल्या पाच वर्षांत या ना त्या कारणानं आपले प्रमुख अभिनेते रंगमंचावरून अस्तंगत झाले. उरलेल्यांना आपली जबाबदारी आणि शिस्त पाळणं कठीण गेलं. परिणामी एक पोकळी तयार झाली. जुन्यांची जागा घेणारं नवं नेहमीच येत असतं असं म्हणतात; पण ते खरं नाही. स्टार्सची जागा घेणारे स्टार्स एका रात्रीत उगवत नाहीत. त्यांचं रंगरूप, आवाज, समज, अभिनयगुण हे एक अपूर्व रसायन असतं. ते स्टार्स वर्षानुवर्षं तयार होत असतात. प्रत्येक नाटकात 'स्टार'ची गरज असते असं नाही. ज्या नाटकात प्रमुख व्यक्तिरेखा सर्वसामान्य माणसापेक्षा कुठल्या ना कुठल्या अर्थानं अधिक मोठी असते, तिथं हा वेगळेपणा स्टार कलावंतामुळं ठरतो. एखादा कलावंत स्टार झाला; परंतु फाजील आत्मविश्वास, अहंकारानं स्वतःला नाटकापेक्षा मोठा समजू लागला की तो निरुपयोगी ठरतो.

नटाला आव्हान वाटण्याजोगी भूमिका नाटककारानं लिहिलेली असावी आणि नटानं ती सर्व सामर्थ्यानिशी साकार करावी, हाच या दोघांचा परस्परसंबंध! त्यातच अभिनेता आणि नाटक यांचं मोठेपण आहे.

## अशोक रानडे :

## 'रंगभूमीवरील आवाज आणि भाषण'

रंगभूमीवर मानवी आणि अमानवी असे ध्वनीचे घटक कायम असले तरी माझा विषय मानवी आवाजापुरता मर्यादित आहे. रंगभूमीवर मानवी आवाजांचे वापर मुख्यतः दोन प्रकारात मोडतात. गायनधर्मी आणि भाषणधर्मी.

साधारणतः १८८५ च्या आसपास मराठीत संगीत रंगभूमी आकाराला येत होती. त्याच वेळी बंगाली रंगभूमीवरही संगीत उदयाला येत होतं. रवींद्रनाथ म्हणाले, 'जे शब्दातून व्यक्त होत नाही ते संगीतातून व्यक्त होऊ शकतं' अशा प्रकारच्या विचारातून काही प्रयोग सुरू झाले.

मानवी आवाजाचे अनेक धर्म आहेत. लहान–मोठा, चढ–उतार, गुणवत्ता वगैरे. पूर्वी ध्वनिक्षेपण नव्हते. तेव्हा सर्व नटांना आपला आवाज मोठा लावावा लागे. संवाद स्पष्ट, अस्खलित म्हणण्याकडे सर्व लक्ष केंद्रित झालेले असे. गोडव्याकडे लक्ष गेले नाही. मंत्रोच्चार स्पष्ट व्हावेत, कर्णमधुर व्हावेत इकडे आम्ही लक्ष पुरविले नाही, या परंपरेत त्याचे मूळ असू शकेल. गद्यनटांनी संगीतनटांसारखी आवाजाची साधना केली नाही. त्यांनी लहान–मोठा चढ–उतार इतकाच आवाजाचा ढोबळ उपयोग केला. आपले संवाद चांगले म्हटले जावेत अशी काळजी संगीतनटांनी मात्र त्या काळात घेतलेली दिसते. गद्यनटांनी जर आवाजाची साधना केली असती तर लेखकांना आपली शैली बदलावी लागली असती. लांबलचक वाक्ये कमी करावी लागली असती. आधु-

निक नाटकाचा जन्म लवकर झाला असता.

गायकाला जसा आवाज कमवावा लागतो, तसा नटालाही आवाज कमवावा लागतो. गायक आवाज कमावण्यासाठी सर्व रागांवर मेहनत घेतो. नटांनीसुद्धा अनेक भूमिकांचा अभ्यास केला पाहिजे. स्वत:कडे भूमिका आली की मग तिचाच तेवढा अभ्यास करायचा हा दृष्टिकोन उपयोगाचा नाही. आपल्याकडे न आलेल्या भूमिकांचासुद्धा अभ्यास केला पाहिजे.

**श्री. अनंत अमेंबल :**

## ' मराठी नाटकाचे पार्श्वसंगीत '

आज रंगभूमीवर नेपथ्य, प्रकाशादि तंत्राइतकेच पार्श्वसंगीताला महत्त्व दिले जात आहे. बहुतांशी नाटकांच्या पार्श्वसंगीताची सुरुवात ' वातावरणनिर्मितीकरिता ' श्रेयनामावलीपासूनच होते. दृश्यकाळ बदलासाठी याचा प्रामुख्याने वापर होतोच. शिवाय नाट्यपूर्ण घटना, संहितेत नाट्यमयता कमी असली किंवा असलीच तर तिचा चरमबिंदू गाठण्यासाठी निरनिराळ्या भावना, तणाव तीव्र कारणांसाठी पात्रांचा प्रवेश–गमन, मूक हालचालींमध्ये नाट्यमयता आणण्यासाठी अशा किंवा याहूनही अधिक व वेगवेगळ्या कारणांसाठी पार्श्वसंगीताचा वापर केला जातो. विषय कोणताही असो जातीनुसार संगीत वापरले जाते. नैसर्गिक ध्वनिसंकेत वापरणे, ध्वनिमुद्रित निवेदने वापरणे याचीही पार्श्वसंगीतात भर पडत गेली.

नाटकाच्या प्रस्तुतीकरणाची संकल्पना पूर्णपणे दिग्दर्शकाने आखल्यामुळे नाटक व संगीत यांचा संबंध घनिष्ट करण्याचा प्रमुख वाटा दिग्दर्शक या व्यक्तीकडे येतो. संगीताच्या वापरासंबंधी दिग्दर्शकानुसार व्याख्येमध्ये बदल होत असला तरी त्याची गोळाबेरीज ' उठाव आणण्यासाठी ' अशा संकल्पनेत होते. नाट्यपूर्ण दृष्टिक्षेप, विराम इत्यादींसाठी संगीत वापरण्यात दिग्दर्शकांचा हातखंडा आहे. विशिष्ट भावना, संवाद, शब्द, आशय यातील बारकावे दाखविणाऱ्या संगीताचे समर्थन करणाऱ्या दिग्दर्शकांना क्षणोक्षणी इतके बारकावे सापडत असतात की, अतिरेकी पार्श्वसंगीतामुळे ते नाटक ५० वर्षांपूर्वीच्या संगीतप्रधान मूकपटांच्या जागी जाऊन बसते. काळ्याकुट्ट अंधारात दृश्य दिसूच नये त्याप्रमाणे समोर चाललेल्या उतार-चढाव पार्श्वसंगीताच्या संकेताशिवाय लोकांना कळूच नयेत अशीच आमच्या दिग्दर्शकाची मनोधारणा आहे असे वाटू लागते. समजा संगीताशिवाय काही गोष्टी प्रेक्षकांपर्यंत पोहोचत नसल्या तर लेखक, दिग्दर्शक, नटांच्या उणीवा असणे शक्य नाही का ? ध्वनिमुद्रणतंत्र आणि पार्श्वसंगीताला दिग्दर्शकांनी जे स्थान दिले आहे त्यावरून नाटकातील कोणतीही कमतरता संगीत भरून काढू शकते अशी त्यांची धारणा आहे अर्ध्याअधिक प्रसंगी ध्वनिमुद्रणतंत्राचा वापर रंगभूमीय तत्त्वावरच घाव घालताना आढळतो. समोर जिवंत असलेल्या नटांचा आवाज न वापरता तो संवाद त्याच्याच आवाजात ध्वनिमुद्रित स्वरूपात वापरून त्यावर त्या नटाने स्वगताच्या वेळी ओठांच्या मूक हालचाली करणे किंवा एखाद्या पात्रास आठविणारे आप्तस्वकीयांचे उद्‌गार त्याच्याच तोंडी न देता ध्वनिमुद्रित करून वाजविणे, याहून अधिक विकृत व तंत्रदृष्ट्या अतार्किक प्रकार काय असू शकतात ?

### संगीतपरंपरेचा अभ्यास

नाटकातील नाजूक प्रसंगी लेखक–दिग्दर्शकापासून स्वत: नटापर्यंत सर्वांनीच या मुख्य माध्यमास तांत्रिक घटकावयव करून सोडले आहे. संघर्षयुक्त नाट्यपूर्ण प्रसंगी ध्वनि व प्रकाश यांचाच एक भाग त्यास व्हावे लागते. अभिनयाची जबाबदारी कमी करून तंत्राच्या चौकटीतून याचा विचार केला जातो. या विचारपद्धतीस पार्श्वसंगीताचा पगडा फार मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे असे मला वाटते. पार्श्वसंगीत वापरणे हा कला विश्वातला अपवाद असू शकतो. परंतु आम्ही त्याचा नियम करून त्याच्या सर्व कलात्मक शक्यता बोथट करून टाकल्या आहेत.

एकदा एका हौशी नाट्यसंस्थेतल्या माणसाला मी एका वयोवृद्ध गायक पार्श्वसंगीतकाराकडे घेऊन गेलो. त्यांच्याकडे बऱ्याच मोठ्या प्रमाणात संगीताचा पूर्वसंग्रह असल्याचे मी ऐकून होतो. त्या प्रचंड साठ्यातून नक्की कोणत्या प्रकारचे संगीत काढले असता, त्यांना शोधाशोध करण्याचा त्रास कमी होईल असा विचार करून माझ्या मित्राला विशिष्ट ऐतिहासिक बाजाचे संगीत हवे असे सांगितले. गृहस्थ हसायला लागले. म्हणाले, ' अहो, सारंगी, सरोद, पखवाज यांचे तुकडे वापरले की ते संगीत त्या काळाचंच वाटतं. ऐतिहासिक नाटकासाठी असं वेगळं संगीत असतं हे तुम्हाला कोणी सांगितलं ?' मी गप्पच झालो. माझे अज्ञान दूर केल्याबद्दल आभार मानून बाहेर पडलो. कारण मी पाहिलेल्या सर्व महाभारतकालीन नाटकाची आठवण झाली होती. ते संगीत या धर्तीचेच होते.

दिग्दर्शकाच्या मागण्यांना पुरवणी करण्यापलिकडे, नाट्यकलेशी संबंधित असूनदेखील त्याची वैचारिक बैठक एखाद्या सर्वसामान्य प्रेक्षकाच्या कलात्मक संकल्पनाएवढी अस्पष्ट, अपरिपक्व कशी राहू शकते ? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात ज्या कलाविश्वाशी तो संबंधित असतो, ज्या परंपरांमध्ये त्याची मानसिक घडण तयार होते व ज्या कलाद्रव्याच्या अंगीभूत वैशिष्ट्यामुळे सृजनक्षेत्र आखले जाते. याचा शोध घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यासाठी भारतीय संगीतपरंपरेच्या वैशिष्ट्याच्या प्रकाशात आपल्याला संगीतकाराच्या कार्यक्षेत्राच्या मर्यादा व त्या रुंदावण्याच्या शक्यतांचा विचार करावा लागेल. भारतीय व पाश्चात्य संगीत परंपरेचा तांत्रिक तुलनात्मक अभ्यास करणे येथे अपरिहार्य आहे. त्यामुळेच आपल्या संगीतकाराची व्यवहार्य अडचण समजण्यास मदत होईल.

(१) भारतीय संगीत गायकीप्रधान असून wind व bowed वाद्ये गायनशैलीचे अनुकरण करतात. सतार-सरोदसारखी वाद्ये त्यांच्या तांत्रिक घडणीमुळे वेगळ्या पद्धतीने वाजविली गेली तरीही आलापी करताना गायनशैलीनुसारच जातात.

(२) गायन अथवा वादन केवळ एकाच भावनेवर अथवा रसावर केंद्रीकरण करून, त्याचा पुढे सूक्ष्मतेने विस्तार करण्याच्या पद्धतीवर केले जाते.

(३) भारतीय संगीत संपूर्णपणे स्वरधूनतत्त्वावर (melody) आधारित असून त्याचे स्वरूप स्वरधून आणि लयतत्त्व असे केवळ दुपदरी आहे.

(४) संगीताचा पाया अंतःस्फूर्ती किंवा

प्रातिमज्ञानावर उभा आहे.

(५) भारतीय संगीतात वाद्यवृंदाची परंपरा नाही.

मानवी समाज अनेक प्रकारच्या शक्तींनी युक्त असतो. हे जाळेच त्याला घडवीत असते. त्याची विचारप्रक्रिया, सभोवतालचे ज्ञान अनेक पातळ्यांवर, अनेक पदरी असू शकते. त्याचे अनुभव गुंतागुंतीचे, त्याचे जीवन संघर्षयुक्त असते. म्हणजेच त्याचे प्रतिनिधित्व करणारे अथवा त्याच्याशी संदर्भ असलेले संगीत अनेक पदरी,...संघर्षयुक्त असणे आवश्यक आहे.

'वर्णनात्मकता', 'संघर्ष', 'नाट्य', 'अनेकपदरी' या सर्व संकल्पना भारतीय संगीतपरंपरेसाठी उपऱ्या आहेत. परक्या आहेत. त्यामुळे या संकल्पनाचे स्वरूप समजण्याकरिता पाश्चात्य संगीतपरंपरेचे गुणवैशिष्ट्य लक्षात घेणे इष्ट ठरते.

(१) पाश्चात्य संगीताची रचना तार्किक बांधणीने केलेली असते.

(२) एकाच रचनेत अनेक भावना; स्वराकर्षणाच्या अनेक छटा असतात.

(३) विरोध विकासशील विचारप्रक्रियेचा अवलंब संगीतातही केला जातो.

(४) पाश्चात्य तार्किक विचारास एक दिशा असते, हेतू असतो व परमोच्च शिखर गाठण्याच्या प्रयत्नात त्याचा विकास होतो व कथन करण्यास समर्थ ठरतो. तेव्हा पाश्चात्य संगीताचा फार मोठा हिस्सा 'कथनात्मक' असणे हा अर्थातच योगायोग नाही.

(५) विरोधविकासशील पद्धतीमुळे दोन पूरक परंतु विरोधी अशा विषयांची हातमिळवणी केल्यामुळे त्या संघर्षातून नाट्य निर्माण होते.

(६) पाश्चात्य संगीतात आघातवाद्ये, वायुवाद्ये, तारवाद्ये, श्वासवाद्ये अशा चार विभागांत मुक्त संचार करणारे, अनेक पदरी वाद्यवृंदसंगीत आहे.

(७) पाश्चात्य संगीततंत्राचा पाया, मांडणी, बांधणी व स्वरलीपी या स्तंभावर आधारित आहे.

या सर्व पद्धती, तंत्र, विचारप्रक्रियांच्या अभावी आपले संगीत एकपदरी, व्यक्तिनिष्ठ, भावनावश कोणत्याही प्रकारच्या तर्कबुद्धीस विरोध करणारे, स्वयंप्रेरित, स्वयंचलित आहे व हीच आपली संगीतदिग्दर्शनाच्या दृष्टीने मर्यादा आहे. उदाहरणार्थ काव्याला सुरावट देणे आम्हास कठीण नाही; परंतु शब्द न वापरता. तीच काव्यकल्पना संगीतमाध्यमात मांडणे अत्यंत मुष्कील आहे. कारण संगीताची शैली गायकी शैलीची असल्यामुळे निःशब्द संगीतकल्पना मांडण्याची आविष्कारपद्धती आमच्या परंपरेस परकी आहे. त्यामुळे तार्किक आविष्कार पद्धतीअभावी आमच्या संगीतकारांची विचारप्रक्रिया न जाणविण्याइतकी अस्पष्ट, दिशाहीन व ढोबळ असते.

इतकी वर्षे भिनलेल्या धारणेस अचानक नकारात्मक भूमिकेतून तपासणे वैयक्तिक पातळीवर सोपे असले तरीही सर्वांकडून तशी अपेक्षा करणे व्यवहार्य नाही. तेव्हा दिग्दर्शकाच्या सोयीसाठी 'पार्श्वसंगीत ही मराठी नाटकाची मौलिक परंपरा आहे' या गृहीताच्या चौकटीत सुधारणेचा विचार करावा लागेल.'

'सर्वात प्रथम कलात्मकते आधी तांत्रिक बाजूंचा विचार करू. माझे पार्श्वसंगीत व्यावसायिक studio त ध्वनिमुद्रित होऊन बाहेर पडल्यावर नाटकाच्या वेळी ते वाजविण्याचे काम नाटक कंपनीच्या ध्वनिमुद्रणयंत्रचालकावर येते आपल्या यंत्रावर वाजणाऱ्या संगीतास न्याय देण्यासाठी, त्या यंत्रातील विविध बटणांमध्ये काय फरक करावा लागेल याचे किमानदेखील ज्ञान नसणाऱ्या अकुशल व्यक्तीच्या हाती, आपल्या संगीतातून अपेक्षित परिणाम साधणे तर दूरच राहिले, त्याऐवजी नाटकासच अडथळा निर्माण होतो आहे हे अनुभविण्यासाठी संगीतकारास स्थितप्रज्ञच बनावे लागते. यात बदल व्हायला हवा. सबंधित तंत्रज्ञ पुढे यायला हवेत. या अकुशल तंत्रज्ञानी प्रथमच निदान रेडिओवरील विविध स्टेशन लावण्याचे कुणाकडून तरी शिक्षण घ्यावे.

## हेमू अधिकारी :
## 'मराठी रंगभूमीचे अर्थकारण'

'मराठी रंगभूमीचे अर्थकारण' या शीर्षकाचा वास्तविक अर्थ 'मराठी व्यावसायिक रंगभूमीचे अर्थकारण' असाच होऊ शकतो. इथे व्यावसायिक अथवा प्रायोगिक असा भेद करण्याचा हेतू नाही. एखाद्या प्रोजक्टसाठी करावी लागणारी एकूण भांडवलाची गुंतवणूक, त्यातल्या वेगवेगळ्या बाबींसाठी खर्च करावा लागणारा मेंटेनन्सचा खर्च आणि या साऱ्यांतून उभं राहणारं नफ्यातोट्याचं गणित—या साऱ्या प्रश्नांची तीव्रता प्रायोगिक रंगभूमीला काही तितकीशी जाणवत नाही, जितकी ती व्यावसायिक रंगमंचावर जाणवते आणि याची कारणंही उघड आहेत. चरितार्थासाठी या व्यवसायावर अवलंबून असणारी अनेक माणसे जशी व्यावसायिक रंगभूमीवर आहेत, तशी ती प्रायोगिक रंगभूमीवर नाहीत. थोडक्यात व्यावसायिक रंगभूमी हा एक धंदा आहे, जो बंद पडला तर या धंद्यावर अवलंबून असणाऱ्या अनेक माणसांपुढे 'कसं जगायचं?' हे प्रश्नचिन्ह उभं राहील, प्रायोगिक रंगभूमीच्या बाबतीत अशी शक्यता, निदान आज तरी, नाहीच. तेव्हा मराठी रंगभूमीच्या अर्थकारणाचा विचार, व्यावसायिक रंगभूमीच्या संदर्भातच करणे क्रमप्राप्त आहे.

व्यावसायिक रंगभूमीच्या आजच्या स्वरूपाकडे नुसती धावती नजर टाकली तरी लक्षात येतं की, या रंगभूमीला जवळपास एका मोठ्या इंडस्ट्रीचं स्वरूप आल्यासारखं दिसतंय; पण औद्योगिक उत्पादनाचे काही नियम-विधम या इंडस्ट्रीला लागू पडतात असं काही दिसत नाही. या इंडस्ट्रीला आर्थिक स्थैर्य नाहीच. इंडस्ट्रीला नाही त्यामुळे यातल्या माणसांनाही नाही. यातल्या बहुसंख्य माणसांना उद्याची चिंता सतत भेडसावत असते. कारण भविष्याची तरतूद करून ठेवण्याची कोणतीही व्यवस्था या इंडस्ट्रीत नाही. चलती असेल तोपर्यंत एखादा निर्माता, लेखक, दिग्दर्शक किंवा कलाकार पैसे मिळवतो, मिळवू शकतो आणि ही चलती कुठपर्यंत टिकेल याची काहीच निश्चिती नसल्यामुळे उपलब्ध संधीचा शक्य तेवढा फायदा घेण्यासाठी ऊर फुटेपर्यंत धावत असतो.

सर्वसाधारण मराठी नाटकाचे आमचे बजेट सुमारे ३०–३५ हजारांच्या घरात जातं. ही प्राथमिक गुंतवणूक (इनिशियल इंव्हेस्टमेंट) असते. म्हणजे पहिला प्रयोग होण्यापूर्वी या नाटकावर इतके पैसे खर्च झालेले असतात. क्वचित प्रसंगी हा आकडा ५० ते ६० हजारांच्या घरात जातो आणि अलीकडच्या नाटकांचा आलेख काढला तर

हा प्रसंग आता क्वचित राहिलेला नाही, असंच म्हणावं लागेल. आजच्या दराने एका हाउसफुल्ल प्रयोगामध्ये खर्च जाऊन सुमारे २००० ते ३००० रुपये शिल्लक राहतात असं गृहीत धरलं तर ही इनिशियल इंव्हेस्टमेंट भरून येण्यासाठी सुमारे २५ ते ३० हाउसफुल्ल प्रयोगांची गरज असते. या प्राथमिक भांडवलाचं स्वरूप पाहण्यासारखं आहे. यातला जवळजवळ १/३ भाग केवळ नेपथ्यावर खर्च होतो. लेखक, दिग्दर्शक यांचं मानधन देण्यासाठी सुमारे १।३ भाग खर्चा पडतो; उरलेल्या १।३ मध्ये तालमीचा खर्च, पार्श्वसंगीत इ. बाबी बसतात. शुभारंभाच्या प्रयोगाच्या जाहिरातीचा खर्चच सुमारे १२ ते १५ हजारांच्या घरात जातो. अशा परिस्थितीत नाटक चाललं नाही तर येणार नुकसान भरून काढण्यासाठी ज्याची क्षमता जास्त तोच निर्माता यात तग धरू शकतो. परिणामी ज्यांच्याकडे पैसा आहे असे अनेक लोक आमच्या धंद्यात शिरले आहेत. सुमारे वीस एक वर्षांपूर्वी जिथे ५ किंवा ६ प्रमुख निर्माते होते तिथं आता जवळपास १०० निर्माते आहेत आणि यातले ८० टक्के मुंबईत आहेत.

प्राथमिक गुंतवणुकीइतकाच प्रत्येक प्रयोगाचा खर्चही वाढला आहे. किमान गरजा असलेल्या नाटकाचा हा खर्च सुमारे ३ ते ४ हजारांच्या घरात जातो. यातही जवळजवळ १।३ भाग जाहिरातीवर खर्च होतो. या साऱ्याचा परिणाम प्रयोगसंख्येवर झाला नाही तरच नवल ! सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी फक्त बुध. शनि. रवि. नाटके व्हायची. महिन्यातून १२ प्रयोग–फक्त. एखाद-दुसरा जास्त प्रयोग झालाच तर नट कुरकुर करायचे. आज एका नाटकाचे महिन्याला २५ प्रयोग होतात. क्वचित दिवसाला ३ प्रयोग. त्यातच दौरे. रात्रंदिवस प्रयोग. जितके प्रयोग जास्त तितकं नुकसान भरून येण्याची किंवा फायदा होण्याची शक्यता अधिक, थकलेल्या शरीराने आणि थकल्या मनाने होणाऱ्या प्रयोगांच्या दर्जाबाबत काय बोलायचं ?

कलाकारांचे स्थान बऱ्याच प्रमाणात सुरक्षित आहे. प्रयोगाच्या खर्चापैकी जवळ–जवळ १।३ भाग कलाकारांच्या नाइटसाठी खर्च होतो. नाटकात काम स्वीकारण्यापूर्वी कलाकार काही एका मर्यादेपर्यंत आपली नाइट हवी तशी ठरवून घेऊ शकतात. तुलनेने रंगमंच सांभाळणारे, प्रकाशयोजना किंवा ध्वनिमुद्रण यांचे संचलन करणारे, नेपथ्य उभारणारे असे अनेकविध काम सांभाळणारे जे कामगार आहेत त्यांचं स्थान अतिशय असुरक्षित आहे. त्यांना नाइट ठरवून घेण्याचा चॉइस नसतो. एकूण प्रयोगाच्या खर्चातला फक्त दहा टक्के हिस्सा या रंगमंच–कामगारांच्या वाट्याला येतो. नाटकधंद्याच्या दृष्टीने लेखक, दिग्दर्शक, नट, नेपथ्यकार यांना जितकं महत्त्व आहे त्या मानाने १।१० देखील महत्त्व या रंगमंच–कामगारांना नाही. कारण उघड आहे. रंगमंच कामगाराला बदली सहज मिळतो. नटाला पर्याय मिळणं तितकं सोपं नसतं. शिवाय धंद्याच्या दृष्टीनंही ते फारसं चांगलं नसतं. म्हणूनच लेखक, दिग्दर्शक, नट याप्रमाणेच मेकअपमन, लाइटस् ऑपरेट करणारा, सेटस् लावणारा, खिळे ठोकणारा, ध्वनिमुद्रण सांभाळणारा हे रंगमंच-कामगार-देखील या रंगभूमीचा एक अविभाज्य आणि अपरिहार्य घटक आहेत असं मानण्याची गरज इथं कुणालाच वाटत नाही. रंगभूमीवर साधारण नट महिन्याच्या २५ प्रयोगांतून २ ते ३ हजार रुपये मिळवतो, त्याच रंगभूमीवरचा रंगमंच–कामगार मात्र याच काळात २०० ते ३०० रुपये मिळवतो. दोघांचंही उत्पन्न सारखंच असावं हे आजच्या एकूणच अर्थ-व्यवस्थेत शक्यच नाही आणि असं कुणी म्हणणारही नाही; पण त्यातली विषमता कोणत्या मर्यादेपर्यंत असावी याचा तरी गंभीरपणे विचार व्हायला हवा.


तर मला जाणवलेलं मराठी व्यावसायिक रंगभूमीचं अर्थकारण हे असं आहे. आपल्या देशाच्या अर्थकारणासारखंच योजनाशून्य, विषम आणि बेहिशेबी आणि तितकंच डबघाईला आलेलं. □

या सर्व निबंधवाचनावर उपस्थितांनी प्रश्न विचारले. आपली मते व्यक्तविली.

पुष्पा भावे यांनी चर्चासत्राचा समारोप केला. सर्व निबंधांचा आढावा आपल्या भाषणात घेऊन त्या म्हणाल्या, ' स्वत:ला जे जे सुचत होतं ते ही माणसं प्रामाणिकपणे बोलली. त्यामुळं ही केवळ चर्चेसाठी चर्चा असं झालं नाही.' [ समाप्त ]

–विनया खडपेकर





# आजचे कवी

संकेतस्थानाची निश्चिती ही या कवीच्या काव्यप्रवासामागचीं खरी प्रेरणाशक्ती आहे व त्यामुळेच कवीजवळ एक प्रकारचा आत्मविश्वास आहे.

लेखांक : पाचवा

अविनाश सहस्रबुद्धे

## वास्तवतेचं प्रखर भान असलेली उत्कट कविता

प्रमोद मनोहर कोपर्डे यांच्या कवितासंग्राहाचे नाव आहे ' पाखरांच्या आत्महत्येनंतर...' संग्रहाच्या या नावातूनच त्यांच्या कवितेच्या स्वरूपाची काहीशी कल्पना आपण करू शकतो.संग्रहातील कविता या ' तू : काही कविता, ' विस्कटलेल्या कविता ,' ' देशांतराचे पक्षी ' ' शहर आणि मी ', ' पुन्हा एकदा समुद्र : काही कविता ', ' पाखरांच्या आत्महत्येनंतर ' व ' श्वासलय ' अशा सहा विभागात विभागलेल्या आहेत. प्रत्येक विभागातील कवितांमधून जाणिवेची एक विशिष्ट सलग, एकात्म अवस्था निर्माण होते. त्याशिवाय या सात विभागांमध्येही कवीच्या जीवनविषयक जाणिवेचे एक सूत्र दिसते. त्यामुळे हे विभाग सुटे सुटे न वाटता त्यांच्यातून काहीएक आशयाचे रूपही मनात गोळा होऊ लागते. कोपर्डेच्या कवितांमधून सलगपणे जाणवणारे हे आशयाचे रूप कोणते आहे? या प्रश्नाचे उत्तर त्यांची प्रातिनिधक म्हणता येईल अशा पुढील कवितेत आपल्याला मिळते.

का कसे काळीज पिळवटून टाकतात
हे जीवघेणे सूर...
का अशी सहज उठतात उफाळून
बुबुळांखाली वादळं...
का अशी काठोकाठ भरून येते मनाची दरी
कुणाच्या तरी आर्त टाहोनं...
का अशी व्यापून रहाते रात्र
तिच्या निरोपाच्या हुंदक्यानं...
का पुन्हा ठसठसत रहातात तेच ते प्रश्न
उरल्या अस्तित्वाला तळापासून सुरुंग लावणारे !

कवितेच्या पहिल्या आठ ओळींतून व्यक्त होणाऱ्या वेदनेला कवीच्या व्यक्तिगत जीवनातील असलेले संदर्भ दिसतात तर शेवटच्या दोन ओळीत हेच संदर्भ एकदम जीवनविषयक मूलभूत प्रश्नांना, या समाजातील मानवी अस्तित्वाला भिडलेले दिसतात. ही वेदना कोणती आहे, बुबुळांखालची ही वादळं कोणती आहेत, ती कशामुळं निर्माण झाली आहेत याचा शोध घेणारी कोपर्डेची कविता आहे. ही वेदना सुरुवातीला जरी अनेक व्यक्तिगत संदर्भांमधून भेटत असली तरी अंतिमतः तिचा प्रवास समाजवास्तवातील भेसूरतेच्या, मानवी शोषणाच्या विषमतेच्या जाणिवेकडे घेऊन जाणारा आहे. आपल्या सीमित व्यक्तिगत जीवनातील सुखदुःखांचे, भाव-भावनांचे वर्तुळ छेदून, व्यापक समाजजीवनातील वास्तवाकडे घेऊन जाणारा आहे. ' तू : काही कविता ' व ' विस्कटलेल्या कविता ' या दोन विभागातील कवितांमागे कवीचे व्यक्तिगत भावविश्व उभे असलेले दिसते. नंतरच्या पाच विभागातील कवितांमधून व्यक्तिगत भावविश्वाच्या या मर्यादा ओलांडून कवी समाजविषयक जाणिवेच्या दिशेने जाताना दिसतो. व्यक्तिगत जीवनातील दर्शनी आरसे फोडून पाऱ्याआडचे खरे रूप शोधण्याची ऊर्मी या कवितांमधून दिसते व त्यामुळेच ती दिशाहीन भरटकलेली न वाटता तिच्या प्रवासाचा रोख कळू शकतो.

'तू : काही कविता' या विभागातील कविता या प्रेमविषयक आहेत व त्यातही प्रेमानुभवातील सांकेतिकताच बरीचशी दिसते. काही वेळा तर प्रेमातील शृंगारिक छटा किंवा स्त्रीदेहाचे वर्णन अत्यंत ढोबळ स्वरूपात पुढे येते ' विस्कटलेल्या कविता ' या विभागातील कवितांमधूनही अभिव्यक्तीचा बटबटीतपणा जाणवतो. उदाहरणार्थ पुढील ओळी पहा—

मावळता चंद्र
मेलेलं वारं
आणि मंदावलेल्या चांदण्या
ह्या सुन्नाट एकांती
सोबत करताहेत...
अश्रू आत्ताच
थकून झोपी गेलेत
नाही तर ती एक सोबत असते
असे असले तरी
मन सैरभैर
नुस्तं नुस्तं
साऱ्या रातीला
आसवांची गस्त...

अशा सुंदर ओळीही क्वचित भेटतात.

पुढच्या पाची भागांतील कविता वाचल्यावर जाणवते ते हे की, कोपडर्यांच्या कवितेचे नाते त्यांच्या जगण्याशी आहे. त्यांच्या कवितेमागे व्यथा भोगणारे, वेदना जाणणारे जसे मन आहे, तसे स्वप्ने पहाणारे हीमन आहे. त्याचबरोबर समाजवास्तवाचा शोध घेणारे मन आहे. ते कधी मुक्तपणे आपल्या प्रतिक्रिया नोंदवताना दिसतात तर कधी प्रसंगांमधून, दृश्यांमधून आणि प्रामुख्याने प्रतीकांमधून आपली जीवनविषयक जाणीव व्यक्त करतात. या संग्रहातल्या कविता वाचताना पहिलं वैशिष्ट्य मला जाणवलं ते हे की, हा जरी कवीचा पहिलाच संग्रह असला, त्याच्या काव्यप्रवासाची ही सुरुवात असली तरी या कवीला कुठं जायचंय, या प्रवासाचा अंतिम टप्पा कुठला असणार आहे हे माहीत आहे. याचा अर्थ असा की, संकेतस्थानाची निश्चिती

ही या काव्यप्रवासामागची खरी प्रेरणाशक्ती आहे व त्यामुळेच कवीजवळ एक प्रकारचा आत्मविश्वास आहे. तिथं दिशाहीनतेला, भरकटण्याला वाव नाही. आजच्या बऱ्याचशा तरुण कवींची कविता ही दिशाहीन होऊन भरकटलेल्या अवस्थेत सापडलेली दिसते. ही अवस्था या कवितेत दिसत नाही. अंतिम टप्प्याकडे जाणाऱ्या या प्रवासाचं महत्त्व व त्यातील धोके हे दोन्ही या कविला माहीत आहेत. त्यामुळेच वास्तवाचं भान जसं त्यानं सोडलेलं नाही तशाच अवास्तव अपेक्षाही बाळगलेल्या नाहीत.

'शहर आणि मी : काही कविता'त कोपर्डे यांनी शहरी संस्कृतीचे, या भेसूर महानगरीय संस्कृतीत मानवी अस्तित्वाला लागलेल्या सुरुंगांचे, त्यातील ताणतणावां-खाली घुसमटणाऱ्या व्यक्तीचे चित्रण केले आहे. क्रमांक ४ व १३, १४ या कवितांमधून ही महानगरीय संस्कृती तिच्या सगळ्या भेसूरतेसह, हिंस्र श्वापदासारखी उभी असलेली दिसते. हे चित्रण करतानाच त्यांची काव्यविषयक निष्ठा किती तीव्र आहे याची साक्षही आपल्याला मिळते. क्रमांक ४ च्या कवितेत ते म्हणतात–

कोणत्याही मध्यरात्री
अचानक झंझावाती हल्ले चढतील
आणि शहर स्वतःला झोकून देईल
पाऊसलाटांत...
चिरे भिंतीतून
सोडवून घेत जातील आपले
तथाकथित अस्तित्व...
कोसळत्या ढिगाखालून
माझा मृत हात उगवला असेल
आणि काही कविता
तुमच्या व्यवहारी दयेच्या.

मानवी अस्तित्वाच्या अशा मृत अवस्थेतही कविता शिल्लक असेल असे जेव्हा कवी म्हणतो तेव्हा काव्याच्या जिवंतपणाचे रहस्य त्याने ओळखले आहे हे कळते. 'तुझ्या शब्दांचे काफिले मुक्कामाला सुखरूप पोहोचले' या ओळीतूनही कवीची काव्यविषयक निष्ठा, मनःपूर्वकता यांचेच दर्शन घडते.

'देशांतराचे पक्षी' व 'पाखरांच्या आत्महत्येनंतर' या विभागातून पक्षी हे प्रतीक कल्पून, पक्ष्यांविषयीच्या संकेतांचा उपयोग करून प्रामुख्याने मानवी जीवनासंबंधी, व्यक्तीव्यक्तीतील नातेसंबंधांविषयीच विचार मांडले आहेत. कोपर्डे ह्यांच्या दृष्टीने पक्षी हे मानवी अस्तित्वाचा, मानवी जीवनातील गुंतागुंतीचा शोध घेणारे प्रेरकशक्ती आहेत. कवीची पक्षांविषयीची ही भावना अनेक ओळींमधून व्यक्त झाली आहे.



**प्रमोद मनोहर कोपर्डे**

१९७२ ते १९८१ या काळातील निवडक कवितांचा संग्रह 'पाखरांच्या आत्महत्येनंतर' नुकताच नीलकंठ प्रकाशनातर्फे प्रकाशित. 'पान पान जाळी झाले' या पहिल्या लघुकादंबरीला 'अनुष्टुभ'ने दिवाळी १९८१ मध्ये आयोजित केलेल्या स्पर्धेत पहिल्या क्रमांकाचे 'रेऊ' पारितोषिक. सत्यकथा, प्रतिष्ठान, अनुष्टुभ, हंस, पूर्वा इ. नियतकालिकांमधून कवितांना प्रसिद्धी. तसेच काही कथा 'रविवार सकाळ'मधून तर काही लेख 'किर्लोस्कर' मधून प्रसिद्ध झाले.

पत्ता : ९२९/२९ शनिवार पेठ,
सातारा : ४१५००२

तुमचे सारेच सूर
आता आठवत नाहीत
आठवत नाहीत
शेवटचे टाहोही नीटसे ..
मिटताना
तुमच्या इवल्याशा
डोळ्यांत साकळलेल्या
हजारो व्याकूळ कविता मात्र
अजून माझ्या डोळ्यांच्या
तळाशी ठणकत असतात...

इथे कवीची व पक्ष्यांची व्यथा एकरूप होऊन अवतरताना दिसते. या कवितांमधून कोपर्डे यांनी पक्ष्यांची एक प्रतिमासृष्टीच उभी केली आहे. ही प्रतिमासृष्टी संवेदनशील कविमनाच्या भावविश्वातूनच उदयाला आली आहे. त्या दृष्टीने खालील ओळी पहाण्यासारख्या आहेत–

१. न विचारता जुन्या सवयीनं
खिडकी उघडताच
माझ्या मिठीत कोसळून
पडले थवे सवयीनं (पृ. ४७)

२. संध्याकाळ कधीच बुडून गेली
दिव्यांत गाव न्हाऊन निघालं
पाखरं का परतली नाहीत
डोळ्यांच्या कुशीत...!
का शाप असतो काही घरट्यांना
एकटं जगण्याचा...! (पृ. २६)

३. देशांतराचे पक्षी
आपले कधी मानू नये
परतण्याची हळवी शपथ
त्यांना कधी घालू नये (पृ. २५)

काही वेळा पक्ष्यांमध्ये आढळणारे आदर्श गुणच कवीला सामर्थ्य देतात. पक्ष्यांच्या प्रतिमासृष्टीतून स्फुरलेल्या या कवितांचे वैशिष्ट्य हे की, त्या भावकविता असूनही भावव्याकुळ होताना दिसत नाहीत. जीवनातील वास्तवतेचा शोध घेण्याची वृत्तीच त्यांच्यात दिसते. क्रमांक चौदाच्या कवितेत तर कवीने आजच्या वास्तवावर उपहासातून ओरखडाच ओढला आहे. आजचे जीवन किती कृत्रिम व खोटे झाले आहे हेच कवीने सांगितले आहे :

आता ते सर्वजण
हा एक टूरिस्ट पॉइंट करतील
त्याला काही तरी नाव देऊन
'Suicide Point' वगैरे.
ते टोळक्याटोळक्यांनी
खिदळत येतील

१

तुझ्या शब्दांचे काफिले
सुखरूप पोहोचले

त्यांनी शहरात प्रवेश केला
तेव्हा पूर्वरात्र भरात होती
माझ्या उंबरठ्यावर पणती
हेलकावत होती...

गल्लीच्या अंधारी वळणावरून
ते पुढे आले आणि
मी सामोरा गेलो
त्यांच्या डोळ्यात ओळख शोधत
राहिलो
ते थकलेले...
पंखांवरची धूळ झटकीत
उंबरठा ओलांडून आत आले
माझ्या बोटाला धरून
तेव्हा मध्यरात्र दिव्यावर
काजळी धरत होती...

ते मग सहज सैलावत गेले
हळुवार डोळ्यांच्या डोहात उतरत
राहिले
पापण्यांच्या काठावर काही
लाटा हिंदकळत येत राहिल्या
तेव्हा उत्तररात्र
हलक्यानं उमलत गेली...

तुझ्या शब्दाचे काफिले
मुक्कामाला सुखरूप पोहोचले

२

तुमच्या आत्महत्येनंतरच्या कातरवेळी
गलबलून येत नाहीत आता पूर्वीसारखे
सळ
चुकून एखादा येतोही अश्रू पापण्यांच्या
काठावर
नाही असे नाही..

तुमच्या आत्महत्येनंरच्या कातरवेळी
चितारले जात नाहीत डोळ्यांत
मावळतीचे लोभस रंग
एखादा काळवंडत जाणारा
ढगाचा तुकडा रेंगाळत रहातोही
रात्रभर
नाही असे नाही...

तुमच्या आत्महत्येनंतरच्या कातरवेळी
संवेदनाहीन बनत जाते अवघे अस्तित्व
श्वास तरीही चालूच असतो
नाही असे नाही...
तुमच्या आत्महत्येनंतरच्या कातरवेळी

'आजचे कवी' या लेखमालेत १९७० नंतर कविता लिहायला ज्यांनी सुरुवात केली अशा दहा कवींचा अभ्यास लेखकानं केला आहे. त्यापैकी द. भा. धामणस्कर, हेमंत जोगळेकर, वृंदा लिमये, अनिल द्रवीड आणि प्रमोद कोपर्डे या पाच कवींच्या कवितेवरील लेख या लेखमालेत आतापर्यंत प्रसिद्ध झाले. दिवाळीपूर्वीचा हा शेवटचा अंक आहे. दिवाळीनंतर याच मालेतील नारायण कुलकर्णी कवठेकर, उत्तम कोळगावकर, ह. शि. खरात, अनुराधा पाटील आणि वसंत जाधव यांच्या कवितेवरचे लेख क्रमशः प्रसिद्ध होतील. —संपादक

इथे त्यांनी सामुदायिक
आत्महत्या केली
वगैरे कथाही आठवतील
सहज जाता जाता
ते सराईतपणे
खोटं हसता हसता
फोटो काढून ठेवतील
आपल्या भावी पिढ्यांसाठी

काही कवितांमधून व्यक्तीच्या अगतिकतेची, असहायतेची खंत व्यक्त झालेला दिसते. ती अंतर्मुखतेतून आलेली असल्यामळे खोटी किंवा वरवरची वाटत नाही. तिच्यातील उत्कटता शब्दाशब्दांमधून जाणवते. भोवतीच्या वास्तवाचे प्रखर भान जसे तिच्यात आढळते तसेच काही मोजकेच बाह्य घटक घेऊन यथार्थपणे अंतर्दर्शन घडविण्याची क्षमता ह्या कवीजवळ आहे हे पटते. स्त्री–संबंधीचे विविध भावाविष्कारही या संग्रहातील कवितेत जागोजागी आढळतात; परंतु हे भावाविष्कार अनेक वेळा सांकेतिक, अलंकारिक काव्यरचनेतून, प्रतिमांमधून व्यक्त होतात. निसर्ग व प्रीती यांच्या वास्तवाची जाणीव भावना–विचारांच्या ठराविक–पारंपरिक आशयातून व्यक्त होताना दिसते. अशा सांकेतिकतेतून कोपर्डेंची प्रेमकविता बाहेर पडली तरच तिला तिचे स्वतःचे रूप गवसू शकेल.

कोपर्डेंच्या कवितेत जो जीवनानुभव व्यक्त होतो, तो ते ज्या समाजात जगत आहेत, त्या समाजाचाच आहे. त्यांच्या कवितेची भाषाही त्यांच्या अनुभवविश्वाशी संवादी अशीच आहे. आज या कवितेत वेदनेचा स्वरच अत्यंत तीव्रतेने दिसत असला तरी भविष्यात वेदनेची ही जागा विद्रोहाने घेतलेली असेल असे वाटावे, अशी ही कविता आहे. कारण वास्तवाकडे पाठ फिरवण्याची तिची वृत्ती नाही.

कोपर्डेंची कविता वाचताना असा अनुभव सर्वांनाच येईल असे नाही; पण जे आहे ते कोणतीही कृत्रिमता, आक्रस्ताळेपणापेक्षा निराळे आणि खरे आहे असे मात्र नक्की जाणवेल आणि इतके यश पहिल्याच संग्रहाला पुरेसे आहे.

□

येत्या २५ ऑक्टोबर १९८३ रोजी, ऊर्दू साहित्यातील महान कवी आणि गीतकार साहिर लुधियानवी यांच्या मृत्यूला तीन वर्षं पूर्ण होत आहेत. त्यांच्याच 'परछाईयाँ' आणि 'जंग' या दोन कवितांचा भावानुवाद इथे दिला आहे. मनाच्या खोल तळात साचलेल्या आणि सावलीसारखा पाठलाग करणाऱ्या तरल आठवणी आणि युद्धाचा प्रखरपणा भेडसावणारी त्यांची जाणीव–साहिर लुधियानवी यांनी या दोन्ही कविता सारख्याच हळुवारपणाने शब्दबद्ध केल्या आहेत . . .

# पडछाया

तरुण निशेच्या वक्षावर हिमधवल पदर
सुंदर स्वप्नागत मजेनं लहरतो आहे;
सुंदर फुलं, सुंदर पानं, सुंदर फांद्या
लचकताहेत कुणा रूपमतीच्या देहासम !
आसमंतात धुसर झालेल्या क्षितिजरेषा
धरति रमणीय स्वप्नभूमीच जशी !
कधी गर्वाने, तर कधी स्मृतीने
– कल्पनेच्या पडछाया उभरताहेत !

ज्या तरुतळी विसावत असू आम्ही
ते तरू उभे आहेत अजून मूक साक्षी बनून

यांच्याच सावलीत पुन्हा दोन उमलती मनं
मूक ओठांनी काही सांगाय–ऐकयला आलीत
न जाणे द्विधा मनांनी, किती मुष्किलीने
हे निजले– जागते क्षण चोरून आणलेत !

हाच ऋतु, हीच वेळ, हाच मोसम–
इथूनच आमच्या प्रेमाने वाटचाल आरंभली होती
बुजऱ्या दिलांनी बावऱ्या नजरांनी
देवाच्या कानी आपली छोटी मागणी घातली होती,
की या मनोकळयांची फुलं व्हावोत–
नयनींच्या भावपूजेनं तू प्रसन्न व्हावंस
– कल्पनेच्या पडछाया उभरताहेत!

तू येतेस ती जगाची नजर चुकवून
दृष्टी अधोमुख नी देह झाकून घेऊन;
आपल्याच पदरवाने दचकत, बिचकत
आपल्याच पडछायेच्या दुर्बलतेवर धुमसत
– कल्पनेच्या पडछाया उभरताहेत !

हवेच्या झोक्यावर लहान तारू सफरीला निघालंय
नदीच्या मंदलयीवर नाविक गीत गातोय;
तुझी कोमल काया हवेच्या झुळूकेगणिक
माझ्या उघड्या बाहूंत झुलते आहे.
– कल्पनेच्या पडछाया उभरताहेत !

तुझ्या केशपाशांत मी पुष्प माळतोय
तुझे नेत्र आनंदोर्मींनी खाली झुकतायत
न जाणो आज मी काय सांगणार आहे ?
पण ही जड जीभ आवाजच उमटू देत नाही
–कल्पनेच्या पडछाया उभरताहेत !

तुझे सुडौल बाहू माझ्या गळी गुंफलेयत
तुझ्या अधरी माझ्या ओठांची छाया आहे,
माझा विश्वास की आपण पुन्हा कधीच अंतरणार नाही,
अन् तुझी खात्री की मिळूनही आपण परकेच राहणार.
–कल्पनेच्या पडछाया उभरताहेत !

माझ्या पलंगावरील विखुरलेले ग्रंथ
विनयाने वाकून तू नीट ठेवते आहेस.
पहिल्या रात्री नवोढा जे गीत मनाशी गाते
तसं काही मंद स्वरांत तू गुणगुणते आहेस,
– कल्पनेच्या पडछाया उभरताहेत!

ते पळ किती मनोहर होते
ह्या घटिका किती मधुर होत्या !
मुंडावळ्या किती मोहक होत्या,
अन् फुलमाळा किती सुगंधी होत्या !

वस्तीतली हरएक समृद्ध आळी
होती जणु एक स्वप्नी मयभूमि !
आपला हर श्वास, हवेचा हर झोत
काव्याचं भांडारच घेऊन आला जणु !

अकस्मात डुलत्या पिकांतून टापांचा नाद उमटला
जळत्या सुरुंगाचा वास लेवून पश्चिमवात थडकला;
निर्माणाच्या मुखावर विनाशाचा मेघ उतरला
गावागावांत क्रौर्य शिरलं, जंगल फैलावलं
सभ्य पश्चिम देशांतून खाकीधारी अवतरले
थैमान घालते आले–नाचते मदांध आले
मूक जमिनीच्या छातीत तंबूचे ताण घुसले !
लोण्यासारख्या मऊ पथावर बुटांचे व्रण उमटले
लष्करी कर्कश बँड पुढे चरखा नीरव झाला;
जीपच्या जळत्या धुळीखाली रेशमीवसन विध्या झालं !

माणसाची किंमत घटू लागली, धान्यांचे भाव चढू लागले
चौकांतली रंगत फिकी झाली रिक्रूट कचेरी फुगू लागली
गावचे तगडे जवान सैनिकी वेष पेहरू लागले
ज्या वाटेने थोडेच परतू शकतात त्या वाटेनं निघाले !

फौजी तुकड्यांतून ऐरे गेले–तरणेबांडही
मातांची वाढती मुलं गेली बहिणींचे प्यारे भाईही
वस्ती उदास झाली, गर्दीची शान निस्तेज झाली
आम्रतरूवरली झुल्याची आंदोलनं थंडावली !

धूळ उडू लागली मंडईतून, भूक उगवू लागली शेतांतून
हरएक वस्तु दुकानांतनं निघून चोरदारी गेली !
मेंढपाळ वाट विसरले, स्त्रिया जलभरण विसरल्या
कितीएक अल्लड बाला आईबापांचा उंबरा सोडून गेल्या !

दारिद्र्याच्या ओझ्याखाली भू–देवांनी बैल विकले, शेतं गमावली
जीवन–लालसेच्या हातांनीच जगण्याची साधनं विकली !
विकायला उरलं नाही काही–तशी देहविक्रीला भरती आली
जी गोष्ट अजून एकांतात होती, ती उजळ माथ्याने
बाजारात आली.
—कल्पनेच्या पडछाया उभरताहेत !

तू येते आहेस सर्वांसमोर केस सोडून
जणु हजार पापांचं ओझं पेलून !
लोलुप नजरांच्या उद्दाम समूहांतून
देहाची नग्नता लपवीत, सावरीत;
—कल्पनेच्या पडछाया उभरताहेत !

मी नगरातील हरएक दारात डोकावून आलो
परंतु कुठेच श्रमांचं मोल मिळू शकलं नाही.
जुलुमकर्त्यांच्या राजकीय जुगारांत–
शोकमग्न विवेकाला मोल मिळू शकलं नाही.
—कल्पनेच्या पडछाया उभरताहेत !

तुझ्या घरात कल्पांताचा कल्लोळ झाला,
जेव्हा रणातून तारवाला तार घेऊन आला,
ज्याची खुशी तुला प्राणाहून प्यार होती
तो तुझा भाऊ शत्रूच्या दारी कामी आला.
—कल्पनेच्या पडछाया उभरताहेत !

प्रत्येक पावलावर निंदेची टोळकी आहेत
दर वळणावर व्यथितांचे मेळावे आहेत,
न मैत्री, न उपचार, न सदिच्छा, न जिव्हाळा
कोणी कोणाचं नाही आज–सारे एकाकी आहेत.
—कल्पनेच्या पडछाया उभरताहेत !

ती जाती वाट आज माझ्या मनागत मौन आहे
न जाणे ती तुला कुठे नेऊन सोडणार आहे ?
तुला खरीदताहेत सद्विवेकांचे लुटारू आज,
क्षितिजावर इच्छेच्या रक्ताची लाली आहे
—कल्पनेच्या पडछाया उभरताहेत !

सूर्याच्या रक्तात न्हालेली सांज अजून आठवतेय
इच्छा–आकांक्षांचा शेवट अजून मला स्मरतोय,
त्या सांध्यवेळी मला कळून चुकलं की शेतासारखं
निष्पाप पोरीच्या मुखावरलं हास्यही विकलं जातं.
त्या सायंकाळी उमगलं की, धनिकांच्या हातात–
दोन निरागस आत्म्यांची ओळखही विकली जाते !

त्या सांजेस मला जाणवलं की पैतृक जमीन
छिनली जाते
ममतेच्या सोनल स्वप्नांची अमोल स्मृति विकली जाते,
त्या संध्याकाळी मला समजलं की जेव्हा रणात
भाऊ कामी येतो,
तेव्हा वेश्यालयात बहिणीचं यौवन कामी येतं !

सूर्याच्या रक्ताने माखलेली ती सांजवेळ अजून याद आहे
इच्छेच्या सोनल–स्वप्नाची अखेर अजून याद आहे !

तू आज हजारो मैल दूर, कुठे एकांतात–
किंवा सौख्यानंदांत देखील ?
माझी स्वप्नं विणत असशील बसून परक्याच्या पुढ्यात !

अन् मनाशी दुःख धरून रात्रंदिन मी राबतो आहे
जगण्यासाठी मरतो आहे,
आपली कला बदनाम करून दुसऱ्यांच्या थैल्या भरतो आहे !

असाह्य तू, असाह्य मी, असाह्य ही सारी दुनिया
तनाचं शल्य मनावर भार झालंय.
या सांप्रतकाळी जिवाचं मोल आहे सूळ वा निंदा !

न मी सूळाशी जाऊ शकलो, न तू रणसीमेशी पोचू शकलीस
वाटलं असलं तरी ना मला मिळवू शकलीस !
तू–मी, असे दोन आलो की जे शांतीचा प्रांत न गाठू शकले !

जगायचं म्हणून जगतो तर आहो, पण श्वासांत
चिता जळते आहे
मौन विश्वास ढळतो आहे,
या कठोर वास्तव जगात स्वप्नांचा शालू जळतो आहे !

अन् आज या तरुतळी पुन्हा दोन छाया थरथरताहेत,
पुनश्च दोन मनं भेटीस आलीत,
तेव्हा परत मृत्यूचं वादळ घोंघावतंय, युद्धमेघ गरजताहेत !
मला वाटतं की, यांचीही अखेर आपल्यागत न होवो

यांचा उल्हास तरी कलंक न पावो,
यांच्याही भाळी रक्त माखलेली सांज न येवो !

सूर्याच्या रक्ताने निथळणारी ती संध्या स्मरतेय,
कामनेच्या सोनेरी स्वप्नांची वासलात अजून स्मरतेय !
आपलं प्रेम अपेक्षांची भिंत पाडू शकलं नाही—
मात्र यांना तरी यांच्या मनोकामनांची रात्र भेटावी.
द्विधा मनाने आपल्या स्वप्नांची राख झाली,
निदान यांना तरी गातं—हसतं आयुष्य लाभावं !

सत्ताधीशांच्या खेळाची फार जुनी ही रीत,
की जेव्हा मुलं वयात येतील, तेव्हा ठार करावीत !
फार पुराणा उन्माद आहे हा सत्ताधाऱ्यांचा,
की दूर—दूरच्या मुलुखात अकाळ पेरला जावा !

फार काळापासून यौवनाची स्वप्नं विराण झालीत
फार काळापासून प्रेम आसरा धुंडतं आहे
फार काळापासून विनाशाच्या वाटेवर—
सुंदर जीवन शील जपण्यासाठी आसरा शोधत आहे !

चला— आपण सर्व चिरडलेल्या आत्म्यांना सांगू,
की आपली प्रत्येक जखम ताजीतवानी करा !
आमचं हे गुपित आमचंच नसून सगळ्यांचं आहे
चला-सर्व जगाला आपण ह्यात सामील करून घेऊ.
उठा, आज या राजकारण्यांना ठणकावून सांगू,
आम्हाला या युद्धनीतीचा तिटकारा आहे !
ज्यांना रक्तरंगाखेरीज अन्य रंग रुचला नाही
त्यांना बजावू, की आम्हाला लाल रंगाची घृणा आहे !

सांगू—की पुन्हा कुणी घातकी इथे येईल,
तर दर एक पदागणिक धरणी कठोर बनेल
वायूचा हर स्रोत दिशा बदलून झपटेल;
तरू—तरूंची शाखा वज्र—पाषाण बनेल !

उठा, सर्व रणवेड्यांना आज ऐकवा—
की आम्हाला धंद्यासाठी अवजारं हवीत;
आम्हाला कुणाचा मुलुख लुटायची हौस नाही
आम्हाला तर शेतीसाठी नांगर—खुरपी हवीत !

यांना सुनवा, की परत कोणी दलाल इथे न फिरको,
या स्थळी पुन्हा कन्या—विक्रय व्हायचा नाही !
काळी माती जागी झालीय—पिकं तरारून उठलीत;
पुन्हा जमिनीचा एक तुकडाही मिळणार नाही !
ही भूमि गौतम—नानकाची आहे...
या पवित्र भूवर रणवेडा कधी पाय नाही ठेवू शकणार !

येत्या पिढीसाठी आमचं रक्त आम्ही गहाण ठेवलंय,
त्या रक्तावर तुम्ही फौज नाही पोसू शकणार !
सांगा, की आजही जर मूक राहिलो आम्ही
—तर या तेजस्वी भूमीची उरेल ना धडगत;
उन्माद—भ्रष्ट अणुअस्त्रांच्या माऱ्यापुढे
धरणीची खैर नव्हे; ना गगनाची धडगत !

गेल्या लढाईत खाक झाली घरं—दारं; आता ?
अशक्य नव्हे की शांतीचीही राख होईल !
गेल्या युद्धात मानवी देहच तेवढे गेले—आता ?
अजब नव्हे की त्यांच्या पडछायाही भस्म होतील !
—कल्पनेच्या पडछाया उभरताहेत !

भावानुवाद : मनोहर देखणे

---

# ॥ युद्ध ॥

---

रक्त आपलं सांडो की परक्यांचं,
मानवजातीचंच रक्त वाहे शेवटी ।
युद्ध पूर्वेत होवोत की पश्चिमेत,
जागतिक शांततेचाच नाश आहे शेवटी ॥ १ ॥

बॉंब घरांवर पडोत की सीमेवर,
सृजनाच्या आत्म्यालाच जखमी व्हावे लागते ।
शेतं आपली जळोत की परक्यांची,
भुकेने जीवमात्रालाच तडफडावे लागते ॥ २ ॥


रणगाडे पुढे सरकोत की मागे हटोत,
कूस धरतीमातेचीच वांझ होत असते ।
विजयोत्सवाचा आनंद असो की पराजयाचा शोक,
शेवटी, जीवन, प्रेतांवरच अश्रू ढाळताना दिसते ॥ ३ ॥

खरं पाहता, 'युद्ध' हीच एक समस्या आहे.
युद्धांमुळे समस्यांची सोडवणूक काय होणार ?
भीषण आग आणि रक्त ओकेल आज,
भूक आणि गरजा उद्या देणार ॥ ४ ॥

म्हणूनच, हे सभ्य—गृहस्थ हो, जरा ऐका !
युद्धाचा धोका टळत राहावा हेच बरं !
तुमच्या—आमच्या, सर्वांच्या घरात,
दिवा जळत राहावा हेच बरं !

भावानुवाद : प्रा. टी. के. जाधव

# कुंपण आणि आकाश



मंगला गोडबोले

'कुंपण आणि आकाश' या सदराखाली स्त्रीमनाचा जाणीवपूर्वक शोध घेण्याचा प्रयत्न आहे. या शोधात कधी स्वतःचं सामर्थ्य जाणवल्याची खूण आहे तर कधी मर्यादांची स्पष्ट जाणीव आहे. ९ जुलै अंकापासून दर पंधरा दिवसांनी हे लेख प्रसिद्ध झाले. दिवाळीपूर्वीच्या या शेवटच्या अंकात या मालिकेतला हा आठवा लेख दिला आहे.

नुकतीच डॉक्टरेट मिळालेल्या एका विदुषींची मुलाखत घेत होते. डॉक्टरेटचा त्यांचा विषय नेहमीपेक्षा अगदी वेगळा होता. त्यात नुसत्याच पुस्तकी उलाढाली नव्हत्या, नुसत्याच शब्दचिकित्सा नव्हत्या, आकडेवारीच्या भडिमारातून आधीच ठरलेल्या निष्कर्षांप्रत येण्याची गरज नव्हती. वारली, कामकरी अशा काही कष्टकरी जमातींच्या पारंपारिक व्यवसायांमागचं अर्थशास्त्र समजावून घेण्याचा प्रयत्न जवळजवळ पहिल्यांदाच बाईंनी केलेला होता. एरवी सामाजिक, सांस्कृतिक संदर्भात या जमातींविषयी खूप लिहिलं गेलं असलं तरी व्यवसायामधली त्यांची गुंतवणूक, कामाचं स्वरूप, त्यात जाणारा वेळ, विक्रीव्यवस्था, नफातोटयाचं गणित यासारख्या अनेक अंगांनी त्यांच्या जगण्यातलं अर्थशास्त्र बाईंनी शोधण्याचा प्रयत्न केला होता. त्यासाठी नियोजित वेळेपेक्षा तिप्पट वेळ म्हणजे सहा वर्षं खर्च केली होती. या जमातींच्या जीवनाची जवळून ओळख व्हावी म्हणून त्यांच्यापैकी अनेकांच्या कुटुंबांमध्येही त्या राहिल्या होत्या. ते एका अर्थानं धाडसच होतं. तशा त्या तरुण, सुस्वरूप आणि मुख्य म्हणजे या कामात अडथळा येऊ नये म्हणून स्वेच्छेनं अविवाहित राहिलेल्या. त्यामुळे परक्या वातावरणात, परक्या कुटुंबांमध्ये दिवसाचे दिवस घालवणं तसं अडचणीचंच! त्यांच्याच सांगण्याप्रमाणे या कामी तिथल्याच एका वडीलधाऱ्या, पुढारीवजा माणसानं फार मदत केली. बाईंची सर्व व्यवस्था, राहणं, जेवण, चार लोकांत ओळखी करून देणं... या पुढारीवजा माणसाचा बाईंच्या कामात सिंहाचा वाटा झाला होता. बाई त्याबद्दल कृतज्ञ होत्या. मुलाखतीमध्ये आपल्या फोटोबरोबर त्यांचा फोटोही छापावा असा त्यांचा आग्रह होता. इथपर्यंत मला सगळंच सरळ वाटलं. त्या माणसाच्या फोटोखाली जी ओळ त्यांनी लिहायला सांगितली ती मात्र मला विचारात पाडून गेली. 'हे माझे मानलेले वडील' असं लिहा, त्या पुन्हापुन्हा आग्रहानं सांगायला लागल्या. त्या माणसाचा बाईंच्या वयाचाच मुलगा, साहजिकच मानलेला भाऊ झाला. मग दरसाल तो भाऊबीज काय देतो याचाही उल्लेख झाला. मला एकीकडे हा मानलेल्या नात्यांचा प्रकार शाळकरी वाटत होता आणि दुसरीकडे त्यातला खोल अर्थही जाणवत होता.

त्याच आठवडयात योगायोगानं आणखीही तीन-चार बायका तीन-चार संदर्भामध्ये भेटल्या, त्यांचेही मानलेले दीर, (भाऊजी) काका, आजोबा वडील वगैरे कुठे कुठे निघालेच. ज्यांनी इतक्या ढोबळपणे मानलेली नाती जोडली नव्हती त्यांनी 'अमके मला वडिलांसारखे आहेत', 'तमक्यांचा मोठ्या दिरासारखा दरारा वाटतो' असं म्हणून नात्यांसदृश संबंध दाखवून दिलेले होतेच. मला गंमत वाटली. एकीकडे कौटुंबिक नातेसंबंधांची बदलत्या सांस्कृतिक चित्रात कशी ससेहोलपट होत्येय हे आपण बघतोच आहो. मग त्यात पिचून निघालेल्या बायका पुन्हा या मानलेल्या नात्यांच्या वाटयाला का जातात? सहजच हेही लक्षात आलं की, मानलेल्या नात्याचं स्वरूप अगदी मर्यादित आहे. मानलेली जाऊ, नणंद, काकू वगैरे कधी कुठे दिसते का? क्वचित मानलेली आई, बहीण असते, पण तिचंही शाब्दिक कौतुक किंवा प्रदर्शन 'मानलेल्या भावासारखं' होत नाही. म्हणजेच कुठे तरी पुरुषांची मानलेली नाती ही बायकांची सोय आहे, ढाल आहे. बुरखा आहे.

वर उल्लेखिलेल्या बाई प्रौढ कुमारिका त्यामुळे त्यांना सोज्वळ हेतूचं प्रदर्शन करण्यासाठी ही नाती लागली; पण घरंदाज, विवाहित स्त्रियांचीही यातून सुटका दिसत नाही. एरवी नवऱ्याच्या मित्राला पञ्चयावत सुगृहिणींनी हमखास भावजी म्हटलं असतं का? अतिपरिचयानं आपल्याला कोणालाच यात काही आक्षेपार्ह वाटत नाही खरं; पण हीही एक प्रकारची स्त्रियांची नैतिक, मानसिक कोंडीच आहे आणि तिला इतर अनेक सांस्कृतिक, सामाजिक घटकांबरोबर खुद्द स्त्रियाही जबाबदार आहेत.

आपल्याकडे मुलींना मित्र असतात किती आणि वयाच्या कुठल्या टप्प्यापर्यंत? डोळसपणे पाहिलं तर जाणवतं की मित्राच्या नात्यामधला भावनिक आधार समजण्यापूर्वीच फक्त मुलींना मित्र असतात. ते म्हणजे वयाच्या दहाव्या-बाराव्या वर्षापर्यंतचे खेळगडी किंवा सवंगडी! नंतर हळूहळू अगदी आजच्या सहशिक्षणाच्या काळातसुद्धा, मुलामुलींमध्ये दुरावा येऊ लागतो. आकर्षण तर असतंच; पण ते दिसू नये, वाढू नये याचा मुलीकडून आणि कुटुंबाकडून, संस्कारांकडून आटोकाट प्रयत्न केला जातो. कॉलेजमध्ये मुलामुलींचे घोळकेच्या घोळके हास्यविनोद करत गप्पागाणी जमवत बरोबर जाताना दिसले की 'बघ ऽ किती मोकळं वातावरण आहे' असा शेरा हमखास आपण मारतो. (त्यात कदाचित असूयाही असते) पण तो मोकळेपणा दोन गटांमधला असतो, फारच ढोबळ वरवरचा असतो. एक मुलगा आणि एक मुलगी यांच्यात किंचितही जवळीक दिसली की आपण तत्काळ प्रेमाचं लेबल लावून शुभमंगलाकडे डोळे लावून बसतो. कारण पतिपत्नी याखेरीज कोणतंही नातं तरुण स्त्री-पुरुषात मानण्याची आपल्याला सवय नाही, आवड नाही आणि महत्त्वाकांक्षाही नाही. पुढे याच तरुण मुलींची लग्नं झाली की त्यांच्या जीवनात पुरुषांच्या नात्याचा उगमही होतो आणि शेवटही होतो. नवरा मिळाला की इतर पुरुष शून्यवत

(किंवा दीरवर!) याबाबतीत आपल्या समाजात बदलाची गती कमालीची संथ आहे हे गेल्या दोन-तीन पिढ्यांच्या जीवनावरून सहज समजतं. कदाचित कुणा मुलीला चांगला, निरोगी मित्र असलाच तरी सप्तपदीच्या एकेका पावलासरशी ती त्याच्यापासून दूर दूर जाते आणि यथावकाश विसरूनही जाते. ते जमण्यासारखं नसलं तरी नवऱ्याच्या उपस्थितीतच त्याला भेटण्या-बोलण्याचा कटाक्ष बाळगते व पुढे आपल्या कडेवरच्या बछड्याला हमखास त्याची 'मामा' म्हणून ओळख करून देते. एकेकाळची आपली मैत्री शक्य तितकी लपविण्याचाच तिचा प्रयत्न असतो जगापासूनही आणि कित्येकदा स्वत:-पासूनही! कारण खरं म्हणजे तेवढ्या मोकळेपणानं त्या मैत्रीचा स्वीकार, स्वागत करण्याची तिची शक्तीच राहिलेली नसते. राहता राहिली नवरा हाच मित्र असण्याची शक्यता; पण ती फार म्हणजे फारच दुर्मिळ! लग्नापूर्वीचा प्रियकर लग्नानंतरचा नवरा म्हणजे मालक बनण्याचा धोकाच जास्त! 'इस देशमें पती प्रेमी नहीं होते' या 'सिलसिला' सिनेमातल्या जया भादुरीच्या वाक्याच्या वेळी थिएटरमध्ये मिळालेली दाद आठवते! थोडक्यात म्हणजे विवाहित किंवा तरुण स्त्री मित्र-कल्पनेपासून कायमची वंचित असते!

या सगळ्यामुळे समाजाचा किती फायदा होतो कुणास ठाऊक! स्त्रिया मात्र नकळतपणे आयुष्यातल्या एका मोठ्या आनंदाला मुकत असतात. तो म्हणजे स्त्रीपुरुषातल्या निखळ मैत्रीचा आनंद. मुळात मैत्री हे मानवी नातेसंबंधामधलं सर्वात निरपवाद, श्रेणीरहित आणि प्रांजळ असं नातं आहेच; पण त्यातही स्त्रीपुरुषातल्या मैत्रीचा रंग अधिकच मोहक असतो. निसर्गत: ते एकमेकांच्या संगतीत खुलतात, स्वत:च्या शक्ती अधिकाधिक उत्कटतेने वापरू बघतात, एकजण ज्या ठिकाणी कमी पडत असेल ती त्रुटी दुसरा भरून काढू शकतो. परस्परपूरक, पोषक आणि आव्हानक असं हे नातं असतं आणि दोन स्त्रिया किंवा दोन पुरुष यांच्यामधल्या मैत्रीतला स्पर्धात्मक भाग त्यात फारसा नसतो. उलट उदारपणानं, समजूतदारपणानं वागण्याची शक्यताच जास्त असते. अडचण एवढीच आहे की या सगळ्याच शक्यता आपल्याकडे शक्यतांच्या पातळीवरच रहातात आणि स्त्रीपुरुष-मैत्री ही कल्पनेच्या पातळीवर उरते.

या कल्पनांचा विलास ज्या ललित साहित्यात दिसतो त्यात पती, पत्नी आणि 'वो' हा एक सनातन त्रिकोण झालेला आहे. हा (किंवा ही) 'वो' हजारो कथाकादंबऱ्यांमध्ये, सिनेमानाटकांमध्ये भयंकर मोठ्या समस्या निर्माण करतो. कारण त्याने अटळपणे जोडप्यातल्या दुसऱ्याला केविलवाणं, दु:खी, लाचार वगैरे बनवून टाकलेलं असतं. खुद्द स्त्रियांच्या लेखनामध्येही विवाहित स्त्रीच्या आयुष्यात दुसरा पुरुष किंवा विवाहित पुरुषाच्या आयुष्यात दुसरी स्त्री हे हे विषय इतके चावून झाले आहेत की आता चोथासुद्धा शिल्लक राहिलेला नाही. दोष त्या लेखिकांचा नाही. नवऱ्याखेरीज अन्य पुरुष एक तर त्यांच्यापैकी अनेकींच्या आयुष्यात आलेलाच नसतो आणि चुकून कोणी आलाच तर लैंगिक संदर्भापलीकडे त्याला सामोरं जाण्याची त्यांच्यात कुवत नसते. भरीला विस्तवाजवळचं लोणी, काचेचं भांडं इत्यादी सनातन उपमा, प्रतीकं, कल्पना बागुलबोवासारख्या उभ्या असतात आणि पुरुषापासून चार हात दूर राहणं हेच सुरक्षिततेचं आणि अंतिम सुखाचं वाटायला लागतं.

त्या दिवशी त्या विदुषींच्या तोंडून 'ते पुढारीवजा गृहस्थ किंवा त्यांचा मुलगा माझे चांगले मित्र आहेत.' हे वाक्य ऐकायला मिळालं असतं तर किती बरं वाटलं असतं! असेनात का ते वयानं वडील, नसेनात आपल्या रूढ जीवनपद्धतीचे... मैत्रीला असले अडथळे थोडेच येतात? पण नाही! त्या बाईंनीही आग्रह धरला, आम्हीही त्या फोटोखाली 'मानसवडील' असा गौरवपूर्ण(!!) उल्लेख केला आणि सगळ्यात गंमतीची गोष्ट म्हणजे बहुसंख्य वाचकांना तो आवडला! 'म्हणजे बघा, एवढी शिकलेली असून त्यांना वडिलांसारखं मानायला लागली.' किंवा 'जात कुठलीही असो. संस्कार महत्त्वाचा. भाऊ म्हणून राहिला ना उभा?' असेच शेरे ऐकू आले. खरोखर तरुण स्त्रियांना, तरुण किंवा प्रौढ पुरुष मित्र असू शकतात हा संस्कार आपल्यावर केव्हा होईल? □

## वर्गणीदारांना सूचना

वर्गणीदारांना दिवाळी अंक वर्गणीतच दिला जातो. ज्यांना दिवाळी अंक रजिस्टर्ड पोस्टाने पाहिजे असेल त्यांनी दि. २२–१०–८३ पर्यंत चार रुपये म. ऑ. ने पाठवावेत.

अंक व्यवस्थित मोजून पोस्टाच्या ताब्यात दिले जातात. तरीही अंक न मिळाल्यास प्रथम स्थानिक पोस्टाकडे चौकशी करावी. तेथे लेखी तक्रार द्यावी व तक्रारीची एक प्रत आमच्याकडे पाठवावी.

अंक शिल्लक असल्यासच व रजिस्टर्डसाठी चार रुपये पाठविल्यासच अंक पुन्हा पाठवू.

ज्यांची वर्गणी २२ ऑक्टोबर किंवा त्या सुमारास संपली असेल व ज्यांची पुढील वर्षाची वर्गणी जमा नसेल त्यांना दिवाळी अंक पाठविला जाणार नाही.

जे वर्गणीदार सा. माणूस कार्यालयातून दिवाळी अंक समक्ष नेणार असतील त्यांनी समक्ष वा पत्राने दिनांक २२–१०–८३ पर्यंत लेखी कळवावे.

ज्यांनी अशी पूर्वसूचना दिलेली आहे अशा वर्गणीदारांनी आपला अंक माणूस कार्यालयातून ३० ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर या काळात सकाळी १० ते सायंकाळी ५॥ या वेळात घेऊन जाण्याची व्यवस्था करावी. त्यानंतर दिवाळी सुटीनंतर म्हणजे १० नोव्हेंबरनंतर अंक मिळू शकेल.



# आपली मुलं

१. 'आपण मुलांशी बोलायला शिकू या!'

२. 'आनंदाचे अनुभव'

३. 'आपलं मूल आहे तरी कसं?'

४. 'आपण पालक म्हणून कसे आहोत?'

५. 'कुठे मिळेल पालकत्वाचं शिक्षण?'

६. 'मुलं आपल्याला घडवतात.'

७. 'ही पण आपलीच मुलं–'

हे सात लेख 'आपली मुलं' या लेखमालेत आत्तापर्यंत दर पंधरा दिवसांनी प्रसिद्ध झाले. दिवाळीपूर्वीच्या या शेवटच्या अंकात आठवा लेख दिला आहे. या लेखमालेतील पुढचा लेख दिवाळी अंकानंतर.



# काही वेगळी मुलं

शोभा भागवत

पुणे–मुंबई प्रवासात भेटलेली ती आठ वर्षांची छोटी मुलगी आणि तिची आई यांची मला अनेकदा आठवण येते. मुलगी नीटनेटकी, गोड चेहऱ्याची, उत्साही, चपळ होती. पण तिचं बोलणं स्पष्ट नव्हतं. ती काय बोलते आहे ते लक्षपूर्वक ऐकलं तरच कळत होतं. थँक्यूला ती अॅऊं म्हणत होती. झोपडीला ओंई. तिची आई मात्र तिच्याशी अगदी शांतपणे बोलत होती. याच वयाच्या एखाद्या व्यवस्थित बोलणाऱ्या मुलीशी बोलावं तितक्याच हळू आवाजात बोलत होती. ती बोलत असताना मुलगी लक्षपूर्वक तिच्या ओठांच्या हालचाली न्याहाळत होती. मुलगी फार मोठ्यानं बोलते आहे असं वाटलं तर आई तिला हळू बोलायला सुचवत होती!

मुलीचा अभ्यास चालू होता. कारण मुंबईला तिची परीक्षा होती. बंदर म्हणजे काय असं आईनं विचारल्यावर मोठ्या बोटी थांबण्यासाठी जिथे सोय केलेली असते ती जागा असं ती आपल्या उच्चारात सांगत होती. आई ज्या सुधारणा सुचवेल त्या लक्षात घेऊन पुन्हा उत्तर देत होती.

हे सगळं पाहून मी त्या मुलीच्या शेजारी जाऊन बसले. तिच्याकडे आणि तिच्या आईकडे पाहून हसले. मी काही डोळ्यात दयाभाव आणून पहात नाही, अरेरे काय बिचारीचं नशीब असं म्हणत नाही. शांतपणे कुतूहलानं आणि कौतुकानं त्यांचा अभ्यास ऐकते आहे हे पाहून मायलेकींना दोघींनाही विश्वास वाटला. मुलगी माझ्याकडे पाहून हसू लागली आईशी गप्पा सुरू झाल्या.

गप्पांमधून कळलं की, मूकबधीर मुलांना कसं शिकवायचं याचं प्रशिक्षण आईनं मुद्दाम आपल्या मुलीसाठी घेतलं होतं. त्याचा उपयोग करून ती मुलीला शिकवत होती. तिला आणखी एक मोठा मुलगा होता, मुलीचे वडील होते. ह्या मुलीला योग्य प्रकारे वाढवण्याचं, शिकवण्याचं आव्हान त्या घरानं पेललं होतं. आई सांगत होती मला हिच्या शाळेत जावं लागतं. शाळा लांब आहे कित्येकदा स्वैपाकाला वेळही मिळत नाही; पण माझे मिस्टर आणि मुलगा म्हणतात 'तू काही काळजी करू नकोस आम्ही करून घेऊ; पण तिच्याकडे आपलं दुर्लक्ष व्हायला नको.'

पालकांच्या ह्या समंजसपणाचा अतिशय चांगला परिणाम त्या मुलीवर दिसत होता. एरवी असा दोष असलेली मुलं बावळट दिसतात, पण ही मुलगी अगदी स्मार्ट दिसत होती.

त्या आईबद्दल अतिशय आदर वाटला मला. इतर सर्वसाधारण मुलांचं पालक होणं आणि अशा वेगळ्या मुलांचं पालक होणं यात केवढा फरक आहे हे जाणवलं.

मुलाचं हे वेगळेपण कधी शारीरिक अपंगत्वाचं रूप घेऊन येतं. जन्मतःच हात, पाय लुळा असणं, पोलिओनं हातापायांची वाढ खुंटणं, शारीरिक वाढ न होणं, कुबड असणं, चेहऱ्यावर काळे डाग असणं, कोड येणं, नाक, कान, ओठ यात काही व्यंग असणं, डोळ्यात दोष असणं. ह्या वेगळेपणाचा बौद्धिक वाढीवर बहुतेक परिणाम होत नाही.

## बाऊ केला नाही तर?

अशा मुलांबद्दल पालकांची पहिली प्रतिक्रिया 'हे आमच्याच वाट्याला का यावं?' अशी दुःखाची असते. 'आम्ही काय वाईट वागलो म्हणून आम्हाला ही शिक्षा?' असाही प्रश्न मनात येतो. नातेवाईक किंवा परिचित मंडळी अनेकदा क्रूरपणे याचा उल्लेख करतात आणि पालकांच्या जखमेवर मीठ चोळतात. काही मंडळी यावर अनेक वैद्यकीय, दैवी, धार्मिक उपाय सुचवत राहतात आणि पालकांना चांगुलपणापायी वैताग देतात.

'सतत नव्या नव्या उपचारात पालक इतके गुंतून जातात की, मुलाकडे रोगी म्हणू-

नच पाहिलं जातं आणि त्याच्या इतर गुणां-कडे दुर्लक्ष होतं. एक बारीकसा प्रश्न असलेलं पण एरवी अगदी इतरांसारखं असलेलं स्वतंत्र निरोगी व्यक्तिमत्त्व म्हणून अशा मुलांकडे पहायला, त्यांना वागवायला आपण सर्वांनीच शिकलं पाहिजे.

कधीकधी हे वेगळेपण केवळ शारीरिक नसतं. मानसिक, बौद्धिक वाढ नीट न होण्या-तून हे वेगळेपण येतं. मतिमंदत्वामुळं ही मुलं इतरांपेक्षा वेगळी दिसतात. कधी काही रोगामुळं चेहऱ्याच्या स्नायूंच्या, मानेच्या हालचालींवर ताबा रहात नाही. काही मुलं जन्मताच डाउन्स सिन्ड्रोम नावाची विकृती घेऊन जन्माला येतात. त्यांना मंगोल बेबी असंही म्हणतात. या मुलांची शारीरिक वाढ पूर्ण होत नाही. बौद्धिक वाढीचा वेग कमी असतो; पण काही मुलांत तो चांगलाही असू शकतो. अशा प्रकारची बरीच मुलं गोड स्वभावाची असतात असं म्हणतात.

मुलातलं वेगळेपण गंभीर असो किंवा आधी उल्लेख केल्याप्रमाणे केवळ शारीरिक असो, त्याला उपचारांची जेवढी गरज असते त्याहीपेक्षा इतर मुलांप्रमाणेच त्याला वाग-णूक मिळण्याची गरज असते. अनेकदा असं दिसतं की, अशा मुलांच्या भावंडांना त्याच्या व्यंगाबद्दल फारसं काही वाटत नाही. ती सहजपणे त्याच्याशी खेळू लागतात; पण पालकांना मुलाची लाज वाटते. त्यापायी अशा मुलांना इतरात मिसळू न देणं, शक्य तोवर घरातच ठेवणं, इतरांपासून लपवून ठेवणं अशी वागणूक या मुलाला मिळते. कधी ह्या मुलाबद्दल पालक फारच हळवे बनतात आणि त्याला अतिशय जपतात.

ह्या सगळ्याचा अशा मुलावर वाईटच परिणाम होतो. ह्या मुलाला जर पालकांनी, सहजपणे आपल्यात सामावून घेतलं, त्याच्या दुबळेपणाचा बाऊ केला नाही, त्याच्यावर टीका केली नाही, जरूर तेवढ्या सवलती देऊनही योग्य ती शिस्तही त्याला वेळेवर लावली, त्याला तू आम्हा सर्वांना आवडतोस अशी भावना दिली तर ही मुलंही मोकळी, खेळकर, आनंदी होतात.

नाही तर मुलाच्या व्यंगालाच जास्त महत्त्व दिलं, त्याचा बाऊ केला आणि त्याच्या इतर व्यक्तिमत्त्वाकडे दुर्लक्ष झालं तर मुलं खुरटतात, दुःखी, उदास, केविलवाणी बनतात. कधी इतरांना आवरेनाशीही बनतात.

अशा वेगळेपणामध्ये सामाजिक भागही फार मोठा आहे. एखाद्याचे डोळे नीट काम देत नसले आणि तो चष्मा लावत असेल तर ती आपण विकृती मानत नाही. उलट ती, फ्रेम चांगली दिसते का, काचा किंचित रंगीत बऱ्या दिसतील का अशी चर्चाही मोकळेपणाने करतो; पण तेच कान नीट काम देत नाहीत म्हणून यंत्र लावलेलं असलं तर आपली दृष्टी बदलते. आपल्या मते ते गंभीर व्यंग ठरतं. पायाला आधार देण्यासाठी खास बनवलेला बूट वापरणारी व्यक्ती दिसली तर लगेच आपल्या भावना बदलतात. खरं तर निसर्गानं शरीर घडवत असताना काही चुका केलेल्या असतात. कधी शरीर वापरत असताना अपघातानं काही गोष्टी घडतात त्यांना एवढं महत्त्व देऊन त्या व्यक्तीवर अपंगत्वाचा शिक्का मारणं एवढंच नव्हे तर त्याला सामान्य माणसाप्रमाणे जगणं अशक्य करणं हं माणुसकी नव्हे.

पण पालकांच्या दृष्टीनं विचार केला तर आपल्या वेगळ्या मुलाला, मुलीला पाहून लोकांची होणारी कुजबुज, मुलावर रोख-णाऱ्या चमत्कारिक नजरा याचा त्यांना मनस्ताप होतोच; पण लहानपणापासून मुलाला माणसात वावरण्याची सवय लागली तर ह्या नजरांची सवय होते. कुजबुजण्याकडे दुर्लक्ष करता येतं. कधी शांतपणे उत्तरंही देता येतात. लोकांच्या नजरा टाळण्यासाठी मुलाला बंदिवास देणं हा यावरचा मार्ग नव्हे.

वेगळ्या मुलाला वाढवणारे आपण एक-टेच नाही तर असे हजारो पालक आहेत ही भावना पालकांना दिलासा देते. काही ठिकाणी ह्या पालकांच्या संघटना आहेत. आठवड्यातून एकदा एकत्र येणं, काही तज्ज्ञांकडून मार्गदर्शन, नवीन माहिती मिळवणं, या मुलांना समाजात सहजपणे वावरता यावं म्हणून खास सोई करून घेणं, याबाबतच्या संशोधनासाठी, उपचारासाठी काही निधी गोळा करणं अशी कामं या संघटना करतात.

## व्यंगावर मात करू शकतात

एकूणच ह्या मुलांना वाढवताना जो जादा ताण पालकांवर पडतो त्यासाठी मार्ग-दर्शनाची गरज असते. फक्त वैद्यकीय मार्ग-दर्शनाची नव्हे तर घरातल्या इतर माणसां-वर होणारा परिणाम, इतर मुलांकडे होणारे दुर्लक्ष, येणारं वैफल्य या सगळ्यात वारंवार आधार लागतो, योग्य ते मार्गदर्शन लागतं. नशिबाला दोष न देता हे मूल हा आपल्या जीवनाचा, इतर कामांबरोबरचा एक भाग मानणं गरजेचं असतं. त्याबरोबरच त्यानंच आपलं सारं जीवन व्यापून टाकलं असं होऊ न देण्याचीही काळजी घ्यावी लागते.

यासाठी काही संस्था खास प्रशिक्षणं आयोजित करतात. मूक-बधिर विद्यालयांतर्फे अशा मुलांना शिकवावं कसं याचे अभ्यास क्रम असतात. या मुलांना केवळ खुणांच्या भाषेतून बोलवं लागू नये, त्यांनी आपलं स्वरयंत्र विकसित करावं, दुसऱ्याचं म्हणणं समजून घेण्यासाठी ओठांच्या हालचाली लक्षपूर्वक पहाव्यात यासाठी पालकांना—शिक्षकांना शिकवलं जातं

मतिमंद मुलांसाठी पुण्यात 'कामायनी' ही संस्था कार्य करते आहे. मतिमंद मुलांना शिकवण्याचं शिक्षण देणारे त्यांचे चार चार महिन्यांचे अभ्यासक्रम आहेत. माता-शिक्षण-वर्ग आहेत ह्या मुलांना काही उद्योग शिकवून स्वावलंबी करण्याचेही प्रयत्न चालू आहेत.

अंध मुलांच्या बाबतीत आजवर सर्वांत अधिक काम झालेलं दिसतं. त्यांच्या स्वतंत्र शाळा आहेत त्याचप्रमाणे त्यांना प्रवासासाठी खास सवलतीही उपलब्ध आहेत. त्यांना येण्याजोगी अनेक कामं त्यांना शिकवली जातात. अंध माणसांशी-मुलांशी बोलताना असंही आढळतं की, पंचेंद्रियांपैकी एक इंद्रिय निकामी झालं तरी त्यांची इतर इंद्रियं सामान्यांपेक्षाही जास्त तल्लख असतात. एवढंच नव्हे तर अंध मुली असंही सांगतात की, एखाद्याच्या स्पर्शावरून त्या त्या माण-साच्या मनातला हेतू ओळखू शकतात, सावध होतात.

मुलांमधलं हे वेगळेपण मुळात फार गंभीर नसतं; पण सतत वेगळी वागणूक मिळाल्यानं, इतरांनी फार दया दाखवल्यानं, मठ्ठ ठरवल्यानं चेहऱ्यावर बावळटपणा येतो. ज्या घरात अशा मुलांना सामावून घेतलं जातं, प्रेम मिळतं ती मुलं जास्त सहजपणे आपल्या व्यंगावर मात करतात.

असंही म्हणतात की, उच्चशिक्षित हुशार

कुटुंबांमध्ये राहण्यापेक्षा सर्वसामान्य कुटुंबात राहून या मुलांची वाढ जास्त चांगली होते, याचं कारण म्हणजे हुषार पालकांचं मूल बुद्धीनं मंद निघालं तर त्याला ते फार बोचत राहतं. मग शाळेत मागं पडणाऱ्या मुलाचा जास्त अभ्यास घेतला जातो. त्याला सतत पुढे ढकलण्याचा प्रयत्न होतो. त्याला काही जमत नाही. म्हणून स्वत: अस्वस्थ होणं वाढतं. हा ताण त्या मुलावर घालणं घातक ठरतं.

मुलाच्या बुद्धीच्या वाढीचा वेग कमी असला तर त्याला योग्य झेपेल असं, त्याच्या गतीनं शिक्षण मिळणं हा त्याचा हक्क आहे. त्याचं वय आणि त्या वयाच्या बरोबरची मुलं यांच्याशी त्याची तुलना होऊ नये. त्याला कोणत्या वयाची समज आहे ते पाहून ते शिक्षण त्याला मिळायला हवं.

### काही करून, काही न करून !

आपण इतरांसारखेच आहोत ही भावना या मुलांमध्ये वाढीला लागली आणि बरोबरच्या इतर मुलांनी त्यांना आपल्यात सामावून घेतलं तर त्यांच्या वाढीचा वेग वाढतो.

यासाठी शक्यतोवर नेहमीच्या शाळेत या मुलांनी जाणं योग्य असं मानतात; पण ते किती प्रमाणात अपंगत्व आहे यावर अवलंबून राहतं. पालक, शिक्षक आणि बरोबरची मुलं यांनी दिलेल्या चांगल्या वागणुकीनं त्यांचा आत्मविश्वास वाढू शकतो.

अशा वेगळ्या मुलांचं शिक्षण हे काही देशात आरोग्यखात्याचं काम मानतात. काही देशात ते शिक्षणखात्याचं मानतात. आपल्याकडे ते समाजकल्याणखात्याचं काम मानलं जातं. खरं तर या तीनही क्षेत्रांच्या मदतीची या कार्याला गरज आहे.

शहरी भागात पालकांना निदान वेगळ्या मुलांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांपर्यंत पोचता तरी येतं; पण ग्रामीण भागात या साऱ्या वेगळेपणाबद्दलची माहितीही पुरेशा प्रमाणात पोचत नाही त्यामुळे वेळेवर त्यावर उपाय करणंही कठीण जातं.

अलीकडे म्हणजे गेल्या पाच-दहा वर्षांत याबाबत विशेष प्रयत्न होताना दिसतात. मूक-बधिरांसाठी काही नाक-कान-घसा शिबिरं होतात. अंध मुलांसाठीं शस्त्रक्रिया शिबिर होतात; पण इतर प्रश्नांसंबंधी खास प्रयत्न होत नाहीत. मतिमंद मुलांना खुळी पोरं म्हणून बाजूला टाकलं जात.

मुलामधलं शारीरिक, मानसिक, बौद्धिक वेगळेपण वेळेवर लक्षात येणं, त्यावर योग्य ते उपाय करणं यासाठी खास मुलांसाठी असलेले डॉक्टर्स मदत करतात. मार्गदर्शन करतात. प्रसूती होण्यापूर्वी एक महिनाभर गर्भामधली विकृती ओळखता येते. याचा आधार घेऊन काही पालक मुलाच्या जन्मापूर्वीच काही गंभीर विकृती असेल तर हे मूल आम्हाला नको असंही सांगतात. ही विचार करण्याजोगी गोष्ट आहे.

पण एवढ्यानं प्रश्न सुटत नाही. मूल जन्मताना निकोप असलं पण नंतर काही आजारानं त्यात व्यंग आलं तर ते मूल नको म्हणून चालत नाही. आपण तोवर मुलात गुंतलेले असतो.

असं मूल स्वीकारणं किंवा नाकारणं या दोन्ही बाबतीत शास्त्रीय दृष्टिकोणाची गरज आहे. तो भावनेचा किंवा प्रतिष्ठेचा प्रश्न बनवता येत नाही.

वेगळ्या मुलांना वाढवण्याचं आव्हान जिद्दीनं पेलणारे अनेक पालक आपल्या आसपास भेटतात. त्यांचं आणि वेगळ्या मुलांचं जगणं सुसह्य करणं इतरांना शक्य आहे. काही गोष्टी करून आणि काही न करून. □

## समाज पालकत्व मागत असतो

निसर्गानं दिलेलं पालकपण काहींना झेपत नाही तर काहींना निसर्ग पालकपण देत नाही. स्वतःच्या पोटच्या मुलांचं पालक होता आलं नाही तरी आपली म्हणावीत अशी किती तरी मुलं भेटत राहतात.

शेजाऱ्यांची मुलं, मित्रांची मुलं, अनाथ मुलं, गुन्हेगार ठरवली गेलेली मुलं, दत्तक मुलं, साऱ्यांना पालक हवे असतात. अगदी त्यांचे जन्मदाते आई–वडील असले तरीही.

अनेक प्रकारे समाज पालकत्व मागत असतो. त्याबद्दल पुढील लेखात.

# इथून - तिथून

### फिल्मोत्सव – ८४

१९८४ जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात मुंबईत भरणाऱ्या 'फिल्मोत्सव–८४' च्या तारखा मान्य करायला आंतरराष्ट्रीय चित्रपट निर्माता महासंघाने नकार दिला असला तरी या फिल्मोत्सवाच्या आयोजनाची पूर्वतयारी सुरू झाली आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरचे चित्रपटमहोत्सव भरवताना या महासंघाची मान्यता असावी लागते. ९ जानेवारी ते २१ जानेवारी ८४ या काळात मनिलाने चित्रपटमहोत्सव भरण्याचे ठरवले असून भारताचा महोत्सव ३ ते १७ जानेवरी या काळात भरतोय. मनिलां महोत्सवाच्या तारखा बदलाव्यात ही भारताची सूचना या महासंघाने मान्य केली नाही.

दरम्यान 'फिल्मोत्सव ८४'च्या संयोजन समितीची पहिलीच बैठक नुकतीच मुंबईत झाली. या समितीत ३९ सदस्य असून नभोवाणी माहिती खात्याचे सचिव एस. एस. गिल यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. या फिल्मोत्सवात 'तिसऱ्या जागातील' सिनेमाच्या हेतुपूर्वक प्रदर्शनावर भर देण्याचे ठरले असून जगातील नामवंत चित्रपटकर्त्यांना आमंत्रणे दिली जाणार आहेत.

या महोत्सवाचा एक प्रमुख भाग भारतीय चित्रपटाची विक्री आणि तिसऱ्या जगातील चित्रपटांची खरेदी हा असून राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ याच्या संयोजनाची जबाबदारी घेणार आहे. गेल्या दोन वर्षात विविध स्वरूपाची आंतरराष्ट्रीय पारितोषिके लाभलेल्या शंभराहून अधिक परदेशी चित्रपटांचं प्रदर्शन हे अर्थातच या फिल्मोत्सवाचे सर्वाधिक मोठे आकर्षण राहणार आहे.

□

# बँक अधिकारी....असाही....

पृष्ठ ४ वरून

जठारांनी पुण्याच्या कॅंप विभागातील ईस्ट स्ट्रीटवर स्टेट बँकेच्या प्रादेशिक कार्यालयाची धुरा वर्षापूर्वीच स्वीकारली होती. स्वत: जातीने उभे राहून एक नवी भव्य इमारत उभी करण्यापासून या कार्यालयाच्या महाराष्ट्रात पसरलेल्या १२९ शाखांचे प्रमुख म्हणून वर्षभरात त्यांनी बँकेच्या क्षेत्रात एक विलक्षण चैतन्य निर्माण केले होते. रात्रंदिवस ते अपार परिश्रम करीत होते, दौरे चालले होते, मेळावे भरवीत होते. केवळ आठ महिन्यानंतर ते सेवानिवृत्त होणार होते आणि या आठ महिन्यांत कसलीही विश्रांती न घेता समाजाच्या दुबळ्या घटकापर्यंत स्टेट बँकेचे कार्य पोचविण्याच्या शासनाच्या नवनव्या योजना ते पोचविणार होते. त्यांची ही अखंड धडपड त्यांच्या नातेवाइकांना अस्वस्थ करीत होती. जठारांनी थोडीशी विश्रांती घ्यावी, बँकेच्या कामापासून थोडा वेळ तरी दूर राहावे, असे साऱ्यांना वाटत होते. जठारांना त्यामागची आच उमगली आणि अचानक त्यांनी २–३ आठवडे रजा काढून काश्मिरला सपत्नीक जाण्याचा निर्णय घेतला या निर्णयामागचे खरे कारण वेगळेच होते. जठारांचे एक स्नेही चंदीगडच्या स्टेट बँकेचे प्रमुख होते.सेवानिवृत्ती-पूर्वी जठारांनी एकदा चंदीगडला यावे, असा त्यांचा सारखा आग्रह होता. चंदीगडला कुमार गंधर्वांच्या गायनाचा कार्यक्रमही ठेवला होता. या निमित्ताने काश्मिर व चंदीगड दोन्ही करावी असा तडकाफडकी निर्णय त्यांनी घेतला. स्वत:ची जागा ताब्यात येण्यास अवसर असल्याने पंधरा दिवस बाहेर काढावेत म्हणून देऊस्करांनीही त्यांच्या-बरोबर सपत्नीक जाण्याचा निर्णय घेतला.

काश्मिरच्या सहलीत शेख अब्दुल्लांचे निधन झाल्याने स्फोटक वातावरण निर्माण होऊन सहल अर्ध्यावर टाकून चौघांना जीव मुठीत घेऊन जनानी गोषात मोठ्या मुष्किलीने विमानतळावर यावे लागले. अमृतसरहून चंदीगडला जाणाऱ्या लक्झरी बसमध्ये तिकिटे काढून चौघे आसनस्थ झाल्यानंतर तिथल्या स्टेट बँकेच्या अधिकाऱ्यांना सुगावा लागून त्यांनी त्यांना खाली उतरून घेतले आणि स्टेट बँकेची टॅक्सी दिमतीला दिली.

तेथून चंदीगडला जात असताना नियतीने डाव साधला. विश्रांती नाही, स्नेह्याची भेट नाही, कुमारांचे गाणे नाही...

योजिलेले सारे काही क्षणार्धात उधळले गेले आणि त्या उमद्या व्यक्तिमत्त्वांचा भीषण अंत पाहण्याचे साऱ्यांच्या नशिबी आले !

सारा प्रकार मन सुन्न करणारा होता !

कै. जठारांचा २० वर्षांपूर्वी माझा संबंध आला होता. या वीस वर्षांत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू मी अगदी जवळून पाहिले होते. सभ्यता, रसिकता, सुसंस्कृतता आणि माणुसकी यांचे दुर्मिळ दर्शन या एका माणसातच मला सातत्याने घडले होते. इतरांसारखाच एक सामान्य प्रशासक म्हणून वावरणाऱ्या या माणसाजवळ स्तिमित करणारे माणुसकीचे गुण होते. असे निरपवाद गुणसंपन्न असणारे व्यक्तिमत्त्व क्वचित कुठे तरी आपणाला भेटते|आणि ते तर मला सहजगत्या भेटले होते.

लहानपणीच आईवडिलांचे निधन झाल्याने जठार आपल्या चुलत्यांकडे अमळनेरास राहून मॅट्रिकपर्यंत शिकले. अमळनेरच्या हायस्कूलमध्ये सानेगुरुजींसारख्या शिक्षकाचे संस्कार त्यांच्यावर झाले. मॅट्रिकपर्यंत शिकल्यानंतर पुण्याला ते अगोदर पोस्टखात्यात लागले. १९४२ मध्ये पुण्याच्या इंपीरियल बँकेत ते साधे कारकून म्हणून काम करू लागले. नोकरीमुळे शिक्षणाची हौस मारली गेली होती; परंतु राजकारण, अर्थकारण या विषयांवरच्या वृत्तपत्रांचे, नियतकालिकांचे अखंड वाचन करण्याची त्यांनी सवय लावून घेतली होती. रोजच्या रोज टाइम्ससारखे वृत्तपत्र ते संपूर्ण वाचीत. आर्थिक विषयांवरची नियतकालिके बारकाईने नजरेखालून घालीत. मराठीतील उत्तमोत्तम पुस्तकांचे त्यांचे अखंड वाचन चाललेले असे. नाटक, संगीत इत्यादी कलांमध्ये त्यांना विलक्षण गोडी होती. त्यामुळे या सर्व क्षेत्रांतील मोठमोठ्या अभ्यासकांशी मोकळेपणाने त्यांचा संवाद होई. त्यांचा व्यासंग, त्यांची रसिकता त्यांचे अगत्य आणि निगर्वी-पणा यामुळे त्यांचे सान्निध्य म्हणजे एक नितांत आनंदाची निरपवाद सुखाची घटना असे.

मार्क्सच्या वाचनाने तरुणपणी ते सामाजिक समतेच्या कल्पनेने भारावून गेले होते. नेतृत्व करण्याची एक उपजतच शक्ती त्यांच्यामध्ये होती. धडाडी, झोकून देण्याची वृत्ती यामुळे बँकेत नोकरी करीत असतानाच सेवक संघटनेची स्थापना करून त्यांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठविला. त्यांचा अभ्यास, त्यांची वादकुशलता आणि निःस्वार्थीपणा यांचा प्रभाव पडल्यावाचून राहिला नाही.

बुद्धिकौशल्य आणि कार्यनिष्ठा आणि अतूट सेवाभाव यामुळे स्टेट बँकेच्या अधिकाराच्या अनेक पायऱ्या ते चढत गेले. स्टेट बँकेच्या मुंबई विभागाची पुनर्रचना झाल्यानंतर कर्मचारी प्रशासनाधिकारी ( Personnel officer ) म्हणून बँकेतील कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्तुळांमध्ये आणि संघटनांमध्ये सामंजस्याचे आणि सहकार्याचे वातावरण निर्माण करण्याची अवघड कामगिरी त्यांनी पार पाडली. त्यामुळे आणखी वरच्या पदांवर त्यांना बढत्या मिळत गेल्या. त्या पदांवरून मुंबई, बडोदे येथे त्यांनी केलेल्या कार्याची आठवण त्यांचे सहकारी वारंवार हटकून काढतात. सेवानिवृत्तीचे वय जवळ येत असता काही महत्त्वाच्या इतर बढत्या नाकारून पुण्यास नव्यानेच


## घर विकणे आहे

टिळकरोडवर साहित्य परिषदेशेजारी अत्यंत मोक्याच्या जागी असलेले, दोघांच्या मालकीचे परंतु कागदोपत्री सोयिस्कर वाटणी असलेले फ्रीहोल्ड प्लॉट-वरील ३ मजली घराचा तळापासूनचा १ भाग ताबडतोब विकणे आहे.

दुसरा व तिसरा मजला मिळून १३०० स्क्वेअर फुटांचे २ ब्लॉक्स व्हेकंट, दोन्ही ब्लॉक्सना प्रशस्त बाल्कनी, तळमजल्याचे अल्प उत्पन्न, पाण्याचे स्वतंत्र मीटर कनेक्शन.

डॉक्टर/वकील/क्लासवाले/सी. ए. यांना एकाच जागी ऑफिस व लहान कुटुंबाच्या निवासासाठी अत्यंत सोयिस्कर.

संपर्क/पत्रव्यवहार :

रु. कृ. गोखले, ४८५/२ ( नवा ), सदाशिव पेठ, टिळकपथ, साहित्य परिषद शेजारी, पुणे ३०.

संपर्क : १० ते ११ व ४ ते ६.

सुरू करावयाच्या प्रादेशिक कार्यालयाची धुरा त्यांनी आनंदाने स्वीकारली आणि ती स्वीकारल्यानंतर त्यांनी समर्थपणे हे कार्यालय उभे तर केलेच; परंतु अशा प्रकारच्या कार्यामागे जे तत्त्व अनुस्यूत होते ते सामान्य माणसापर्यंत पोचविण्यासाठी त्यांनी जी धडपड केली त्यामुळे त्यांचे कर्तृत्व आणखी उजळून उठले.

स्टेट बँकेच्या प्रादेशिक कार्यालयाचे व्यवस्थापक झाल्यानंतर दप्तर-दिरंगाईची बाधा होऊन कार्याचा विचका होऊ नये म्हणून त्यांनी बँकेच्या कर्मचाऱ्यांचे चार-सहा महिन्यांत सुमारे २०-२५ मेळावे घेतले. साध्या शिपायापासून अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांशी संपर्क साधून त्यांनी जिव्हाळ्याने आपल्या नव्या योजना खेडोपाडी पोचविल्या.

खेड्यापाड्यांपर्यंत पसरलेल्या सर्व तऱ्हेच्या बँक-सेवकांना त्यामुळे जठारांच्या व्यक्तिमत्त्वाचा अगदी जवळून परिचय घडला. स्वतः जातीने हजर राहून जिल्ह्यांच्या ठिकाणी जठारांनी बँक-सेवकांसाठी संध्याकाळचे वर्ग घेतले. प्रादेशिक कार्यालयातील प्रत्येक सेवकाला त्याच्या नावाने जठार सहजगत्या हाक मारीत, त्याच्या अडीअडचणींची आस्थेने चौकशी करीत. जठारांच्या सान्निध्यात आलेल्या असंख्य व्यक्ती त्यांच्या अगत्यपूर्वक वागण्यामुळे त्यांचे कायमचे ऋणानुबंधी-बनून जात. हे त्यांचे अगत्य सामान्य माणसांच्या वाटेला अधिक येई. प्रवासात आपल्या ड्रायव्हरच्या जेवणाची ते आधी व्यवस्था ठेवीत. त्यांच्या सवयी इतक्या साध्या, सरळ होत्या की, त्यांनी कधीही अधिकारी म्हणून आपल्या खाण्यापिण्याच्या सोयीची अपेक्षा ठेवली नाही. साधी ज्वारीची भाकरी त्यांना मोठमोठ्या मेजवान्यांपेक्षा अधिक प्रिय होती. निरहंकारिता, निगर्वीपणा, साधेपणा आणि माणसाबद्दल आर्जव आणि अगत्य हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव होता.

कोणाच्या घरी गेल्यानंतर, त्या घरातील सर्व थरातील व्यक्तींशी ते सहज संवाद साधीत. काव्यशास्त्रविनोदाच्या मैफिली ते दिवाणखान्यात घडवीत तर स्वैपाकघरात जाऊन घरातील वृद्ध आजींच्या प्रकृतीचीही चौकशी करण्यास ते चुकत नसत. केवळ मानवी व्यवहार मनुष्यस्वभाव यांच्याबद्दल त्यांना आस्था होती असे नव्हे, तर सर्व तऱ्हेच्या ज्ञानाबद्दल, व्यवहाराबद्दल, लोकव्यवहाराबद्दल त्यांना केवळ विलक्षणच नव्हे तर बालसुलभ आकर्षण होते, त्यामुळे कोणत्याही नव्या विषयाच्या अभ्यासकाबरोबर त्याच्या विषयाशी चर्चा करण्यात ते कमालीचे रंगून जात.

जीवनातील अवडंबर, कर्मकांड यांचा त्यांना कमालीचा तिटकारा होता, त्यामुळे त्यांनी एखादे वेळेस रजा घेतलीच तर ते या काळात कोकणातील आपले कान्हे येथील जन्मस्थानी आवर्जून भेट देत. लोणावळ्याला कुवलयानंदांच्या आश्रमात जाऊन प्राणायामाचा अभ्यास करीत आणि उरळीकांचनच्या निसर्गोपचार आश्रमात जाऊन आस्थेने तेथील उपचारांच्या प्रयोगात सहभागी होत. ते बुद्धिवादी होते परंतु त्यांचा बुद्धिवाद अतीव डोळस होता. आपल्या मृत्यूनंतर कोणतेच धार्मिक विधी न करता अनाथाश्रमास देणगी द्यावी असे त्यांनी सांगून ठेविले होते. परंतु आपली ही मते दुसऱ्यावर कधीही लादायची नाहीत, याबद्दलही त्यांचा तितकाच कटाक्ष होता.

आधुनिकता, प्रगमनशीलता, प्रबोधनाच्या प्रेरणा यांचे त्यांना आकर्षण असले तरी त्या सर्वांचे पर्यवसान माणुसकीत झाले पाहिजे असे त्यांना वाटे. तसे होत नाही हे पाहून ते खंतावत. वृत्तीने ते कमालीचे हळवे होते. इंग्रजीत मोठ्या प्रमाणात लेखन करणारे एक मोठे लेखक आपल्या पत्नीला घेऊन एकदा त्यांच्याकडे आले. त्यांच्या पत्नीच्या मनात तिच्या मिळविल्या मुलाबद्दल कमालीचा तिरस्कार होता. ती आग्रहाने त्यांना सांगू लागली.

'माझ्या मुलाने खोटे सर्टिफिकेट देऊन बँकेत नोकरी मिळविली आहे. त्याला नुसतेच काढून टाकू नका तर खोटे सर्टिफिकेट दिल्याबद्दल त्याला शिक्षा होईल असे करा!'

तिचे बोलणे ऐकून जठारांचे डोळे अश्रूंनी भरून आले.

'बाई, अशी गोष्ट माझ्या हातून कालत्रयीही घडणार नाही आणि आई असून तुमच्या मनात असे विचार येतात तरी कसे?'

बाई वाईट चेहरा करून निघून गेली; परंतु तिच्या या वर्तनाने अस्वस्थ होऊन जठार रात्रभर न झोपता तळमळत होते.

बँकेच्या नोकरीसाठी मुलाखती घेताना सातारा-सांगली--कोल्हापूर वगैरे भागांत ते मुलांना कुस्तीबद्दल, खो-खोबद्दल प्रश्न विचारीत आणि तेही मराठीत. त्यांच्या बरोबरीचे अधिकारी अस्वस्थ होते.

'ज्या भागात त्यांना नोकरी करायची आहे त्या भागाची माहिती त्यांना चांगली असली की झाले! त्यांना उगीच इंग्रजीतून आडवळणाचे प्रश्न कशाला विचारा?' ते म्हणत आणि दुर्बल घटकांना कसे सामावून घ्यायचे हे पाहत.

खेड्यापाड्यांतील बुद्धिमान, गरीब विद्यार्थ्यांचा शोध घेण्यात ते दंग राहात आणि नियमांचा बाऊ न करता त्यांना नोकरी कशी मिळेल हे ते पाहात. साऱ्या आर्थिक व्यवहारातच नियमांपेक्षा कामाकडे लक्ष देण्याची त्यांची वृत्ती होती.

मंचरच्या पानवळांच्या वृक्षसंवर्धन प्रकल्पाला आर्थिक मदतीची गरज होती. पु. ल. देशपांडे यांनी रिझर्व बँकेच्या मुंबईच्या ओळखीच्या बड्या अधिकाऱ्यांकडे हा प्रश्न काढला.

'पुण्यात जठार असताना मुंबईला कशाला फोन केलात?' त्या अधिकाऱ्याने सांगितले. पु. ल. नी जठारांना फोन केला. जठार तात्काल पुलंच्याकडे गेले. त्यांनाही पानवळांच्या कार्याची माहिती होती. दुसऱ्या दिवशी जठार काश्मीरला जायला निघणार होते. परत आल्यावर यासंबंधी सर्व प्रकारची तरतूद करण्याचे त्यांनी आश्वासन दिले पुलंच्याकडून ते माझ्याकडे आले आणि पानवळांना बिनव्याजी रक्कम कशी देता येईल याचा विचार त्यांनी बोलून दाखविला.

अशा कित्येकांची अनेक प्रकारची कामे जठारांनी केली आहेत. त्यामुळे त्यांचे नाव निघाले की, अजूनही हळहळणारी, सद्गदित होणारी असंख्य माणसे ठिकठिकाणी हटकून भेटतात.

शासकीय किंवा प्रशासकीय अधिकारी सेवानिवृत्त झाला की, सारे लोक त्याला तात्काल विसरून जातात; परंतु जठारांनी आपल्या बरोबरीच्या हाताखालच्या आणि सान्निध्यात येणाऱ्या लोकांना जो जिव्हाळा दिला होता, जी आत्मीयता दिली होती, त्यामुळे त्यांची आठवण झाली की, त्यांच्याबद्दलच्या उत्कट भावना त्यांच्या मनात जाग्या होतात आणि त्यांच्या अकाल मृत्यूने ते पुनःपुन्हा अस्वस्थ होतात, उदास होतात.

हसत हसत उत्फुल्ल चेहऱ्याने साऱ्यांची विचारपूस करीत सर्वांना अगत्य दाखविणारे जठार काही केल्या अजूनही डोळ्यांसमोरून हलत नाहीत!

नवे पुस्तक, नवे नाटक, नवी कॅसेट, भीमसेन किंवा कुमारच्या गायनाची मैफिल, दिवाळी अंकातील उत्कृष्ट लेख पाहिला की, जठारांची तीव्रतेने आठवण होते. अशा पुस्तकांवर, नाटकांवर, मैफिलींवर केलेल्या अखंड गप्पा आठवतात किंवा त्यांच्या घरची अखंड रीघ आठवते. त्या सर्वांशी सारख्याच आत्मीयतेने वागणारे जठार आठवण्यात आणि यापुढे तो उमदा, उत्फुल्ल चेहरा पुन्हा दिसणार नाही या कल्पनेने मन व्यथित होते.

त्यांच्या आठवणीने सैरभैर झालेले मन आवरणे कठीण होते. त्या भरात मी कुठे तरी जायला निघालो असतो आणि विमनस्क स्थितीत दुसरीकडे कुठे तरी जाऊन पोचलेला असतो.

टिळक-स्मारक मंदिरातील व्याख्यानास म्हणून जातो आणि पर्वती चढून गेल्यावर मला त्याची आठवण होते... □

**रंगलेल्या मुलाखती**

**एक चित्रकार / एक लेखक**

प्रसिद्ध व्यंगचित्रकार **वसंत सरवटे** यांच्याशी बोलताहेत
त्यांचे जवळचे मित्र प्रसिद्ध साहित्यिक **जयवंत दळवी.**

**एक दिग्दर्शक / एक पत्रकार**

प्रत्येक माध्यमात आनंदाने बागडलेली
आजची लोकप्रिय दिग्दर्शक **सई परांजपे** यांची तशीच हसरी मुलाखत
**मेधा राजहंस**

□

**श्रीकृष्ण एक मोठे स्वप्न**

**श्याम ते श्रीकृष्ण / आनंदसागर ते पूर्णपुरुष**
**राजकारणी रणछोडदास ते गुरुमाउली**

श्रीकृष्णाच्या या अनेक रूपांतून हे नाते शोधण्याचा एक हळुवार प्रयत्न.
अमेरिकेत असलेल्या नातवांना अनेक पदव्या धारण केलेल्या आणि
जग हिंडून आलेल्या ' भारतीय ' आजोबांनी लिहिलेली ही पत्रे–

□

**नाट्यमन्वंतर निर्मिती आणि अखेर**

गाव वाहून गेलं, पण नाव मात्र राहिलं.
नाट्य मन्वंतराबाबत असेच काहीसे घडले.
या मन्वंतरासंबंधी कै. **के. नारायण काळे** यांचा
अप्रकाशित सडेतोड लेख.

□

**हरिभाऊ आणि मी**

हरिभाऊ मोटे–प्रकाशन व्यवसायातले एक स्वतंत्र प्रगल्भ व्यक्तिमत्त्व.
एक दिवस अजाणता ह. वि. मोटे प्रकाशन पॉप्युलर प्रकाशनमध्ये अंतर्भूत झाले.
आणि सुरू झाली दोन सहप्रवाशांची आनंदयात्रा.
रामदास भटकळ यांचा एक हृद्य लेख.

□

**दास दप्तरी रहातो**

दिवाळीचं हसरं पान आहे **वि. ग. कानिटकर** यांचं.
सरकारी नोकरीतले अनुभव–किस्से खास विनोदी शैलीत सांगणारा
खुसखुशीत लेख.

□

**सात उत्कृष्ट कथा**

| | |
|---|---|
| पद्मजा फाटक | नारायण धारप |
| सुधा नरवणे | राजन खान |
| विनया खडपेकर | कर्नल जाधव |
| विनायक राजगुरु | |

□

**शिवाय**

**भालजी पेंढारकर यांच्यावरील श्रीकांत मुंदरगी यांचा एक खास लेख**

# माणूस दिवाळी अंक ८३

**या दिवाळी अंकाची किंमत : रुपये सोळा फक्त**

पाडगावकर : ' सत्यकथे ' च्या संपादनाचं काम तुम्ही हाती घेतलंत तेव्हा ते प्रसिद्ध, लोकप्रिय व्हावं, मोठा खप मिळवावा, असे विचार तुमच्या मनात आले होते का ? ' सत्यकथा ' लोकप्रिय व्हावी या दृष्टीनं तिचं संपादन करावं, असं विष्णुपंतांनी तुम्हाला कधी सुचवलं होतं का ?

भागवत : नाही. ' सत्यकथे ' चं संपादन अंगावर घेताना तिचं जे स्वरूप मी कल्पित होतो ते लोकप्रिय होणार नाही आणि त्यामुळे ' सत्यकथे ' चा फार मोठा खप होणार नाही हे मला पूर्वीच्या नियतकालिकांच्या अनुभवावरून माहीतच होतं. या बाबतीत विष्णुपंतांनी वेगळं काही कधी सुचवलं नाही, त्यांनी मला पूर्ण स्वातंत्र्य दिलं, इतकंच नाही तर ' सत्यकथे ' च्या व्यवहाराचं कसलंही दडपण माझ्यावर येऊ नये म्हणून त्यापासून मला पूर्णपणं मुक्तच ठेवलं.

पाडगावकर : ' सत्यकथा ' तोटयात येऊ लागलं तेव्हा आपले हट्ट म्हणा किंवा निष्ठा म्हणा, जरा सैल करून लोकप्रियतेच्या वळणाकडे झुकावं असं तुम्हाला कधीच वाटलं नाही ?

भागवत : याचंही उत्तर ' नाही ' असंच आहे. एक तर ' मौज ' काय किंवा ' सत्यकथा ' काय, नेहमी तोटयातच होती. त्यांना लोकप्रियतेच्या वळणाकडे झुकवणं, त्यांचं आम्ही प्रथमपासूनच कल्पिलेलं स्वरूप पाहता, कठीण होतं. ते फार बदलून वळवलं असतं तर ' मौज ', ' मौज ' राहिली नसती आणि ' सत्यकथा ', ' सत्यकथा '. हा एक आत्मनिष्ठेचाच प्रश्न आहे. ती कवीला असावी तशीच संपादक-प्रकाशकालाही.

# श्री. पु. : संपादक आणि माणूस

**मुलाखत : मंगेश पाडगावकर**

सहजीवन म्हणजे दोघांनीही एकमेकांची सोबत करत वाढणं,
पुढे जाणं आहे.
आपल्या जोडीदाराचे गुण, दोष अशी विभागणी न करता त्याला
माणूस म्हणून सगळाच्या सगळा मान्य करणं आहे.
आपापले बुरखे टाकून देऊन एकमेकांना मोकळ्या मनानं भेटणं आहे.
एकमेकांना पूर्णपणे समजून घेण्यासाठी साधलेला संवाद आहे.
समंजसपणे हे नातं फुलवता येतं.
अविचारीपणे कोमेजून टाकता येतं.
आक्रस्ताळेपणानं ते खुडूनही टाकता येतं.
सहजीवनाचा शोध घेणारा
प्रत्येकाला अंतर्मुख करणारा विशेष लेख–

# लग्न आणि सहजीवन

**शोभा भागवत**

# माणूस दिवाळी अंकात !